CMYK

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ९२ । पाने १२ । किंमत रु. ६/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प




संस्कृती म्हणजे केवळ कपडे परिधान करणे किंवा भाषा बोलणे नाही. मूलतः या देशात एक अद्वितीय सांस्कृतिक एकता आहे. एखाद्या देशाचे अस्तित्व कायम ठेवायचे असेल तर त्यात खंडित भाग असू शकत नाही.

- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

## महत्त्वाचे

### शेअर बाजार किरकोळ घसरणीने बंद

**मुंबई :** दिवसभराच्या अस्थिर व्यवहारादरम्यान एचडीएफसी आणि इतर ब्ल्यू-चिप समभागांच्या घसरणीनंतर देशातील शेअर बाजार गुरुवारी किरकोळ घसरणीसह बंद झाले. इराण आणि अमेरिकेत सुरू असलेल्या वाटाघाटींच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतली आहे. सकाळच्या सत्रातील तेजी गमवत मुंबई शेअर बाजार २७ अंकांनी घसरून ८२,२४८ पातळीवर बंद झाला. दिवसभराच्या सत्रात त्याने ८२,५७९ अंकांपर्यंत उसळी घेतली, त्यानंतर ६०८ अंकांची घसरणही अनुभवली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १४ अंकांनी घसरून २५,४९६ या पातळीवर बंद झाला. आजच्या सत्रात ट्रेन्ट, इटर्नल, पॉवर ग्रिड, एचडीएफसी बँक, एशियन पेंट्स कंपनीला विक्रीचा फटका बसला.



# भारत-इस्रायलमध्ये 'यूपीआय'साठी करार

● डिजिटल पेमेंट संबंधांना मिळणार चालना ● १७ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी

◆ **तेल अवीव, २६ फेब्रुवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवारी भारत आणि इस्रायलने १७ विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. यात भारत-इस्रायलमध्ये यूपीआय प्रणालीसाठी करार करण्यात आला. हे दोन्ही देशांच्या धोरणात्मक आणि आर्थिक भागीदारीला बळकटी देण्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.

नरेंद्र मोदी आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यातील चर्चेनंतर डिजिटल पेमेन्ट आणि व्यापार सहकार्यावर लक्ष केंद्रित करून हे करार करण्यात आले. यूपीआयचे संचालन करणारी नॅशनल पेमेन्ट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) आणि इस्रायल यांच्यात डिजिटल पेमेन्ट सिस्टिम जोडण्यासाठी हा प्रमुख सामंजस्य करार करण्यात आला.

मोबाईल फोनद्वारे त्वरित पैसे हस्तांतरणाची परवानगी देऊन यूपीआयने भारतात डिजिटल पेमेन्टमध्ये आधीच परिवर्तन घडवून आणले आहे. दोन्ही प्रणालींना जोडून, दोन्ही देशांनी सीमापार पेमेन्ट अधिक सुलभ आणि कार्यक्षम बनवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

या एकत्रीकरणामुळे भारतीय आणि इस्रायली व्यवसाय आणि व्यक्तींना आर्थिक व्यवहार अधिक सहजपणे करण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे. यामुळे व्यवहार खर्च आणि प्रक्रिया वेळ देखील कमी होऊ शकेल, ज्यामुळे देयके जलद आणि अधिक सोयीस्कर होतील. दोन्ही देशांमधील आर्थिक संपर्क सुधारण्यासाठी आणि व्यापार तसेच आर्थिक घडामोडींना पाठिंबा देण्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.



जेरुसलेम येथे गुरुवारी झालेल्या पत्रपरिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि इतरांसोबत सामंजस्य कराराची देवाणघेवाण करताना

> **जगात दहशतवादाला स्थान नाही, हे भारत आणि इस्रायल जाणतो. कोणत्याही स्वरूपात, कोणत्याही प्रकारे दहशतवाद सहन केला जाऊ शकत नाही. आम्ही दहशतवाद आणि त्याच्या समर्थकांविरुद्ध खांद्याला खांदा लावून उभे आहोत आणि पुढेही राहू.**
>
> **नरेंद्र मोदी**
> पंतप्रधान

### कृषी क्षेत्रापासून ते कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत

दोन्ही पंतप्रधानांमधील बैठकीनंतर भारत आणि इस्रायलने एकूण १७ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. यात दोन्ही देश कृत्रिम बुद्धिमत्ता, व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, उत्पादन, संस्कृती, सागरी वारसा, शेती आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये सखोल सहकार्य प्रदान करतील.

### दोन्ही देशांमध्ये आता विशेष धोरणात्मक भागीदारी

भारत आणि इस्रायलने काळाच्या कसोटीवर सिद्ध झालेले संबंध विशेष धोरणात्मक भागीदारीत वाढवले. पंतप्रधान मोदी यांनी गाझा शांतता उपक्रमाला पाठिंबा दिला आणि मानवतेने कधीही संघर्षाचा बळी बनू नये, असे ते म्हणाले.

> **प्रतिभा, तंत्रज्ञान आणि दूरदृष्टीला एकत्र आणणारी भागीदारी इस्रायल आणि भारत अधिक दृढ करीत आहे. अधिक सुरक्षितता, विकास आणि समृद्धीसाठी दोन्ही देश एकत्रितपणे भविष्य घडवत आहेत.**
>
> **बेंजामिन नेतान्याहू**
> इस्रायलचे पंतप्रधान

**प्रस्तावित मुक्त व्यापार करारांसाठी वाटाघाटी**

या सामंजस्य करारांसोबतच भारत आणि इस्रायलने प्रस्तावित मुक्त व्यापार करारासाठी वाटाघाटींचा पहिला टप्पादेखील सुरू केला आहे. आर्थिक सहकार्य अधिक दृढ करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून या चर्चेची सुरुवात नवी दल्लीतून सुरू झाली. *(वृत्तसंस्था)*

# डिजिटल तयारीनंतर शेतकरी कर्जमाफी

> 'ॲग्री स्टॅक'ची तयारी सुरु; निर्णय लवकरच - मुख्यमंत्री

◆ **मुंबई, २६ फेब्रुवारी**

**शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या दृष्टीने, फसवणूक टाळ्यासाठी 'ॲग्री स्टॅक'ची तयारी सुरु असून, या व्यापक डिजिटल तयारीनंतरच कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.**







राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला. सरकारला खिंडीत पकडण्याचा प्रयत्न विरोधकांनी चर्चेदरम्यान केला होता. दरम्यान, राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीबाबत ठोस अशी माहिती दिली.

मुख्यमंत्री म्हणाले की, कर्जमाफीसंदर्भात सरकारने एक समिती स्थापन केली असून तिचा अहवाल लवकरच अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन आम्ही योग्य वेळी पूर्ण करू, असे ठाम शब्दांत त्यांनी सांगितले.

फडणवीस यांनी मागील कर्जमाफी योजनांमधील त्रुटींचा उल्लेख करत सांगितले की, काही प्रकरणांत बँकांकडून चुकीची खाती दाखवून शासनाकडून निधी उचलल्याच्या घटना आढळल्या. ही फसवणूक टाळण्यासाठी शंभर टक्के 'ॲग्री स्टॅक' उभारण्याचे काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. दरम्यान, अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मागील वर्षी १५ हजार ४७२ कोटी रुपयांची थेट मदत डीबीटीद्वारे त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. शेतकरी अडचणीत असताना सरकार त्यांच्या पाठीशी उभे आहे, असे आश्वासन त्यांनी दिले. *(तभा वृत्तसेवा)*

### शेतीचा डिजिटल रेकॉर्ड तयार करणार

**या 'ॲग्री स्टॅक'मध्ये शेतकऱ्यांची नोंदणी, जमिनीची माहिती, सातबारा उतारा, आधार क्रमांक आणि संबंधित डिजिटल नोंदी एकत्रित केल्या जाणार आहेत. शेतीचा संपूर्ण डिजिटल रेकॉर्ड तयार करून पारदर्शक पद्धतीने कर्जमाफीचा निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.**



## २०२९ नंतर पुन्हा आम्हीच सत्तेत

राज्याच्या अर्थव्यवस्थेवरील आकडेवारी मांडत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्पष्ट राजकीय संदेश दिला. "आमची ही टर्म संपली की २०२९ नंतर पुढच्या टर्मलाही आम्हीच पुन्हा सत्तेत येऊ," असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ३९ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात येते आहे. दावोसमध्येही महाराष्ट्राचाच डंका वाजतो आहे. महाराष्ट्राचा आर्थिक विकासाचा रोडमॅप तयार असून आपली त्या वाटेवर घोडदौड सुरू असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्याची अर्थव्यवस्था २०२९ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर करण्याचे उददीष्ट ठेवले आहे. सध्या आपली अर्थव्यवस्था ५१ लाख कोटींपर्यंत म्हणजे हाफ ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचली आहे. आगामी तीन वर्षात दुष्काळी परिस्थिती न उद्भवल्यास २०२९-३० पर्यंत उद्दिष्टानुसार महाराष्ट्र ही जगातील १३ वी किंवा १४ वी अर्थव्यवस्था झालेली असेल असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. आज बेल्जियम देशाइतकी आपली अर्थव्यवस्था आहे. इतर कोणतेही राज्य अर्थव्यवस्थेच्या बाबतीत आपल्या जवळही नाही, असे ते म्हणाले.

## धर्मांतर बंदी कायद्यावर सरकार ठाम

**मुंबई, दि. २६ फेब्रुवारी -**

राज्य सरकार लवकरच राज्यात 'धर्मांतर बंदी कायदा' लागू करण्याच्या तयारीत असल्याचे संकेत मंत्री पंकज भोयर यांनी दिले आहेत. बळजबरीने होणाऱ्या धर्मांतराला आळा घालण्यासाठी हा निर्णय घेतला जात असून, कोणाचेही नुकसान करण्याचा यात हेतू नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, जबरदस्तीने धर्मांतर करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. यासोबतच मदरशांमध्ये चालणाऱ्या कामाची पडताळणी करून पुढील निर्णय घेतले जातील, असेही ते म्हणाले.

मंत्रालय हे कुणाच्याविरोधात कट रचण्याचे ठिकाण नसून येथून जनतेला न्याय देण्याचे काम, सर्वसामान्य लोकांकरिता चांगल्या शासकीय राबवण्याचे काम होत असते. मनोज जरांगे पाटील यांनी कुठलेही चुकीचे स्टेंटमेट मंत्रालयाबद्दल करू नये. राज्यात डान्सबारला परवानगी देण्यात येत नाही, केवळ ऑकेस्ट्रा बारला परवानगी देण्यात येते. काही ठिकाणी ऑकेस्ट्रा बार या नियमांचे उल्लघन करतात त्यावेळी काही दिवसांसाठी आपण त्यांचा परवाना काही दिवसांसाठी सस्पेंड करत असतो. पण यापुढे वारंवार जर असे करताना कोणात ऑकेस्ट्रा बार आढळला तर त्यांचा परवाना कायमचा रद्द करण्याचा निर्णय आपण घेत आहोत, असेही ते म्हणाले.

## टीम इंडियाची झिम्बाब्वेवर ७२ धावांनी मात

**चेन्नई** - टी-२० विश्वचषकाच्या सुपर ८ मध्ये भारताने पहिला विजय मिळवला. गुरुवारी दुसऱ्या सामन्यात टीम इंडियाने झिम्बाब्वेचा ७२ धावांनी पराभव केला. यासह, सुपर ८ ग्रुप १ म धून दक्षिण आफ्रिकेने उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. चेन्नईतील चेपॉक स्टेडियम वर, झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. टीम इंडियाने २० षटकांत ४ गडी गमावून २५६ धावा केल्या. यात अभिषेक शर्मा (५५) हार्दिक पांड्या (नाबाद ५०) व तिलक वर्मा (नाबाद ४४) यांनी शानदार खेळी केली. प्रत्युत्तरात, झिम्बाब्वेचा संघ २० षटकांत ६ गडी गमावून फक्त १८४ धावाच करू शकला. सलामवीर ब्रायन बेनेटेने एका बाजूने शानदार फलंदाजी करीत नाबाद ९७ धावांची खेळी केली. अर्शदीप सिंहने ३ तर वरुण चक्रवर्ती, अक्षर पटेल व शिवम दुबे यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. दक्षिण अफ्रिकेविरुद्धचा सामना गमावल्यानंतर भारतीय संघाने झिम्बावेविरुद्ध मोठ्या विजयाची नोंद केली आहे. त्यामुळे भारतीय संघाकडे उपांत्य फेरीत जाण्याची संधी कायम आहे. भारतीय संघाचा साखळी फेरीतील पुढील सामना वेस्ट इंडिज विरुद्ध १ मार्चला रविवारी होईल.

## अजित पवार विमान अपघात; सीआयडी तपास योग्य दिशेने

**पुणे** - दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा सीआयडी तपास योग्य दिशेने सुरू असल्याची माहिती गुन्हे अन्वेषण विभागाचे अपर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी दिली आहे. या अपघातात घातपात, निष्काळजीपणा किंवा कोणते गुन्हेगारी कृत्य घडले आहे का, याचा सखोल तपास करण्यात येत असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. रामानंद यांनी स्पष्ट केले की, बारामती वैद्यकीय महाविद्यालय, फॉरेन्सिक लॅब आणि केंद्रातील अनेक तपास संस्था या तपासात मदत करत आहेत. एअरक्राफ्ट इन्व्हेस्टिगेशन कमिटीचा तपासही सुरू असून, त्यांचे निष्कर्ष विचारात घेतले जात आहेत.

# सुनेत्रा पवार राकाँच्या राष्ट्रीय अध्यक्ष

### एकमताने झाली निवड

◆ **मुंबई, २६ फेब्रुवारी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या नेतृत्वाच्या प्रश्नाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची एकमताने निवड करण्यात आली. मुंबईतील वरळी डोम येथे झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या अधिवेशनात त्यांच्या नावावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले.



अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर पक्षात मोठी पोकळी निर्माण झाली होती. त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. मात्र पक्षाध्यक्षपदाची जबाबदारी कोण स्वीकारणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता होती. गुरुवारी झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनात हा प्रश्न निकाली निघाला.

अधिवेशनाला पक्षाचे आमदार, खासदार, विविध राज्यांतील पदाधिकारी आणि राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षपदासाठी कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला वरिष्ठ नेत्यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर उपस्थित सर्व सदस्यांनी हात उंचावून एकमताने त्यांच्या निवडीस समर्थन दर्शवले.

दिवंगत नेते अजित पवार यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवत नव्या अध्यक्षांच्या नेतृत्वात पक्ष संघटनबांधणी आणि आगामी राजकीय आव्हानांसाठी सज्ज होईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. *(तभा वृत्तसेवा)*

# खताचे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात

### पैसे कंपन्यांना मिळणार नाही : कृषिमंत्री

◆ **नवी दिल्ली, २६ फेब्रुवारी**

रासायनिक खताचे अनुदान कंपन्यांऐवजी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्याची अधिकृत घोषणा लवकरच केली जाणार आहे. यामुळे शेतकरी पिकानुसार खतांची निवड स्वतः करू शकतील आणि पारदर्शकता वाढेल, अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी गुरुवारी एका कार्यक्रमात दिली.

केंद्र सरकार शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सुमारे दोन लाख कोटी रुपयांच्या वार्षिक खत अनुदान व्यवस्थेत बदल करणार आहे. सध्या हे अनुदान थेट खत कंपन्यांना दिले जाते. त्यामुळे अंदाजे २,४०० रुपये खर्च असलेली युरियाची पिशवी शेतकऱ्यांना सुमारे २६५ ते २७० रुपयांत मिळते. मात्र आता हेच अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डीबीटीच्या माध्यमातून देण्याचा निर्णय घेतला जाईल.यामुळे शेतकरी आपल्या गरजेनुसार आणि



पिकाच्या स्वरूपानुसार खतांची निवड स्वतः करू शकतील, अशी माहिती शिवराज सिंह चौहान यांनी राजधानी दिल्लीतील भारतीय कृषी संशोधन संस्था (पूसा) येथे आयोजित कृषी विज्ञान मेळाव्यातून दिली. त्यांनी सांगितले की, या पद्धतीमुळे अनुदानाचा प्रत्यक्ष परिणाम शेतात दिसेल आणि पारदर्शकता वाढेल. खतांच्या निवडीत बदल झाल्यास जमिनीच्या आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होईल.

**सावकारांवरील अवलंबित्व कमी होईल**

केंद्राचा वाटा थेट शेतकऱ्यांच्या खात्यात गेल्यास कृषी क्षेत्रातील रोख प्रवाह सुधारेल आणि शेतकऱ्यांचे सावकारांवरील अवलंबित्व कमी होईल, असे चौहान म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

## कुसळंबमध्ये गोळीबार, झोपेतच जीवघेणा हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२६ फेब्रुवारी-**

बार्शी तालुक्यातील कुसळंब येथे थरारक प्रकार घडला. झोपलेल्या अवस्थेत असताना एका तरुणावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. लोखंडी रॉडने बेदम मारहाण करुन दोन राउंड गोळीबार करण्यात आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सुदैवाने गोळी कोणालाही लागली नसून जीवितहानी टळली आहे.

या घटनेत जखमी झालेल्या तरुणाचे नाव बाळासाहेब नंदकुमार उकरंडे (वय-२४) असे आहे. त्यांना सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. योगेश भास्कर मोरे (रा. कुसळंब, सध्या रहिवासी पुणे) याने हा हल्ला केल्याचे बोलले जात आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर तसेच तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या जीवघेण्या हल्ल्यानंतर आरोपी योगेश मोरे यांच्यासह ३ ते ४ जण काळ्या रंगाच्या 'ओरा' चारचाकी गाडीतून पुण्याच्या दिशेने फरार झाला असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून कुसळंबमध्ये तणावपूर्ण शांतता पसरली आहे. हल्ल्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

Suyash

सुयश गुरुकुल ज्युनिअर कॉलेज
(STATE/CBSE BOARD)
NEET/JEE/CET

CET CRASH COURSE

- २७ फेब्रुवारी पासून सुरूवात
- Test series and paper discussion

नवीन प्रवेश सुरू
(११वी व १२वी सायन्स)

- ११वी कॉलेजची सुरूवात १३ एप्रिल पासून
- १२वी कॉलेजची सुरूवात ९ मार्च पासून
- निवासी व अनिवासी
- अकरावी/बारावी संपूर्ण उजळणीसहीत
- भरपूर Topicwise test, Full tests
- रोज ६ तास शिकवणी व ४ तास स्वअभ्यास
- तज्ञ व अनुभवी शिक्षक

संपर्क - सुयश गुरूकुल
एस.आर.पी कॅम्प समोर, विजापूर रोड, सोलापूर.
मो.- ७६२०७०९२३७, ९७३०७०१४०७

# पंतप्रधान नरेंद्र मोदी घेणार मंत्र्यांची परीक्षा

● मंत्रिमंडळ बैठकीत करावे लागणार कामाचे सादरीकरण ● २ मार्चपर्यंत तपशील देण्याचा निर्देश

◆ **नवी दिल्ली, २६ फेब्रुवारी**

जून २०२४ नंतर अंमलात आणलेल्या योजना आणि केलेल्या कामांच्या माहितीचे सादरीकरण केंद्रीय मंत्र्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समक्ष करावे लागणार आहे. पंतप्रधान कार्यालयांकडून सर्व विभागांना त्यासंदर्भात माहिती देण्यात आली. दोन मार्चपर्यंत कामाचा तपशील सादर करण्याचे निर्देश सर्व विभागांना दिले आहे.

मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी पंतप्रधानांच्या उपस्थितीत सर्व मंत्र्यांना शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि त्यांनी केलेल्या कामाचा तपशील सादर करावा लागेल. यावेळी मोदी विविध विभागाच्या कामाचा आढावा देखील घेणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात मंत्रालयांनी राबवलेल्या सुधारणा आणि कामांच्या परिणामांची माहिती सादर करावी लागेल. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर कॅबिनेट सचिव टी.व्ही. सोमनाथन यांनी यासंदर्भात आदेश काढला आणि सर्व विभागांना त्याची प्रत पाठवली. पंतप्रधानांना प्रत्येक मंत्रालयाकडून सादरीकरण हवे आहे. प्रत्येकाने पुढील मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी कामाचा तपशील सादर करायचा आहे. त्यानंतर, निश्चित करण्यात येणाऱ्या तारखेला पंतप्रधानांच्या उपस्थितीत यासंदर्भात सादरीकरण करायचे असल्याचे आदेशात नमूद आहे.

**मंत्री, अधिकाऱ्यांची कसोटी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः उपस्थित राहणार असल्याने, प्रेझेंटेशन उत्कृष्ट बनवण्यासाठी मंत्री प्रयत्नरत आहे. कॅबिनेट सचिवांनी सर्व विभागांना एक तपशीलवार नमुना दिला आहे. त्यांनी तो भरावा आणि कोणत्या सुधारणा लागू केल्या आणि त्यांचा काय परिणाम झाला, हे तीन ते चार श्रेणींमध्ये स्पष्ट करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील मंत्रिमंडळ बैठकीपासून सादरीकरणाची प्रक्रिया सुरू होईल. *(वृत्तसंस्था)*



### विभागस्तरावर सादरीकरणाची तयारी

**आदेशाची प्रत मिळाल्यापासून सर्व विभागांमध्ये गोंधळ उडाला आहे. मंत्री आणि त्यांचे अधिकारी सध्या प्रेझेंटेशनची तयारी करण्यात व्यस्त आहे. जनतेशी संबंधित असलेल्या आणि त्यांच्यावर थेट परिणाम करणाऱ्या सुधारणांकडे विशेष लक्ष दिले जात आहे. सर्व मंत्रालयांना २ मार्चपर्यंत लागू केलेल्या बदलांचा आणि त्यांच्या परिणामाचा तपशीलवार सारांश सादर करायचा असल्याचे एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले.**

# महाराष्ट्र ट्रिलियन डॉलर इकोनॉमी झाल्यावर जगात १३ व्या क्रमांकावर पोहोचणार : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई** - राज्याची अर्थव्यवस्था हाफ ट्रिलियन डॉलरच्या वर गेली आहे. महाराष्ट्र ट्रिलियन डॉलरवर पोहोचल्यावर आपण देशातील अनेक देशांना मागे टाकणार आहे. महाराष्ट्र ट्रिलियन डॉलर इकोनॉमी झाल्यावर जगातील १३-१४ व्या क्रमांकावर पोहोचणार असल्याचा दावादेखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केला.

राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवार २३ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली आहे. बुधवारी विरोधकांनी विविध प्रश्नांवरून सरकारला धारेवर धरले होते. तर सरकारकडून शासकीय कर्मचाऱ्यांच्या डीएमध्ये तीन टक्के वाढ करण्याची घोषणा केली होती. गुरुवारी अधिवेशनाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी महाविकास आघाडीच्या बैठक पार पडली. अधिवेशनात आघाडीची रणनीती, सभागृहातील कामकाज यावर बैठकीत चर्चा झाली. गुरुवारी अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी मुख्यमंत्री फडणवीसांनी दमदार भाषण करत विरोधकांच्या प्रश्नांवर समर्पक उत्तरे देत दिवस गाजवला. मुख्यमंत्री फडणवीसांनी पुढील मुद्द्यांवर विरोधकांना टोमणे मारताना अनेक विकासाचे मुद्दे मांडले. विरोधक संभ्रमात

### राज्यात किती मराठी शाळा बंद पडल्या?

मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत असल्याच्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपण सगळे आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत शिकवतो आणि इथे बसून मराठी शाळा बंद असल्याच्या चर्चा करत आहोत. या पाठीमागे नुसती आपली भावना असून फायदा नाहीये. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सगळे शिक्षण मातृभाषेत घेण्याची तरतूद केली, त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. नाहीतर कुणी मराठी आपली मातृभाषा कशी शिकेल? २ हजार मराठी शाळा बंद करणार, ६५ हजार मराठी शाळा बंद पडल्या, हे आकडे इतक्या आत्मविश्वासाने येतात कुठून? हे मला समजत नाही. त्यामुळे मी आकडेवारीच घेऊन आलोय. आजही आपल्याकडे ८४ टक्के शाळा मराठी माध्यमाच्या आहेत. या शाळांमध्ये एकूण ७० टक्के विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १६ हजार शाळा स्वयंअर्थसाहित आहेत. इंग्रजी शाळांमध्ये ६५ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### कुंभमेळ्यातून जगात महाराष्ट्राचे ब्रँडिंग करायचे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जयंत पाटील आणि विजय वडेट्टीवार यांना तुम्ही नेहमी कुंभमेळ्यावर का येता? कुंभमेळ्याबद्दल तुम्हाला एवढा काय राग आहे? असा सवाल करत, कुंभमेळ्याव एवढा पैसा का खर्च होतोय याबाबत माहिती दिली. ते म्हणाले, कुंभमेळा हा जगातील अमूर्त वारसा आहे. जगात इतक्या मोठ्या प्रमाणात अशाप्रकारचा मेळावा होत नाही. कुंभमेळ्याती कुणी कुणाला जात विचारत नाही. कुंभमेळ्यामध्ये आपण ज्या व्यवस्था करत आहोत, त्या त्यातपुरत्या नाहीयेत. कुंभमेळ्यात केलेल्या व्यवस्थांमुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळेल. अयोध्या मंदिर आणि काशिनाथ विश्वनाथ कॉरिडोरमुळे १०-१० कोटी लोक तिथे जात आहेत. त्याने राज्याची अर्थव्यवस्था बदलून गेली. कुंभमेळ्यातील ज्या गोष्टी लगेच संपणार आहेत, अशांवर फार कमी करत आहोत. शाश्वत विकासाच्या व्यवस्थांवर लक्ष केंद्रीत केलेले आहे. एका कुंभमेळाने उत्तर प्रदेशचे ब्रँडिंग संपूर्ण जगात झाले. आपल्यालाही नाशिक कुंभमेळ्यातून जगात महाराष्ट्राचे ब्रँडिंग करायचे आहे. त्यादृष्टीकोनातून कुंभमेळा नीट झाला पाहिजे, व्यवस्था नीट राहिल्या पाहिजे, सोयी नीट करता आल्या पाहिजे, गर्दी व्यवस्थापन योग्य झाले पाहिजे, या सगळ्या गोष्टी आपल्याला करायच्या आहेत.

### महाराष्ट्र आता देशातील स्टार्टअप्स हब

देशाचे स्टार्टअप हब आता महाराष्ट्र आहे. देशातील एकूण नोंदणीपैकी २० टक्के स्टार्टअप्स महाराष्ट्रात आहेत. देशात एकूण ११९ युनिकॉर्न आहेत, त्यापैकी २८ म्हणजेच २५ टक्के युनिकॉर्न महाराष्ट्रात आहे. त्यामुळे स्टार्टअप कॅपिटल म्हणून आपण महाराष्ट्राकडे पाहू शकतो.

### गडचिरोलीला स्टील सिटी बनवण्याचे काम करू

गडचिरोलीतील गुंतवणुकीसंदर्भात मुख्यमंत्री म्हणाले, आज आपण गडचिरोलीतील नक्षलवाद संपवू शकलो, कारण तिथल्या लोकांच्या मनात ही भावना आपण तयार करून शकलो की होणारा विकास तुमच्यासाठी आहे. गोंडवाना विद्यापीठाने ऑस्ट्रेलियाच्या कर्टन विद्यापीठासोबत संयुक्ताने मायनिंग संदर्भात कोर्स चालू केला आहे. ४० आदिवासी विद्यार्थी कर्टन विद्यापीठात शिकायला गेलेले आहेत आणि मायनिंग इंजिनिअरींगचे शिक्षण घेत आहेत. आजही तेथील लोकांना भ्रमित करणे, आदिवासी संस्कृती संपवून जाईल असे सांगणे, हा प्रयत्न चाललाय. परंतु हा प्रयत्न यशस्वी होणार नाही. गडचिरोलीच्या सामान्य माणसाला सोबत घेऊन गडचिरोलीला स्टील सिटी बनवण्याचे काम करू.

### महायुतीचे सरकार आल्यापासून १.२० लाख सरकारी नियुक्त्या

सरकारी नियुक्त्यांच्या संदर्भात बोलतान मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महायुतीचे सरकार आल्यापासून १ लाख २० हजार ४४९ लोकांना नियुक्त्या दिलेल्या आहेत. अजून काही नियुक्तीपत्रे शिल्लक आहेत. ते दिल्यानंतर हा आकडा दीड लाखापर्यंत जाईल. २०२२ साली आम्ही ७५ हजार सांगितले होते, पण आम्ही दीड लाखापर्यंत जात आहोत. तसेच नव्याने भरतीचे सत्र देखील सुरू करणार आहोत.

### बेरोजगारीचा दर सातत्याने खाली आणत आहोत

बेरोजगारीच्या मुद्द्यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशाच्या आर्थिक पहाणीत या सगळ्या मिळतात. कुठला तरी पेपर छापतो, महाराष्ट्रात बेरोजगारीचा दर ११. ६० टक्के. मला आश्चर्य वाटले. पण कुणाच्याच काळात आपला बेरोजगारीचा दर १० टक्क्यांवर पोहोचला नाही. इतकी बेरोजगारी महाराष्ट्रात कधीच नव्हती. सातत्याने हा दर खाली आणत आहोत. बेरोजगारीचा दर २०२१-२२ मध्ये ४ टक्के होता. २०२३-२४ मध्ये ३.३ टक्क्यांपर्यंत खाली आणला. २०२५ साली बेरोजगारीचा दर ३.१ टक्के आहे. आधीच्या वर्षांपेक्षा कमी झालेला आहे. माझी माध्यमांना विनंती आहे की, या सगळ्या गोष्टी समजून घेऊन आणि वास्तिवक आकडेवारीच्या आधारावर मांडल्या तर ते अधिक योग्य असते, असे फडणवीस म्हणाले.

### आम्ही दावोसला फक्त फिरायला जातो असे नाही

मुख्यमंत्री फडणवीस, आम्ही दावोसला फिरायला गेलो आणि काहीतरी करायचे म्हणून कागदांवर सह्या करून आलो, अशी टीका होत असते. पण तसे नाहीये. दावोस हा गंभीर व्यवसाय आहे आणि तो बिझनेस करून आम्ही येतो. देशाची एकूण जेवढी थेट परकीय गुंतवणू आहे, त्याच्या ३९ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात येते. यामध्ये एमओयू आणि थेट परकीय गुंतवणुकीत फरक काय आहे? तर एमओयू हा इरादा आहे आणि एफडीआयचे जे आकडे येतात, ते आरबीआय झालेली गुंतवणूक म्हणजे आलेले पैसे सांगते. परकीय गुंतवणूक म्हणजे वादा किंवा इरादा नाहीये. देशात प्रत्यक्ष जे पैसे आले, ते सांगितले जाते. त्यातही महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. एकूण देशाच्या ३९ टक्के एफडीआय गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.

### लोढांनी डेटा सेंटर्सच्या वतीने करार केला

मुख्यमंत्री म्हणाले, मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या मुलासोबत करार केल्यानंतर अनेकांनी टीका केली. इथे बसून त्यांच्याशी करार का केला नाही? अशी विचारणाही केली. पण लोढा यांचे सुपुत्र हे देशातील लिडिंग उद्योजक आहेत. त्यांच्यासोबत आपण १ लाख कोटी रुपयांचा एफडीआयची डेटा सेंटर मधील गुंतवणुकीबाबत करार केला आहे. जागा आणि सगळ्या व्यवस्था करणे हे लोढांचा काम आहे. त्यामध्ये मेझॉन, एसटीटी, मायक्रोसॉफ्ट यांसारख्या जगातील मोठ्या डेटा सेंटर कंपन्या यांच्यासोबत करार केलेला आहे. तो लोढांसोबतचा करार नाहीये. लोढांनी डेटा सेंटरर्स कंपन्यांच्या वतीने केलेला करार आहे.

### महाराष्ट्रातील सगळ्या भागात गुंतवणूक आली

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या एकूण गुंतवणुकीमध्ये ८३ टक्के परकीय गुंतवणुकीचा समावेश आहे. यूएसए, युके, डेन्मार्क, स्वीडन, जपान, स्वित्झर्लंड यांसारख्या १८ देशांच्या कंपन्यांसोबत हे करार आहेत. स्कोडा, फोक्सवॅगन, एसआर, टाटा सन्स, कोकाकोला, बॉश यांसारख्या अनेक कंपन्या आहेत. त्यात एआय, डेटा सेंटर, क्वॉन्टम कम्प्युटिंग, शाश्वत विकास, कृषि तंत्रज्ञान, सेमिकंटर, अन्न प्रक्रिया, इलेक्ट्रीक वाहने, शिक्षण, डिजिटल पायाभूत सुविधा यांसारखे उद्योग आहेत. महाराष्ट्रातील सगळ्या भागात ही गुंतवणूक आली आहे. उत्तर महाराष्ट्रातून नेहमी तक्रार असते. मात्र आता उत्तर महाराष्ट्रातील पाचही जिल्ह्यांमध्ये गुंतवणूक आली आहे.



### काही एमओयू पूर्ण का होत नाहीत?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सगळे करार १०० टक्के पूर्ण होतात मी असेही म्हणत नाही. देशात होणाऱ्या एमओयू पैकी ३५ टक्के एमओयू गुंतवणुकीत बदलतात. पण महाराष्ट्राने नेहमची हा दर ५५ टक्क्यांच्या वर ठेवला आहे. दावोसच्या संदर्भात तो दर ७५ टक्क्यांच्यावर आहे. काही एमओयू हे जिओ पॉलिटिकल सिच्युएशन बदलल्यामुळे पुढे जाऊ शकले नाहीत. उदाहरणार्थ काहींनी २०२३ आणि २०२४ साली आपल्याशी करार केला. त्यात काही चायनीज इनपुट्स होते. त्यावर आपण बंदी आणल्यामुळे आपण ते पुढे नेऊ शकत नाहीत. २०२६ साली ३१ लाख २५ हजार ८८२ कोटींचे करार केलेत. यामध्ये ६७ सामंज्यस करार उद्योग विभागाचे आहेत. त्यामुळे उद्योगाच्या क्षेत्रात १५ लाख १५ हजार १८२ कोटी रुपये आहेत. काही सामंज्यस करार एमएमआरडीएने केलेले आहेत. ज्यामध्ये स्मार्ट सिटीमधील, मोबिलिटीमधील गुंतवणूक आहे. जवळपास १० लाख कोटींचे करार अजून असे आहेत की जिथे होऊ शकले नाहीत. पण दावोसमध्ये त्याची चर्चा झाली आणि आता त्यांचे अधिकारी उद्योग विभागाशी चर्चा करत आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले.

### २०२५ मधील ८८ करार वेगवेगळ्या स्टेजवर

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दावोसमधील करारानंतर वेगवेगळ्या स्टेजेच असतात. यात गुंतवणुकदाराला गंभीर कधी मानतो? ज्यावेळेस तो जागा घेतो आणि क्लिअरन्सेसे घेतो, त्यावेळी तो ज्येन्युयन इन्व्हेस्टर समजायचा. अंमलबजावणीची टक्केवारी बघितली तर, २०२२ जे करार केले होते त्यातील ९८ टक्के करारांमध्ये आपण त्या स्टेजला गेलोय. २०२३ मध्ये १ लाख ३७ हजार ३९३ कोटींचे १९ करार केले होते. त्यातील ८० टक्के अंमलबजावणीत आहेत. २०२४ मध्ये ३ लाख १६ हजार ७३९ कोटींचे २४ करार केले होते. त्यातील ७० टक्के अंमलबजावणीत आहेत. २०२५ मध्ये आपण १२ लाख २३ हजार ८१ कोटी रुपयांचे ४८ करार केलेत. त्यातील ८८ टक्के करार वेगवेगळ्या स्टेजवर आहेत.

### दावोसमध्ये नेमके काय होते?

फडणवीस म्हणाले, दावोसमध्ये नेमके काय होते? असा प्रश्नही योग्य आहे. पहिल्यांदा आपण गुंतवणुकीचे सायकल लक्षात घेतले पाहिजे. तुम्ही एमओयू केल्यानंतर प्रोडक्शनला जाण्यासाठी मॅक्सिमम उद्योग पाच वर्ष घेतात. मोठे उद्योग सात वर्ष घेतात. काही उद्योग मात्र दोन वर्षांत देखील प्रॉडक्शनला जातात. २०२५ च्या दावोसमध्ये आपण छत्रपती संभाजीनगरमध्ये जेएसडब्ल्यूचा करार केला. त्यांनी इतक्या वेगाने काम केले की, त्यांची पहिली इव्ही तयार होत आहे. त्यामुळे दरवर्षी दावोसमध्ये करार करावे लागतील. यातील काही दोन वर्षांत, काही तीन वर्षांत, काही पाच, तर काही सात वर्षांत प्रत्यक्षात येतील. आपण त्यांना इन्सेटिव्ह एका वर्षात देत नाहीत. कंपनीचे प्रॉडक्शन आल्यावर देतो.

---

# स्वातंत्र्यवीर सावरकरांना 'भारतरत्न' पुरस्कार द्या

## आ. प्रसाद लाड यांची विधिमंडळात मागणी

**मुंबई** : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात यावा, अशी मागणी आज विधानपरिषदेत करण्यात आली. भाजप आमदार प्रसाद लाड यांनी उपस्थित केलेल्या या मागणीवर राज्य सरकारने सकारात्मकता दर्शवली असून, यासंदर्भातील ठराव लवकरच सभागृहात मांडण्यात येईल, असे संकेत संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत.



गेल्या १० वर्षांपासून केंद्रात आणि राज्यात सावरकरांच्या विचारांचे अनुकरण करणारे सरकार असतानाही अद्याप हा सन्मान का मिळाला नाही, असा प्रश्न विविध संघटनांकडून वारंवार उपस्थित केला जातो. तर विरोधकांनी या मुद्द्यावरून वेळोवेळी सत्ताधारी भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. या पार्श्वभूमीवर झालेली चर्चा महत्त्वाची मानली जात आहे. आज स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी असल्याने विधान परिषदेच्या सभागृहात त्यांच्या बलिदानाची आणि विचारांची आठवण करून देण्यात आली. विधानपरिषदेत बोलताना आमदार प्रसाद लाड म्हणाले की आज स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी आहे. सावरकरांच्या हिंदुत्ववादी विचारांवर चालणारे सरकार आज राज्यात आणि केंद्रात आहे. त्यामुळे त्यांना भारतरत्न मिळावा, यासाठी आपण या सभागृहात एकमताने ठराव मंजूर करून तो केंद्र सरकारकडे पाठवावा. आमदार प्रसाद लाड यांच्या मागणीला उत्तर देताना मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सकारात्मकता दर्शवली. आम्ही यासंदर्भातील प्रस्ताव सभापती महोदयांकडे मांडू. शासनाला असा प्रस्ताव सभागृहात आणावा लागेल आणि त्यानंतर त्यावर निर्णय घेतला जाईल, असे पाटील यांनी स्पष्ट केले. याम

### सावरकरांमुळे पुरस्काराचेच महत्त्व वाढेल : सरसंघचालक

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शतकोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर सरसंघचालक मोहन भागवत यांनीही अलीकडेच सावरकरांच्या भारतरत्नबाबत भाष्य केले होते. सावरकरांना भारतरत्न मिळाल्यास त्या पुरस्काराचेच मोल आणि महत्त्व अधिक वाढेल, असे उद्गार त्यांनी काढले होते. गेल्या १० वर्षांपासून केंद्रात आणि राज्यात हिंदुत्ववादी विचारांचे सरकार असूनही अद्याप हा सन्मान का मिळाला नाही, असा प्रश्न विरोधकांकडून वारंवार विचारला जात होता. आता विधिमंडळातील या नव्या हालचालींमुळे हा तिढा सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

---

# उड्डाणपूल, बी टू, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, संभाजी तलाव आदी प्रश्नांकडे अधिवेशनात वेधले लक्ष

## आमदार देवेंद्र कोठे यांनी मांडले प्रश्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार देवेंद्र कोठे यांनी बुधवारी रात्री उशिरा शहरातील बी टू, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, उड्डाणपूल अन् धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज तलाव विकासाबाबत शासनाकडे मागण्या केल्या.

सोलापूर शहरातील १३ कामगार चाळी, २१ सोसायटी आणि इतर अनेक जागांवर चुकीच्या पद्धतीने बी टू लावण्यात आलेला आहे. तत्कालीन ब्रिटिश जिल्हाधिकाऱ्यांनी शहराचा विकास करताना या जमिनी लोकांना विकल्या होत्या. मागील ६० ते ७० वर्षांमध्ये या भागातील खरेदी-विक्री थांबलेली नव्हती. बांधकाम परवाने, वापर परवाने देखील मिळत होते. परंतु महाविकास आघाडी सरकारच्या काळात यावर बंदी आणल्याने बांधकाम परवाना व खरेदी विक्री करता येत नाही.



यातील काही चाळी १०० वर्षे जुन्या आहेत. त्यामुळे त्या पडल्यास याठिकाणी जीवितहानी होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाने चुकीच्या पद्धतीने लावण्यात आलेला बीटू माफ करावा आणि शहराच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावावा. सोलापूर शहरासाठी मंजूर झालेल्या दोन उड्डाणपूलांचे काम केंद्र आणि राज्य सरकारच्या जागा हस्तांतरित न झाल्यामुळे रखडले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत लवकरात लवकर बैठक घेऊन या जागा हस्तांतरित करण्याबाबत आदेश द्यावेत,.

सोलापूर शहराला ३६५ दिवस २४ तास पाणीपुरवठा करता यावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ८९२ कोटी रुपयांची योजना नव्याने मंजूर केली आहे. सोलापूरसाठी समांतर जलवाहिनीदेखील पूर्ण झालेली आहे. या योजनेच्या पूर्ततेसाठी जागतिक बँकेकडून अर्थसहाय्य मिळणार असून २०४७ सालचा विचार करुन जागतिक बँकेने सुचवलेल्या सुधारणा शासनाने स्वीकारल्यामुळे हे काम लवकरच पूर्णत्वास जाईल. विजयपूर रस्त्यावरील धर्मवीर संभाजी महाराज तलाव विकसित करण्याची गरज आहे. त्याकरिता ५० कोटी रुपयांचा विस्तृत प्रकल्प अहवालदेखील तयार करण्यात आला आहे. हा तलाव परिसर विकसित केल्यास पर्यटकांना चांगले पर्यटन स्थळ उपलब्ध होईल, असेही विविध विकासात्मक प्रश्न आ. देवेंद्र कोठे यांनी मांडले.

### ६० वर्षे प्रलंबित असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रश्न

सोलापुरातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रश्न गेल्या ६० वर्षांपासून प्रलंबित आहे. सोलापूरसाठी मंजूर झालेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय इतर शहरात वळविण्यात आले. याबाबत मागणी केल्यानंतर तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रयत्न करुन सोलापूरला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला मंजुरी मिळवून दिली. तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या ३४ एकर जागेवर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करता येईल. याकरिता २५० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून याच अर्थसंकल्पात त्याकरिता तरतूद करावी, अशी मागणीही आमदार देवेंद्र कोठे यांनी अधिवेशनात केली.

### स्वतंत्र विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाची गरज

महाराष्ट्र राज्याचे स्वतंत्र विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय सुरू करावे. या माध्यमातून उद्योग, शेती, पाणी, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, शहरी नियोजन या क्षेत्रात चांगले काम करता येईल. त्यामुळे सरकारने स्वतंत्र विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय सुरू करावे, अशी मागणी देवेंद्र कोठे यांनी अधिवेशनात केली.

### सोलापूरच्या विकासासाठी मुख्यमंत्री फडणवीस आग्रही

सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आग्रही आहेत. त्यामुळे मागील वर्षभरात सोलापूरकरांतर्फे मांडलेल्या जवळपास सगळ्या मागण्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली आहे. उर्वरित विकासकामेही लवकरच पूर्ण होतील, असा विश्वास आहे. सोलापूरकरांना दिलेला विकासाचा शब्द पूर्ण करण्यासाठी कटिबध्द आहे, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

---

# टिपू सुलतानने ७५ हजार हिंदूंची कत्तल केली : मुख्यमंत्री

## तो इंग्रजांशी लढला, पण स्वत:चे राज्य वाचवण्यासाठी

**मुंबई** - टिपू सुलतान चांगला होता की नाही हा नंतरचा प्रश्न आहे, पण त्याची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी करणे आणि त्याला शिवरायांपेक्षा मोठे दाखवण्याचा प्रयत्न करणे, हे आम्ही कदापि सहन करणार नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना ठणकावून सांगितले. गुरुवारी विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी इतिहास, अर्थव्यवस्था, गुंतवणूक आणि रोजगार अशा विविध मुद्द्यांवर सरकारची बाजू भक्कमपणे मांडली.

गेल्या अनेक वर्षांपासून देशाच्या इतिहासाचे चुकीचे सादरीकरण केले गेल्याचा आरोप करत फडणवीस म्हणाले की, दशकांपासून आपल्याला टिपू सुलतान हा महान राजा असल्याचे शिकवण्यात आले. मात्र, त्याने ७५ हजार हिंदू आणि ३३ हजार नायरांची केलेली क्रूर कत्तल हे कधी शिकवण्यात आले नाही. टिपू सुलतान इंग्रजांशी लढला हे खरे आहे, पण तो देशासाठी नाही तर स्वत:चे राज्य वाचवण्यासाठी लढला, हे आपल्याला कधीच सांगण्यात आले नाही. आता खरा इतिहास समोर येत आहे. वर्षानुवर्षे देशात एनसीआरटीच्या पुस्तकात मोघली साम्राज्याला १७ पाने देण्यात आली, छत्रपती शिवाजी महाराजांविषयी या पुस्तकात एकच परिच्छेद होता. आता मोदी सरकारने एनसीआरटीच्या पुस्तकात मराठ्यांच्या इतिहासाला २० पानं दिली आहेत. योग्यवेळी नीट इतिहास शिकवला असता तर आज देशातील एकाही मुसलमानाने औरंगजेबाला हिरो म्हटले नसते. पण आपण खरा इतिहास कधीच शिकवला नाही. या देशात राष्ट्रभक्त मुसलमान आहेत. मला त्यांच्याविषयी कुठलाही आक्षेप नाही. पण जे लोक देशाच्या विरोधकांना आणि आक्रमणकाऱ्यांना हिरो मानतील, त्यांना आम्ही सोडणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.

### मुख्यमंत्र्यांची शेरोशायरी

*मंजिले और भी है, रास्ते और भी है ।*
*मंजिले और भी है, रास्ते और भी है ।*
*हम खडे है जहाँ, वहाँ वास्ते और भी है ।*
*बढ रहे है अब कदम, उस मंजिल की तलाश में,*
*दिल में जुनून और इरादों में ताकद और भी है ।*

### शेतकऱ्यांना १५ हजार ४७२ कोटी रुपयांची थेट मदत

विधानसभेत बोलताना, मागच्या वर्षी शेतकऱ्यांवर जे संकट आलं त्यावेळी आपण शेतकऱ्यांना १५४७२ कोटी रुपयांची थेट मदत केली. हे पैसे शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात पोहोचले. हे पैसे डीबीटीच्या माध्यमातून दिलेले आहेत. शेतकरी जिथे अडचणीत आहेत, तिथे सरकार उभे आहे, असे अश्वासन फडणवीस यांनी दिले.

### कर्जमाफीचे आश्वासन योग्यवेळी पूर्ण करणार

तसेच, कर्जमाफीबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आम्ही एक समिती तयार केलेली आहे. या समितीचा अहवाल अपेक्षित आहे. कर्जमाफीच्या संदर्भात आम्ही जे आश्वासन दिलेले आहे ते आम्ही योग्य वेळी पूर्ण करणारच आहोत, असे फडणवीस म्हणाले. मागच्या अनेक कर्जमाफीमध्ये आम्हाला काही गोष्टी लक्षात आलेल्या आहेत. बँका चुकीच्या पद्धतीने खात्यांची माहिती देतात. जुने बँक खाते काढून सरकारकडून पैसे घेतात. ही फसवणूक रोखण्यासाठी शंभर टक्के ग्री स्टॅक तयार करत आहोत, अशी माहितीही त्यांनी दिली. आपण शेतीचा डिजिटल रेकॉर्ड तयार करत आहोत.

# मानवकेंद्रित विकासाला दहशतवाद अडथळा

## जयशंकर यांचा पाकिस्तानवर निशाणा • संघर्षाऐवजी संवादावर भर

**नवी दिल्ली, २६ फेब्रुवारी**

राजकारण, दुहेरी मानके आणि वादविवादात अडकण्याऐवजी मानवकेंद्रीत विकासाला प्राधान्य देणे हेच भारताचे धोरण आहे. मानवी हक्क आणि विकासासाठी दहशतवाद मोठा अडथळा ठरत असल्याचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटले आहे. पाकिस्तानवर अप्रत्यक्ष निशाणा साधताना त्यांनी उपरोक्त टिप्पणी केली.

संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेच्या ६१ व्या सत्राला आभासी पद्धतीने संबोधित करताना जयशंकर म्हणाले, संघर्ष, ध्रुवीकरण आणि अनिश्चिततेच्या जगात संवादच एकमेव मार्ग आहे, ज्यातून शांतता प्रस्थापित करणे शक्य आहे. भारताने सातत्याने संघर्षाऐवजी संवाद, संकुचित हितसंबंध बाजूला ठेवून मानवकेंद्रित विकासावर भर दिला आहे. वादविवादात अडकण्याऐवजी, लोकांचे जीवनमान सुधारणे भारताचे ध्येय आहे. दहशतवादाचा प्रतिकार करण्यासाठी जगाने ठाम भूमिका घेण्याची गरज आहे. सर्वात असुरक्षित लोकांच्या जीवनात सुधारणा घडविण्याला प्राधान्य दिल्यास शांततेचा मार्ग प्रशस्त होईल.

मानवाधिकार परिषदेने मानवी हक्कांप्रती असलेली त्यांची वचनबद्धता साकार करण्यासाठी, 'दहशतवादी कृत्यांसाठी शून्य सहिष्णुता' धोरणाचा पुरस्कार करायला हवा. दहशतवाद हा मानवी हक्कांच्या सर्वात घृणास्पद उल्लंघनांपैकी एक आहे आणि त्याचे कोणतेही समर्थन केले जाऊ शकत नाही. (वृत्तसंस्था)

### संवाद, भागीदारी, क्षमता निर्माण करण्यावर विश्वास



जयशंकर म्हणाले, भारताची अलीकडेच सातव्यांदा मानवाधिकार परिषदेवर निवड झाली, महासभेत १८८ पैकी १७७ मते मिळणे, हे जागतिक समुदायाची भारतावरील विश्वासार्हता दर्शवते. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून, भारत सर्व लोकांच्या समानता आणि प्रतिष्ठेच्या आधारावर मानवी हक्कांचे संरक्षण करण्यास कटिबद्ध आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमुळे लाखो लोकांना कल्याणकारी योजना, वित्तीय सेवा आणि सरकारी सुविधांमध्ये पारदर्शक प्रवेश मिळाला आहे आणि भारत जागतिक फायद्यासाठी आपला अनुभव सामायिक करत आहे.

# व्याप्त काश्मीर खाली करा

**संयुक्त राष्ट्रे, २६ फेब्रुवारी**

जम्मू आणि काश्मीर भारताचा अविभाज्य होता, आहे आणि नेहमीच राहील. १९४७ मध्ये या प्रदेशाचा भारतात समावेश होणे भारतीय स्वातंत्र्य कायदा आणि आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार पूर्णपणे कायदेशीर आहे. या प्रदेशाबाबतचा एकमेव प्रलंबित वाद म्हणजे पाकिस्तानने भारतीय भूभागांवर केलेला बेकायदेशीर ताबा आहे. व्याप्त काश्मिरात बळजबरीने ताबा मिळविला असून, तातडीने हा भाग खाली करावा अशा शब्दांत संयुक्त राष्ट्रांतील भारताच्या प्रतिनिधी अनुपमा सिंह यांनी पाकिस्तानचा समाचार घेतला.



संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार परिषदेच्या ५५ व्या सत्रात पाकिस्तानने काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला, त्यावर आक्षेप घेत सिंह म्हणाल्या, पाकिस्तान अस्तित्वात नसलेल्या जगात वावरत आहे. तुम्हाला जागतिक संस्थांकडून मिळणाऱ्या एकूण कर्जापेक्षा कैकपटीने अधिक जम्मू-काश्मीरचा अर्थसंकल्प असतो. स्वतःच्या लोकांच्या गरजा भागविण्यासाठी कर्जासाठी झोळी घेऊन भटकणाऱ्यांनी भारताला शिकवण देण्याची आवश्यकता नाही. भारतीय स्वातंत्र्य कायदा आणि आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार संपूर्ण काश्मीर भारताचा भूभाग आहे. बळजबरीने ताब्यात घेतलेला व्याप्त काश्मीर तातडीने खाली करावा. जम्मू काश्मीरच्या विकासाचे बजेट हे पाकिस्तानला मिळणाऱ्या बेलाऊट पॅकेजच्या दुपटीहून अधिक आहे. पाकिस्तान मदत मिळावी म्हणून कटोरा घेऊन आयएमएफच्या समोर उभा राहतो हे तुमच्याच पंतप्रधानांनी कबूल केले आहे. त्यांच्या टिप्पणीने पाकिस्तानच्या अब्रूची लक्तरे त्यांनी जगाच्या वेशीवर टांगली गेली, याचे भान नसलेल्यांना भारतावर टीका करण्याचा अधिकार नाही. (वृत्तसंस्था)

**युनोत भारताने पाकिस्तानला सुनावले**

### भारताच्या विकासाने जळफळाट

भारताविरोधात पाकिस्तानचा प्रचार मत्सरामुळे सुरू आहे. भारताच्या विकासाने त्यांचा जळफळाट होत असल्याची जाणीव आम्हाला आहे. दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या देशाला काश्मीरवर बोलण्याचा अधिकार नाही. या प्रदेशावर उपस्थित केलेले सर्व मुद्दे बिनबुडाचे आहेत.

### हिंसाचाराला काश्मिरींनी नाकारले

जम्मू आणि काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीत झालेल्या विक्रमी मतदानामुळे तेथील लोकांनी पाकिस्तानने पसरवलेल्या दहशतवाद आणि हिंसाचाराच्या विचारसरणीला नाकारले आहे आणि ते विकास आणि लोकशाहीच्या मार्गावर पुढे जात असल्याचा हा पुरावा आहे. पाकिस्तान आयओसी या संघटनेच्या हातचे बाहुले झाला आहे. राजकीय फायदा व्हावा म्हणून या संघटनेचा वापर सोयीस्करपणे केला जातो. संघटनाही पाकिस्तान सरकारचा वापर करते, असा टोला सिंह यांनी लगावला.

# ब्राझीलमध्ये महापूर; ४६ नागरिकांचा मृत्यू

**रिओ डी जानेरो, २६ फेब्रुवारी**

ब्राझीलच्या ईशान्य भागात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, आतापर्यंत पुरात वाहून आणि भूस्खलनामुळे ४६ नागरिकांचा मृत्यू झाला, तर अनेक जण बेपत्ता आहेत. हजारो लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थानांतरित करण्यात आले.

पुराचे पाणी निवासी भागात साचले आहे. बचाव कार्यासाठी आपत्ती प्राधिकरणाचे पथक तैनात करण्यात आले असून, युद्धपातळीवर बेपत्ता नागरिकांचा शोध घेतला जात आहे. पूरस्थितीमुळे आतार्पत दोन लाख लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. अचानक आलेल्या पुरामुळे मृतांचा आकडा ४६ वर पोहोचला आहे. हवामानशास्त्रज्ञांनी इशारा दिला आहे की पुढील काही दिवसांत या प्रदेशात आणखी पाऊस पडण्याची शक्यता आहे. मिनास गेराइस राज्यात परिस्थिती बिकट बनली आहे. बचाव पथक परिस्थिती नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत आहेत. जुईझ दे फोरा आणि उबा या शहरांमध्ये पूर आणि भूस्खलनामुळे अंदाजे ३,६०० लोक विस्थापित झाले आहेत. (वृत्तसंस्था)

# संतोष कराडचा जामीन फेटाळा

**मुंबई, २६ फेब्रुवारी**

बहुचर्चित सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी वाल्मिक कराडला मोठा झटका बसला आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळत सुनावणीस नकार दिला.

न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश यांच्या समोर गुरूवार या अर्जावर सुनावणी झाली. यापूर्वी १९ फेब्रुवारीला या प्रकरणाची प्राथमिक सुनावणी पार पडली होती. या निर्णयामुळे कराडला तातडीचा दिलासा मिळाला नाही. मात्र, खटल्याची सुनावणी पुढे सरकत नसेल तर वर्षभरानंतर पुन्हा जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात अर्ज करण्याची त्याला संधी राहणार आहे. (वृत्तसंस्था)

# बसपा आमदाराकडे सापडली १० कोटींची रोख

## बेहिशेबी मालमत्ता प्रकरणी आयकर विभागाची कारवाई



**लखनौ, २६ फेब्रुवारी**

करचोरी आणि बेनामी मालमत्तेशी संबंधित प्रकरणात आयकर विभागाने टाकलेल्या छाप्यात बहुजन समाजवादी पक्ष अर्थात् बसपाचे बलियाच्या रासरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार उमाशंकर सिंह आणि त्यांचे व्यावसायिक भागीदाराचे घर आणि कार्यालयातून दहा कोटींची रोख जप्त करण्यात आली.

उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ येथील सिंह यांच्या निवासस्थानासह कार्यालयात एकाचवेळी छापा टाकण्यात आला. लखनौ, बलिया, सोनभद्र, कौशाम्बी, मिर्झापूर आणि प्रयागराज येथील ३० हून अधिक ठिकाणी एकाचवेळी छापे टाकण्यात आले. यात ५० हून अधिक आयकर कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. पथकाने सिंह यांची छत्रशक्ती कन्स्ट्रक्शन कंपनीचे कॉर्पोरेट कार्यालय आणि वजीर हसन रोड येथील निवासी त्यांचे भागीदार फैजी यांच्या घरावर छापे टाकले. याशिवाय सोनभद्रमध्ये साई राम एंटरप्रायझेस कंपनीचे संचालक आणि सिंह यांचे दुसरे व्यावसायिक भागीदार सी.बी. गुप्ता यांच्यासह अनेक खाण व्यावसायिकांचे घर आणि कार्यालयाची तपासणी केली. कारवाईत आतापर्यंत दहा कोटींची रोख जप्त करण्यात आल्याची माहिती एका आयकर अधिकाऱ्याने दिली. सिंह छत्रशक्ती कन्स्ट्रक्शन कंपनी आणि साई राम एंटरप्रायझेस कंपनी रस्ते आणि खाण प्रकल्प चालवतात. या कंपनीमार्फत बेकायदेशीर खाणकामांमुळे अंदाजे ६० कोटींच्या महसुलाचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. (वृत्तसंस्था)

# निवडणुकीत राजकीय पक्षांकडून पैशांचा गैरवापर

## याचिकेवर विचार करण्यास सर्वोच्च न्यायालय सहमत

**नवी दिल्ली, २६ फेब्रुवारी**

निवडणुकीत राजकीय पक्षांकडून होणारा पैशांचा गैरवापर रोखायला हवा, यावर भर देत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी एका याचिकेवर विचार करण्यास सहमती दर्शवली. हे प्रकरण सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि विपुल पंचोली यांच्या खंडपीठासमोर आले.

'कॉमन कॉज' या स्वयंसेवी संस्थेचे वकील प्रशांत भूषण म्हणाले, हा एक मोठा मुद्दा आहे. जो आपल्या लोकशाहीच्या मुळाशी जातो. निवडणुकीत राजकीय पक्षांकडून पैशाच्या बळाचा गैरवापर होतो. प्रत्येक उमेदवाराच्या खर्चावर कायदेशीर मर्यादा असली तरी लोक रोखीने खर्च करतात. त्यामुळे या मर्यादेचे पालनच होत नाही.

भूषण यांच्या प्रस्तावात बरेच काही आहे, असे सांगत न्यायमूर्ती बागची यांनी अमेरिकन निवडणुकांचा उल्लेख केला. ते म्हणाले, एका पक्षासाठी खर्च मर्यादा असते आणि जेव्हा ती मर्यादा संपते तेव्हा उमेदवाराच्या मित्रांमध्ये एक करार होतो. न्यायमूर्ती बागची यांनी विचारले की, समजा भारतीय-अमेरिकन करार तुम्हाला निधी देतो, तर त्याची मर्यादा काय आहेत?. न्यायमूर्ती बागची यांनी भूषण यांना सांगितले की, जर मर्यादेपेक्षा जास्त निधी मिळाला नाही, तर ते संविधानाच्या कलम १९(१)(ए) चा हवाला देऊन न्यायालयात जातील, ज्यामध्ये भाषण स्वातंत्र्य आणि भौतिक समर्थनाद्वारे अभिव्यक्ती स्वातंत्र्य समाविष्ट आहे. आम्ही त्याला कसे नियंत्रित करू?

या न्यायालयाने निवडणूक बाँड प्रकरणात अनेक परिच्छेदांमध्ये म्हटले आहे की, हा एक शाप आहे. युक्तिवाद ऐकल्यानंतर, खंडपीठाने याचिकेवर नोटीस बजावली असून सहा आठवड्यांनंतर या प्रकरणाची सुनावणी होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

### राजकीय पक्षालाही मर्यादा असावी

भूषण यांनी युक्तिवाद केला की, संसदेने उमेदवारांवर निर्बंध घातलेले आहेत. यावर खंडपीठाने उत्तर दिले की, आता तुम्हाला ही बंदी राजकीय पक्षांनाही लागू करायची आहे का?, यावर भूषण सहमत झाले. खंडपीठाने विचारले, ते पुरेसे असेल का?, असे खंडपीठाने विचारले असता भूषण म्हणाले जर मी एखाद्या उमेदवारावर पैसे खर्च केले तर तो सहसा त्यांच्या निवडणूक खर्चात जोडला जातो. परंतु, एखाद्या खर्च राजकीय पक्षाने केला तर तो जोडला जात नाही. दुर्दैवाने, एका वर्षात राजकीय पक्ष किती खर्च करू शकतो यावर कोणतीही मर्यादा नाही.




पंजाबमधील पठाणकोट येथील ध्यानचंद मैदानावर लष्कराच्या पश्चिम कमांडच्या वतीने आकाश हवाई क्षेपणास्त्र प्रणालीचे प्रदर्शन ठेवण्यात आले होते. या माध्यमातून आकाश क्षेपणास्त्र प्रणालीची चाचणी घेण्यात आली


# 'द केरळ स्टोरी २'च्या प्रदर्शनाला स्थगिती

## निर्माते सर्वोच्च न्यायालयात करणार अपील

**तिरुवनंतपुरम, २६ फेब्रुवारी**

'द केरळ स्टोरी २' २७ फेब्रुवारीला थिएटरमध्ये प्रदर्शित होणार होता. परंतु, गुरूवारी केरळ उच्च न्यायालयाने या चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती दिली आहे. चित्रपट प्रदर्शित होण्याच्या एक दिवस आधीच उच्च न्यायालयाने निर्मात्यांना मोठा धक्का दिला आहे.

केरळ उच्च न्यायालयाने म्हटले की, सेन्सॉर बोर्डाने योग्य विचार न करता प्रमाणपत्र दिले आहे, असे दिसून येते. तर निर्माते विपुल शाह यांनी सांगितले की, ते केरळ उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करतील. या याचिकेवर सुनावणी करताना केरळ उच्च न्यायालयाने म्हटले की, सेन्सॉर बोर्डाने प्रमाणपत्र देताना सामाजिक सलोखा राखण्यासाठी आवश्यक असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले नाही. न्यायमूर्ती बेचू कुरियन थॉमस यांनी त्यांच्या आदेशात म्हटले की, प्रथमदर्शनी असे दिसते की सीबीएफसीने प्रमाणपत्र देताना या मार्गदर्शक तत्त्वांचा विचार केला नाही.





### सेन्सॉर बोर्डाला फटकारले

सुरुवातीला न्यायमूर्ती बेचू कुरियन यांच्या एकल न्यायाधीशांच्या खंडपीठाने चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी केली. सुनावणीदरम्यान, याचिकाकर्ता, चित्रपट निर्माते आणि केंद्र सरकार यांच्यात जोरदार वाद झाला. निर्मात्यांनी २७ फेब्रुवारीच्या प्रदर्शन तारखेचा आणि आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांसह त्यांच्या वितरण वचनबद्धतेचा हवाला देत तातडीने निर्णय देण्याची विनंती केली. प्रत्युत्तरात, न्यायमूर्ती बेचू कुरियन यांनी त्यांना ताकीद दिली की त्यांनी घाईघाईने निर्णय घेउन न्यायालयाला कोंडीत ढकलण्याचा प्रयत्न करू नये. न्यायालय सर्व युक्तिवाद पूर्णपणे ऐकेल आणि आदेश देण्यापूर्वी आवश्यक वेळ घेईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### विजय-रश्मिका अडकले विवाहबंधनात

**उदयपूर** : अरवलीच्या टेकड्यांमध्ये असलेल्या हॉटेलमध्ये साऊथ स्टार्स विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना हे विवाहबंधनात अडकले. त्यांनी तेलुगू पद्धतीने लग्न केले. लग्नानंतर विजय देवरकोंडाच्या कुटुंबातील लोकांनी हॉटेलबाहेर मिठाई वाटली. यापूर्वी रश्मिका मंदानाच्या पालकांनी वराच्या कुटुंबाला नारळ, फळे, मिठाई आणि हळद-कुंकू भेट दिले. यानंतर विजयच्या आई माधवी देवरकोंडा यांनी रश्मिकाला खानदानी बांगड्या भेट दिल्या.



लग्नाच्या विधींसाठी हॉटेलला गुलाब, ऑर्किड, ट्यूलिप इत्यादी फुलांनी सजवण्यात आले होते. केळी आणि त्याच्या मोठ्या पानांनी मंडप सजवण्यात आला. लग्नानंतर संध्याकाळी डीजे नाईट असेल. यासाठी डीजे गणेश (गणेश रंगनाथन) उदयपूरला पोहोचलेत.

### 'भूत बंगला' चित्रपटाचे गाणे प्रदर्शित

**मुंबई** : 'भूत बंगला' चित्रपटातील पहिले गाणे 'राम जी आके भला करेंगे' निर्मात्यांनी प्रदर्शित केले. या गाण्यात अक्षय कुमार त्याच्या क्लासिक विनोदी शैलीत दिसत आहे. व्हिडीओमध्ये उच्च-ऊर्जेचे व्हिज्युअल, भुताटकीचे वातावरण आणि वेगवान बीट्स आहेत. 'राम जी आके भला करेंगे' या गाण्याला प्रीतमने संगीतबद्ध केले आहे, तर त्याचे शब्द कुमार (राकेश कुमार पाल) यांनी लिहिले आहेत. या गाण्याला अरमान मलिक आणि आरवन (देव अरिजीत) यांनी आवाज दिला आहे. मेलो डीने लिहिलेला आणि सादर केलेला रॅप सेगमेंट ट्रॅकला समकालीन स्पर्श देतो. हा चित्रपट १० एप्रिलला प्रदर्शित होणार आहे.




### प्रियंकाने जारी केले 'द ब्लफ' चित्रीकरणाचे फोटो

**मुंबई** : अभिनेत्री प्रियंका चोप्रा मागील काही दिवसांपासून तिचा चित्रपट 'द ब्लफ'चे फोटो जारी करते आहे. आता तिने समाज माध्यमावर चित्रपटाच्या चित्रीकरणा दरम्यानचे काही फोटो शेअर केले आहेत. या फोटोंच्या माध्यमातून हा चित्रपट हे समुद्री चाच्यांवर आधारित असल्याचे स्पष्ट होते. प्रियांकाने तिच्या पोस्टला समुद्री चाच्यांसाठी सर्वात कमी आवडता व्यायाम कोणता आहे तर फळीवर चालणे, असे मजेदार पद्धतीने कॅप्शन दिले. प्रियांका चोप्राचा 'द ब्लफ' हा चित्रपट २६ फेब्रुवारीला ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला. या चित्रपटात कार्ल अर्बन, इस्माइल क्रूझ कॉर्डोवा, सफिया ओकले-ग्रीन आणि वेदांतेन नायडू यांच्याही भूमिका आहेत.



# आत्मसमर्पणाचा प्रयत्न करणाऱ्या कमांडरची माओवाद्याकडून हत्या

**भुवनेश्वर, २६ फेब्रुवारी**

ओडिशा पोलिसांसमोर शरणागती पत्करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कमांडरची एका वॉण्टेड माओवादी नेत्याने हत्या केली. अन्वेश असे मृत्यू झालेल्या कमांडरचे नाव आहे. त्याच्या शिरावर २२ लाख रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

दरिंगबाडी पोलिस ठाणे हद्दीतील पकारी राखीव वन क्षेत्रात कंधमाल जिल्ह्यातीस पोलिसांनी बुधवारी अन्वेश उर्फ रेणूचा कुजलेला मृतदेह बाहेर काढला. कुख्यात माओवादी नेता सुकरूने २९ जानेवारी रोजी त्याची हत्या केल्याचा आरोप आहे. अन्वेश ओडिशा पोलिसांसमोर शरण येण्याच्या तयारीत असताना सुकरू आणि त्याच्या साथीदारांनी त्याला ठार केल्याचे निश्चित झाले आहे, असे कंधमालचे पोलिस अधीक्षक हरीश बी. सी. यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

शेजारच्या छत्तीसगडमधील सुकमाचा रहिवासी असलेला अन्वेश हा केकेबीएन (कालाहांडी-कंधमाल-बौद्ध-नयागढ) विभागाचा विभागीय समिती सदस्य (डीव्हीसीएम) आणि लष्करी प्लॉटून कमांडर होता. त्याच्या शिरावर २२ लाख रुपयांचे बक्षीस होते, असे पोलिसांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# बिजापुरात दोन माओवाद्यांचा खात्मा

**बिजापूर, २६ फेब्रुवारी**

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात गुरुवारी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी दोन माओवाद्यांचा खात्मा केला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

सकाळी इंद्रावती नदीकाठी असलेल्या जंगलात सुरक्षा दले संयुक्त पथक नक्षलविरोधी अभियान राबवत असताना त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. सुरक्षा दलाने त्यास चोख प्रत्युत्तर दिले.

गोळीबार थंडावल्यानंतर जवानांनी घटनास्थळाची पाहणी केली. त्यावेळी दोन माओवाद्यांचे गणवेशातील मृतदेह, एसएलआर आणि इन्सास रायफल तसेच एक १२ बोअरची रायफल घटनास्थळी सापडली. परिसरात अद्याप शोधमोहीम राबवली जात आहे. (वृत्तसंस्था)

# मंगळावरील गायब पाण्याचे रहस्य उघड

## • धुळीच्या वादळाने झाले पाण्याचे नुकसान • हायड्रोजन अवकाशात सोडण्याच्या प्रमाणात वाढ

**वॉशिंग्टन, २६ फेब्रुवारी**

मंगळ ग्रहावरील गायब झालेल्या पाण्याचे रहस्य उघड करण्यात शास्त्रज्ञांना यश आले आहे. याबाबत नवीन संकेत मिळाले आहेत. मंगळ ग्रहावर थंड आणि कोरडे वाळवंट आहे, परंतु त्याच्या पृष्ठभागावरून येथे कधीकाळी नद्या आणि तलाव अस्तित्वात असल्याचे दिसून आले.



ग्रहामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात बदल कसा झाला, हे मागील अनेक वर्षांपासून संशोधकांनी हे समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. मंगळावरील धुळीच्या वादळाने ग्रहावरील पाण्याचे नुकसान होण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असावी. यामुळे पाण्याची वाफ वातावरणात उंचावर गेली आणि हायड्रोजन अवकाशात सोडण्याचे प्रमाण वाढले असावे, असा अंदाज आहे. या शोधामुळे लाल ग्रहाचे कोरड्या वाळवंटात रूपांतर होण्याबाबत एक नवीन संकेत मिळाला.

लहान आणि प्रादेशिक धुळीची वादळे पाण्याचे नुकसान वाढवू शकतात, असे संशोधकांनी नमूद केले आहे. आज आपण पाहत असलेला मंगळ ग्रह हळूहळू कोरडा कसा झाला, या कोड्यात या शोधाने एक नवीन भाग जोडला आहे. 'कम्युनिकेशन्स अर्थ अँड एन्व्हायर्नमेंट'मध्ये प्रकाशित एका नवीन आंतरराष्ट्रीय अभ्यासातून शक्तिशाली प्रादेशिक धुळीच्या वादळांनी पूर्व मान्यतेपेक्षा मोठी भूमिका बजावली, असे सूचित होते.

२०२२ ते २०२३ च्या उत्तर गोलार्धातील उन्हाळ्यात, इन्स्टिट्यूटो दे ॲस्ट्रोफिसिका दे अँडालुसिया, टोकियो विद्यापीठ आणि तोहोकू विद्यापीठातील शास्त्रज्ञांसह संशोधन पथकाला एका तीव्र परंतु स्थानिक धुळीच्या वादळामुळे मंगळाच्या वातावरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची वाफ वर ढकलली गेली असल्याचे आढळून आले. या ऋतूचा पाण्याच्या नुकसानावर फारसा परिणाम होत नसल्याचे पूर्वी शास्त्रज्ञांना वाटत होते. बहुतेक अभ्यास महाकाय ग्रह-व्यापी वादळांवर किंवा उष्ण दक्षिण गोलार्धातील उन्हाळ्यावर केंद्रित होते. (वृत्तसंस्था)

### बाष्पीभवनाच्या प्रमाणात १० पटीने वाढ

मंगळ ग्रह आणि अंतराळातल्या मधल्या वातावरणात पाण्याच्या बाष्पाचे प्रमाण नेहमीच्या प्रमाणापेक्षा जवळजवळ दहा पट वाढले होते. यानंतर लवकरच अवकाशाच्या काठाजवळील हायड्रोजनचे प्रमाण सामान्य पातळीपेक्षा सुमारे २.५ पट वाढले. हायड्रोजन महत्त्वाचे आहे. कारण जेव्हा पाण्याचे रेणू तुटतात तेव्हा त्यातून हायड्रोजन अवकाशात जाते. एकदा ते बाहेर पडले की, पाणी कायमचे नाहीसे होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# भारत-इस्रायल सहकार्याच्या नव्या दिशा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इस्रायल दौरा हा दोन्ही देशांतील द्विपक्षीय संबंधांचा नवीन अध्याय आहे. नरेंद्र मोदी यांनी इस्रायलची संसद-नेसेटमध्ये भाषण करून इतिहास रचला. या पटलावर भाषण करणारे ते पहिलेच पंतप्रधान ठरले. याचे ऐतिहासिक महत्त्व औपचारिकतेपुरते नाही. ते भारत-इस्रायल संबंधांतील सकारात्मक बदल प्रतिबिंबित करणारे आहे. भाषणाची सुरुवातच भारत आणि इस्रायल या दोन प्राचीन संस्कृतींच्या सहकार्याच्या नव्या दिशा म्हणून करण्यात आली. धोरणात्मक संधीपेक्षा संस्कृती, इतिहास आणि सामाजिक मूल्ये यांच्या आधारे बांधलेले संबंध म्हणून हे सहकार्य मांडले गेले. आपण एका प्राचीन संस्कृतीचा प्रतिनिधी म्हणून बोलत असल्याचे आणि १.४ अब्ज लोकांच्या भारताच्या मैत्रीचा संदेश आपण येथे मांडत असल्याचे मोदींनी स्पष्ट केले. हा प्रारंभ भारताच्या परराष्ट्र धोरणातील नवी दिशा अधोरेखित करणारा आहे. पारंपरिक नीतिमूल्ये आणि जागतिक संवादादरम्यान संतुलन राखून आधुनिक इतिहासातील धोरणात्मक भागीदारीची ही स्थापना आहे. या माध्यमातून दहशतवाद आणि सुरक्षेवर एक स्पष्ट आणि ठाम संदेश देण्यात आला. भाषणाचा एक महत्त्वाचा भाग दहशतवादाविरुद्ध भारत आणि इस्रायल दोघांचेही शून्य सहिष्णुता धोरण असणे हा होता. कुठलेही कारण नागरिकांच्या हत्येला न्याय देऊ शकत नाही आणि दहशतवादाचे कोणत्याही स्वरूपात समर्थन केले जाऊ शकत नाही, यावर नरेंद्र मोदी यांनी भर दिला.

भारत आणि इस्रायल या दोन्ही देशांनी दहशतवादाच्या वेदना अनुभवल्या आहेत. मोदींनी ७ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या हमासच्या हल्ल्याचा तीव्र शब्दांत तीव्र निषेध केला. या हल्ल्यात मृत्यू झालेल्या प्रत्येक कुटुंबाच्या दुःखात भारत सहभागी आहे, असे त्यांनी सांगितले. या प्रकारे दहशतवादाबद्दल भारताची भूमिका फक्त प्रतिकारक स्वरूपाची नसून ती सामायिक तत्त्वांना आधार देणारी आणि वैश्विक शांती व सुरक्षिततेसाठी संयुक्त प्रयत्नांची गरज अधोरेखित करणारी आहे. मोदींनी गाझा शांतता उपक्रमाला भारताचे समर्थन दिले. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या माध्यमातून शांततेनेच स्थिरता निर्माण होऊ शकते आणि संघर्षाचे संभाव्य निराकरण संवादाच्या मार्गाने झाले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी घेतली. इस्रायलच्या संसदेत दिलेले नरेंद्र मोदी यांचे हे भाषण हा वैश्विक समतेचा आणि सहिष्णुतेचा संदेशही होता. तिथे भारताने इतर देशांशीही कायदेशीर व शांततामूलक मार्गाने चर्चा व संबंध वाढविण्यावर भर दिला. भारत फक्त एका देशाच्या बाजूने उभा राहणारा देश नाही; स्थिरतेसाठी जागतिक शांतता आणि न्याय्य शांती प्रक्रियेला समर्थन देणारे हे राष्ट्र आहे. मोदी यांनी भाषणात भारत-इस्रायलमधील संबंधांच्या विस्ताराची एक विस्तृत मांडणी केली. या भागीदारीने केवळ सामरिक सुरक्षा नव्हे तर व्यापार, तंत्रज्ञान, नवोन्मेष, कृषी आणि जलव्यवस्थापन यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये विकासाच्या वाटा प्रशस्त झाल्या आहेत. मोदींनी महायुद्धातील भारतीय सैनिकांच्या योगदानाचा उल्लेख करून सांगितले की, भारताचा इस्रायलशी असलेला संबंध केवळ आधुनिक राजनैतिक सहकार्याने नाही, तर इतिहास आणि बलिदानानेही निर्माण झालेला आहे. आधुनिक परराष्ट्र धोरणाला ऐतिहासिक आणि मानवी मूल्यांचा आधार असतो तेव्हा सांस्कृतिक संवाद निर्माण होतो. अशा संवादातून नातेसंबंध अधिक मानवी आणि सहानुभूतिपूर्ण बनतात. मोदींच्या भाषणातून तीन स्तरांचा धोरणात्मक संदेश स्पष्ट झाला. सुरक्षा आणि दहशतवादाविरुद्ध ठाम भूमिका हा भारताचा अनुभव आणि जागतिक जबाबदारीशी जोडणारा मुद्दा. या माध्यमातून व्यापक भागीदारीचा संदेशही देण्यात आला.

भारत आणि इस्रायल यांच्यातील संबंध गेल्या तीन दशकांत वेगाने दृढ झाले असून हे संबंध धोरणात्मक भागीदारीच्या समोर गेले आहेत. आता या सहकार्याचा जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होता आहे. भारत हा जगातील सर्वांत मोठ्या संरक्षण सामग्री आयातदार देशांपैकी एक आहे. दुसरीकडे इस्रायल हा अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाचा अग्रगण्य पुरवठादार आहे. ड्रोन, क्षेपणास्त्रे संरक्षण प्रणाली, सायबर सुरक्षा, गुप्तचर तंत्रज्ञान अशा क्षेत्रांत दोन्ही देशांतील सहकार्य वाढले आहे. या सहकार्यामुळे भारताची लष्करी ताकद वाढली असून आशिया-प्रशांत आणि हिंद महासागर क्षेत्रातील शक्ती-संतुलनात बदल घडत आहेत. इस्रायलच्या तंत्रज्ञानामुळे भारताने सीमासुरक्षेत, दहशतवादविरोधी कारवायांत आणि आणि गुप्तचर व्यवस्थेतही मोठी झेप घेतली आहे. याचा परिणाम केवळ दक्षिण आशियातच नव्हे, तर दहशतवादविरोधातील जागतिक लढ्यावरही दिसून येतो. भारत-इस्रायल भागीदारीमुळे जागतिक शस्त्र बाजारात स्पर्धा निर्माण झाली आहे. अमेरिका आणि युरोपियन कंपन्यांनाही नव्या धोरणाचा विचार करावा लागत आहे. भारताचे पारंपरिक संबंध अरब देशांशी दृढ राहिले आहेत. तरीही इस्रायलशी वाढते संबंध कायम राखताना भारताने संतुलन राखण्याचे धोरण अवलंबिले आहे. विशेषतः सौदी अरब, संयुक्त अरब अमिरात आणि इराण यासारख्या देशांशी संबंध टिकवून ठेवताना इस्रायलशी जवळीक वाढविणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे कौशल्य दर्शविते. बहुध्रुवीय आंतरराष्ट्रीय संबंधांच्या धोरणामुळे भारताला पश्चिम आशियातील संघर्षामध्ये मध्यस्थीची भूमिका बजावण्याची संधी निर्माण झाली आहे. भारत आणि इस्रायल दहशतवाद्यांच्या निशाण्यावर असतात. आता गुप्तचर माहितीची देवाणघेवाण, तांत्रिक सहकार्य आणि संयुक्त प्रशिक्षण यामुळे जागतिक दहशतवादविरोधी मोहिमेला बळ मिळाले आहे. संयुक्त राष्ट्र संघात दहशतवादाच्या व्याख्येवर एकमत होण्यासाठी भारत-इस्रायल भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. या सहकार्यामुळे कट्टरवादी संघटनांविरुद्ध अधिक प्रभावी कारवाया करणे शक्य होणार आहे. भारत आणि इस्रायल यांच्यातील व्यापार सातत्याने वाढत आहे. संरक्षण क्षेत्रांव्यतिरिक्त हिरे, औषधनिर्मिती, आयटी, कृषी या क्षेत्रांतही सहकार्य वाढत आहे. या आर्थिक सहकार्यामुळे दोन्ही देश जागतिक पुरवठा साखळीतील महत्त्वाचे घटक बनत आहेत. विशेषतः तंत्रज्ञान आधारित उद्योगांमध्ये गुंतवणूक वाढल्यामुळे स्टार्टअप परिसंस्थेला चालना मिळत आहे. याचा सकारात्मक परिणाम जागतिक नवोन्मेष निर्देशांकावर दिसून येतोय. अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील घनिष्ठ संबंध लक्षात घेता, भारत जागतिक समीकरणातील महत्त्वाचा घटक ठरतो. भारत-प्रशांत धोरणात भारताचे वाढते महत्त्व आणि इस्रायलची तांत्रिक ताकद यामुळे त्रिपक्षीय सहकार्याच्या नव्या शक्यता निर्माण होत आहेत. यामुळे चीनसारख्या शक्तींना आवरण्याचे धोरण अधिक मजबूत झाले आहे. विशेषतः चीनच्या 'बेल्ट अ‍ॅण्ड रोड' उपक्रमाला पर्याय म्हणून भारत-इस्रायल-अमेरिका सहकार्याचे महत्त्व वाढले आहे. इस्रायलला 'स्टार्टअप नेशन' म्हणूनही ओळखले जाते. कृषी तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांत इस्रायल आघाडीवर आहे. भारत या तंत्रज्ञानाचा वापर शेती, जलसंधारण आणि डिजिटल सुरक्षेसाठी मोठ्या प्रमाणात करून घेत आहे. भारत आणि इस्रायल संबंधांमुळे पाकिस्तानवर अप्रत्यक्षपणे दबाव निर्माण झाला आहे. संरक्षण क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीमुळे दक्षिण आशियातील सामरिक समीकरणे बदलत आहेत. त्यामुळे पाकिस्तानने चीनशी जवळीक अधिक वाढविली आहे. परिणामी, आशियात दोन वेगळे गट निर्माण होण्याची शक्यता आहे. इस्रायलने हेक्सॅगॉन अलायन्स हा आघाडीचा प्रस्ताव आणला आहे. त्यात इस्रायल, ग्रीस, सायप्रस, काही अरब देश, आफ्रिकी देश आणि आशियाई देशांचा समावेश आहे. हा प्रस्ताव जाहीर होताच पाकिस्तानने थयथयाट केला. हा मुस्लिम उम्माला धोका असल्याचा पाकिस्तानचा दावा आहे. एकूणच भारत आणि इस्रायलमधील भागीदारी केवळ द्विपक्षीय सहकार्य नसून ती बहुआयामी आणि जागतिक परिणाम करणारी आहे. संरक्षण, तंत्रज्ञान, दहशतवादविरोधी कारवाया, मध्यपूर्वेतील संतुलन आणि भारत-प्रशांत धोरण या सर्व क्षेत्रांत या संबंधांचा परिणाम जाणवतो. जागतिक शक्ती संतुलनात होत असलेल्या बदलांच्या पृष्ठभूमीवर भारत-इस्रायल भागीदारी भविष्यात अधिक निर्णायक ठरेल, यात कोणतेही दुमत नाही.

---

## प्रासंगिक

प्रवीण टाके

# चला... मराठीतच बोलू या!

### २७ फेब्रुवारी; मराठी भाषा गौरव दिन विशेष

मराठी भाषा हजारो वर्षांच्या इतिहासाने समृद्ध आहे. ही भाषा केवळ संवादाचे साधन नाही, तर आपल्या संस्कृतीचे, ऐतिहासिक परंपरेचे आणि सृजनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे. 'माय मराठी' या संकल्पनेत तिचे शुद्ध, प्रमाण आणि अभिजात रूप जितके महत्त्वाचे आहे, तितकेच विविध उपभाषांनी वाढविलेले तिचे वैविध्यही महत्त्वाचे आहे.

मराठी ही उपभाषांनी समृद्ध झालेली भारतातील एक प्रमुख भाषा आहे. मातृभाषा आपले अस्तित्व असते. बोलीभाषा माणसाची अस्मिता असते. प्रत्येक बोलीत तिचा वेगळा रंग, वेगळी लय आणि वेगळे चैतन्य तसेच लोकजीवनाचे प्रतिबिंब सामावलेले आहे. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना जगातील एका अभिमानास्पद भाषेला आपण 'माय मराठी' म्हणतो, याचा आत्मीय अभिमान बाळगण्याचा हा दिवस आहे. प्रत्येक मराठी माणसाने व्यवहारात, शिक्षणात, प्रशासनात, माध्यमांमध्ये आणि दैनंदिन संभाषणात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याचा संकल्प करण्याचा हा दिवस आहे.

वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी साहित्य आणि भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी केलेल्या कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. २१ जानेवारी २०१३ रोजी मराठी भाषा विभागाने अधिकृतपणे या दिनाची घोषणा केली तसेच ३ ऑक्टोबर रोजी राज्यात 'अभिजात मराठी भाषा दिन' साजरा केला जातो. दरवर्षी दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतनिमित्त १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. राज्यभरात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम आणि वाचन उपक्रम राबविले जातात. या दोन्ही दिवसांत राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन होते. मराठी भाषेचा गौरव करण्याबरोबरच तिच्या संवर्धनासाठी आणि विस्तारासाठी चिंतन करण्याची ही संधी असते. चला, यावर्षी मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीला समृद्ध करणाऱ्या उपभाषांचा वाटा समजून घेऊया.

**विविध उपभाषांचा समृद्ध वारसा :** महाराष्ट्रात विविध बोलीभाषांचा विपुल वापर आढळतो. नाथ, महानुभाव आणि वारकरी संत परंपरेतील संतांनी प्राचीन काळापासून विविध बोलींचा वापर करून मराठी भाषेला अधिक व्यापक केले. आपण सर्वांनी आपल्या बालपणी चिमणी आणि कावळ्याची गोष्ट ऐकली आहे. तुम्हाला माहिती आहे, श्रीचक्रधर स्वामींनी ही गोष्ट ८०० वर्षांपूर्वी रुसलेल्या एका मुलीला सांगितल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. कविश्रेष्ठ कालिदास, शूद्रक यांच्या शाकुंतल, मृच्छकटिक या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठी बोली भाषेत आहेत.



वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, मालवणी, कोल्हापुरी, मराठवाडी, नागपुरी, झाडीबोली, खानदेशी, गोंडी, बंजारा, कोलामी अशा असंख्य उपभाषा मराठीच्या समृद्ध परंपरेचा भाग आहेत. प्रत्येक उपभाषेला स्वतंत्र ऐतिहासिक व सांस्कृतिक पृष्ठभूमी आहे. जशा अनेक उपनद्या मिळून नदी अधिक विशाल आणि समृद्ध होते, तशाच या उपभाषांनी मराठी भाषेला गोडवा, विस्तार आणि ऊर्जा दिली आहे. उदा. वऱ्हाडी ही अत्यंत प्रभावी उपभाषा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीते'त वऱ्हाडी भाषेचा प्रभावी वापर दिसतो. त्यांनी संपूर्ण गावगाडाच मराठीत मांडला आहे तसेच संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनांमधूनही वऱ्हाडीचा सहज आणि प्रभावी उपयोग आढळतो. आचार्य प्र. के. अत्रे यांनी गाडगेबाबांच्या वऱ्हाडी संबोधनाचे जाहीर कौतुक केले आहे.

कोकणी व मालवणी बोली त्यांच्या खास गोडव्यासाठी ओळखल्या जातात तर कोल्हापुरी बोली तिच्या रांगड्या ठसक्यासाठी प्रसिद्ध आहे. झाडीबोली आणि गोंडी भाषेच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन झाला आहे. झाडीबोलीतील नाटकांची परंपरा महाराष्ट्राला ज्ञात आहे. खानदेशी आणि अहिराणी भाषेचा गोडवा बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून प्रत्ययास येतो. उपभाषांवर प्रादेशिक प्रभाव असतो. उदा. कोकणी मराठीवर कन्नडचा प्रभाव जाणवतो. 'अक्का' हा मोठ्या बहिणीसाठी वापरला जाणारा गोड शब्द कन्नड-तेलुगू भाषांमधून मराठीत रूढ झाला आहे. वऱ्हाडीमध्ये, झाडीबोलीत हिंदीचे तर अहिराणीमध्ये गुजरातीचे अनेक शब्द सहजपणे मिसळलेले दिसतात. खरे तर हीच भाषेची खरी ताकद आहे स्वीकारण्याची आणि समृद्ध होण्याची!

**मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास :** उपभाषांनी मराठीला अधिक व्यापक आणि अभिव्यक्तिपूर्ण बनवले आहे. राज्य शासनाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धक, अभ्यासक, संशोधक, लेखक आणि साहित्यिक यांचा सन्मान करण्याचे निर्देश दिले आहेत. भाषाविषयक स्पर्धा, परिसंवाद, व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात. विविध शासकीय कार्यालयांमध्ये त्रिभाषा सूत्राचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जात आहे. मराठीचा प्रशासनिक, शैक्षणिक आणि सामाजिक वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. शासन प्रयत्नशील आहेच; परंतु सर्वसामान्यांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी विविध बोलीभाषांचा अभ्यास करून त्यांचा अभिमान बाळगला पाहिजे. भाषेचे संवर्धन हे केवळ धोरणातून नाही तर व्यवहारातून होते.

**मराठीचा वापर वाढवू या! :** 'उपभाषांनी समृद्ध झालेली माय मराठी' हा विचार मराठीच्या सर्वांगसुंदरतेची जाणीव करून देतो. भाषा ही आईसारखी असते- विशाल, सामावून घेणारी आणि ममत्वाने ओथंबलेली. महाराष्ट्रात येणारी कोणतीही व्यक्ती या भाषेचा गोडवा अनुभवत ती सोबत घेऊन जातो. 'तुम्हाला मराठी येते म्हणजे तुम्ही मराठी आहात' हा या भाषेचा उदात्त बाणा आहे. त्यामुळे आज मराठी भाषा गौरव दिनाला जागतिक स्तरावर मराठीचा सन्मान टिकविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे यासाठी मराठी माध्यमातील शिक्षणाचा प्रसार करणे, मराठी शाळांचे अस्तित्व टिकविणे, आधुनिक माध्यमांवर मराठीत अभिव्यक्त होणे, दैनंदिन व्यवहारात मराठीचा जाणीवपूर्वक वापर ही अत्यावश्यक पावले आहेत. दिवंगत कविवर्य डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी मराठीच्या सामर्थ्याचे सुंदर वर्णन केले आहे-

'मराठीची प्रतिभा, ज्ञानेश्वरीत समावते
ग्रामगीता गाथाही, मराठीतच मावते
लावणीतून मराठीचे, सौंदर्य ओसंडते
शौर्य आणि औदार्य, पोवाड्यातून सांडते
मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले
गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले
अमृताशी पैज जिंकते, मराठी बोली
आभाळाची उंची जिच्यात, समुद्राची खोली
साऱ्यांनी मराठी हुंकारावर डोलावे
मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलावे..!

चला, मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण सर्व एक संकल्प करूया, मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलूया..!

९७०२८५८७७७

(लेखक कोल्हापूरच्या विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक आहेत.)

---

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# असे वर्धेतील विद्यापीठ काय कामाचे?

विद्यापीठ म्हणजे केवळ विटा-सिमेंटची इमारत नसते; ती राष्ट्राची विचारशाळा असते. इथून पदवी-पदविका घेऊन निघणारी पिढी उद्याचा देश चालवणार असते. म्हणूनच विद्यापीठात कोणते विचार पेरले जातात यावर विद्यार्थ्यांचे, राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. पण, जेव्हा हाच परिसर घोषणा, गटबाजी आणि राष्ट्रविरोधी चळवळीचे केंद्र बनतं तेव्हा असे विद्यापीठ काय कामाचे? असा सवाल या व्यवस्थेला विचारावासा वाटतो. ज्या विद्यापीठाची सर्व कमान राष्ट्रपतींच्या हाती आहे. येथील कुलगुरू राष्ट्रपतींच्या अधिपत्याखाली काम करतात त्या विद्यापीठातील रंजक कहाण्या ऐकल्यानंतर असे विद्यापीठ नसते तर बरे झाले असते, असेच म्हणावेसे वाटते. २१२ एकर एवढ्या विस्तीर्ण परिसरात ८ वसतिगृहे आणि देश-विदेशातील विद्यार्थी शिक्षण घेत असलेले वर्धेतील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यापीठ आणि कुलगुरू कोणत्या ना कोणत्या प्रकरणात वादग्रस्त ठरत आले आहेत. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठ देशात वादग्रस्त घटनांसाठी कुप्रसिद्ध झाले होते. त्याच पावलावर पाऊल ठेवत महाराष्ट्रात एकमेव असलेले महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ देखील सतत संशयाच्या भोवऱ्यात असते. हिंदी भाषा, भारतीय संस्कृती आणि राष्ट्रभक्तीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेली संस्था जर स्थानिक इतिहासालाच नाकारत असेल तर? महाराष्ट्राच्या भूमीत राहून, मराठी मातीचा श्वास घेत, इथल्या जनतेच्या करातून चालणाऱ्या विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीची सुट्टी न दिल्याने या विद्यापीठातील शिवभक्तांनी त्रागा सुरू केला आहे. केंद्र सरकारने तीन सुट्ट्या देण्याची परवानगी दिली असल्याचे विद्यापीठातर्फे सांगितले जात असले तर गतवर्षी याच विद्यापीठाने शिवाजी महाराज जयंतीनिमित्त दिलेली सुट्टी अवैध होती का? ती अवैध होती तर केंद्र सरकारने सुट्टी देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई का केली नाही? या विद्यापीठात जवळपास १५ वर्षांपूर्वी अबझल खानाच्या वधाचे नाटक सादर करण्यात आले होते. तो विषय 'तरुण भारत'ने लावून धरला होता. त्या काळात या विद्यापीठामध्ये शिवाजी महाराजांचे साहित्यही उपलब्ध नव्हते. शिवाजी महाराज हे केवळ ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व नाहीत; ते आमच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. ज्यांच्या कर्तृत्वामुळे महाराष्ट्राची ओळख जगभर निर्माण झाली, त्यांच्याबद्दल उदासीनता दाखवणारे विद्यापीठ 'राष्ट्रीय' कसे म्हणावे? येथे पावलोपावली मराठी माणसाचा अवमान होतो. विदर्भ सोडा, महाराष्ट्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्याही मोजकी आहे. त्या मोजक्यांचीही अवहेलना केली जाते. उत्तर भारतीय आणि डाव्या विचारसरणीच्या हातात गेलेल्या या विद्यापीठाला तत्कालीन कुलगुरू रजनीश कुमार शुक्ल यांनी ठिकाण्यावर आणण्याचा प्रयत्न सुरू केला होता. येथे मराठीच नव्हे, तर मराठी संतांचा मेळा (रामदास, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, मीराबाई आदी मूर्ती बसवल्या होत्या.) तयार केला होता. वर्धा शहरासोबत या विद्यापीठाची हळूहळू जवळीक निर्माण झाली होती. या विद्यापीठाच्या कुलगुरूंना शाप असल्यागत शुक्लही एका प्रकरणात अडकले. विद्यापीठात राष्ट्र जागरणाची ज्योत पेटत असतानाच त्यांना ऐन राष्ट्रपतींच्या दौऱ्यापूर्वी कुलगुरू या पदावरून हटवण्यात आले. मराठी आणि हिंदीचे मायमावशीचे नाते असताना येथे मराठीला छळले जात आहे. स्थानिक युवकांना नोकरीही दिली गेली होती. परंतु, काही काळातच त्या युवकांवर पुन्हा बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. येथील कॅम्पसमध्ये विचित्र वातावरण तयार झाले आहे. येथे पोस्टर वॉर, आंदोलनं कायम होतात. शुक्ल यांची रवानगी होताच 'इन्कलाब जिंदाबाद'सारख्या घोषणा देत देशाच्या व्यवस्थेवर टीका करणारे महाभाग विद्यार्थी येथे वर्षोन्‌वर्षे डिग्रीच्या नावाखाली डेरा टाकून आहेत. समाजमाध्यमांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्र विचाराच्या विरोधात उघडपणे लिहिणारे, टीका करणाऱ्यांना येथील जाहीर कार्यक्रमात निमंत्रित केले जाते. 'तरुण भारत'मधून वृत्त मालिका चालवत टीकेची झोड उठल्यानंतर कार्यक्रम आवरता घेतला गेला. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ देशाच्या अखंडतेला तडा देणे नाही. विद्यापीठात प्रश्न उपस्थित केल्याच गेले पाहिजेत. चर्चा व्हाव्यात. सोबत राष्ट्रहित जोपासले गेले पाहिजे. येथे डाव्या विचारसरणीने खोलवर पाय रोवले आहेत. येथे काहींनी आता विचारांना खुंटीवर टांगत संधी शोधण्याचा प्रयत्न सुरू केला असल्याने त्यांची पोळी शेकली जात आहे. राष्ट्रहित विचारधारेच्या विरोधात कायम चळवळ सुरू असल्याने येथे एक प्रकारे छुपा अजेंडाच राबविला जातो का, याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे. शिक्षणाच्या बाबतीत कुठेही कमी नसलेल्या या विद्यापीठाकरिता केंद्र सरकारने डोळे उघडण्याची वेळ आली आहे. येथे निघणाऱ्या विकास कामांच्या निविदाही विशिष्टांच्या गळ्यात जात असल्याची ओरड असून हे राज्य शिवाजी महाराजांचे की खानाचे, असा प्रश्न पडल्या शवाय राहत नाही.

९८८१९०३७६५

---

## दखल

मोरेश्वर बडगे

# शरद पवार रिटायर होणार की लढणार?

साऱ्या निवडणुका आटोपल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या काही निवडणुका सोडल्या तर आता येती तीन वर्षे कुठल्याही मोठ्या निवडणुका नाहीत. मग तीन वर्षे करायचे काय, असा प्रश्न राजकारण्यांपुढे आहे. सर्वाधिक टेन्शन विरोधी नेत्यांपुढे आहे. मात्र, राज्यसभेच्या निवडणुका आल्या आहेत. नंतर विधान परिषदेच्या निवडणुका आहेत. राज्यसभेच्या सात जागांसाठी महाराष्ट्रात येत्या १६ मार्च रोजी निवडणूक होऊ घातली आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करायची अंतिम मुदत ५ मार्च आहे. कोण कुणासोबत राहणार आणि कोण कुणाची साथ सोडणार ते या तारखेला कळेल. राज्यसभेच्या या निवडणुकीत विधानसभेचे आमदार हे मतदार असतात. आमदारांचे संख्याबळ पाहिले तर एकूण सात जागांपैकी महायुतीचे सहा उमेदवार आरामात निवडून येऊ शकतात. निवडून येण्यासाठी ३७ मतांचा कोटा आहे. उरलेल्या एका जागेवर महाविकास आघाडीची एक जागा निवडून येऊ शकते. जे सात राज्यसभा सदस्य निवृत्त होत आहेत त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार एक आहेत. तब्येत साथ देत नसतानाही ८५ वर्षे वयाच्या शरद पवारांची लढायची इच्छा आहे, असे राज्यसभा सदस्य संजय राऊत यांनी म्हटले आहे. शरद पवार उभे राहिले तर ही निवडणूक अविरोध होण्याची शक्यता आहे. त्यांना सगळ्यांचा पाठिंबा आहे, असा दावा त्यांची कन्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला खरा; पण महाविकास आघाडीतल्या उबाठा आणि काँग्रेस या इतर घटक पक्षांनी या जागेवर दावा केल्याने सौदेबाजी सुरू आहे. पवारांसाठी जागा सोडण्याची 'राजकीय चैन' या दोघांना परवडेल का? काहीही होऊ शकते. उमेदवारी अर्ज भरायला १० दिवस उरले असताना ही निवडणूक रहस्यमय झाली आहे.

'आमच्या पक्षाची ही जागा आहे' असा दावा उद्धव ठाकरे यांचे पुत्र आणि उबाठाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी केला आहे. '२०२० मध्ये आम्ही ही जागा राष्ट्रवादीला सोडली होती' याची ते आठवण करून देत आहेत. काँग्रेसनेही या जागेवर दावा सांगितला आहे. 'राज्यसभेच्या बदल्यात उद्धव ठाकरेंनी विधानपरिषद घ्यावी' असा काँग्रेसचा प्रस्ताव आहे. काँग्रेस नेत्यांचा शरद पवार यांच्या उमेदवारीला विरोध आहे. उबाठाकडे २० आमदार आहेत तर काँग्रेसकडे १६. दोघे एकत्र आले तर भट्टी जमते. वांधा तिथेच आहे. शरद पवारांना बाजूला ठेवून बिनविरोध निवडणूक होऊ शकते. पण विरोधकांच्या भाषेत बोलायचे तर मतदान नाही ती निवडणूक कशी? उद्धव ठाकरे मतदानाशिवाय आमदार झाले होते. तेव्हा ते मुख्यमंत्री होते. मात्र, सहा महिन्यात निवडून यायचे होते. कसे येणार? तो कोरोना काळ होता. चहुकडे टाळेबंदी होती. सहा महिन्यात निवडून आलो नाही तर सरकारही गडगडेल या विचाराने उद्धव ठाकरेंना तेव्हा घाम फुटला होता. शेवटी पंतप्रधान मोदी यांच्या दाढीला हात लावून कशीबशी विधानपरिषद निवडणूक लावून घेतली होती. आताच्या निवडणुकीत वेगळाच पेच आहे. गेली ६० वर्षे महाराष्ट्राचे राजकारण शरद पवारांभोवती फिरत आले. आताही शरद पवार लढतात का? हाच 'टर्निंग पॉईंट' आहे. पवार मैदानात नसतील तर त्यांचे १० आमदार फुटू शकतात. पवार मैदानात आले तरी उद्धव ठाकरे दगा देऊ शकतात आणि काँग्रेसचा भरवसा नाही.



शरद पवार गेली ६० वर्षे ते कधी विधानसभा तर कधी संसदेत राहत आले. राज्यसभेच्या त्यांच्या दोन टर्म झाल्या. तरीही त्यांना पुन्हा इच्छा आहे. उबाठा आणि काँग्रेसने नाही म्हटले तर त्यांना रिटायर व्हावेच लागेल. मग त्यांच्या अंतिम इच्छेचे काय? स्वर्गीय अजितदादांच्या पत्नी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आपल्या या सासऱ्याला सुखासुखी राज्यसभेत पाठवतील? सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना २०१९ मध्ये माढामधून लढायचे होते. पण पवारांनी त्यांची संधी नाकारली होती. मग मावळमधून पार्थ उभे राहिले तेव्हा ते पडतील, याची सारी काळजी पवारांनी घेतली होती. या वेदना सुनेत्रा पवार विसरल्या असतील? शरद पवारांना मागेच भाजपासोबत जायचे होते. पण भाजपा की महाविकास आघाडी? पवार ठाम निर्णय करू शकले नाहीत. त्यांचा जीव आपल्या लाडक्या कन्येमध्ये अडकला आहे. आपण मुलीला 'सेटल' करू शकलो नाही, ही खंत त्यांना आज कुरतडत आहे. ज्या सुनेला 'बाहेरून आलेली पवार' म्हटले तिच्याच हाती पवार घराण्याचा वारसा चालला या जाणिवेने त्यांना अस्वस्थ करून सोडले आहे. दोन राष्ट्रवादीच्या विलीनीकरणातून त्यांना सुप्रियाची गॅरंटी घ्यायची होती. ती मिळण्यापूर्वीच अजितदादा गेले. आता उरलेल्या राष्ट्रवादीवर ताबा मिळविण्याचा काकाचा डाव होता. मात्र, सुनेत्रा वहिनींचा झटपट चौथ्या दिवशीच उपमुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाल्याने तोही उधळला गेला. दादाच्या बाराव्यापर्यंत सुनेत्रा थांबल्या असत्या तर राष्ट्रवादीचं तेरावं करून शरद पवार मोकळे झाले असते. रक्तगटातली सुप्रिया की आजचा पवार ब्रँड म्हणजे सुनेत्रा! कोणाला सांभाळायचे? पवारांचे घोडे इथे अडले आहे. त्यामुळेच एनडीएमध्ये जाणार नाही, या प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी त्यांनी स्वतःला रुग्णालयात कोंडून घेणे पसंत केले. आता तर नातू रोहित पवार हे आपणच 'पुढचे शरद पवार' आहोत, अशा थाटात वावरत आहेत. आयुष्यभर साऱ्यांना संभ्रमावस्थेत ठेवत आलेले शरद पवार आज स्वतः प्रचंड संभ्रमावस्थेत आहेत. तब्येत साथ देत नाही, दुसऱ्याच्या आधाराशिवाय चालता येत नाही, धड बोलता येत नाही, बोललेले इतरांना समजत नाही अशा विकलांग अवस्थेतही त्यांचा राजकारणाचा मोह सुटत नाही. पण त्यांना कोण वाचवणार? एकच माणूस वाचवू शकतो. तो म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. ज्यांना नेहमी पाण्यात पाहिले ते फडणवीस. फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हा शरद पवार काय बोलले होते ते आठवा. 'पूर्वी छत्रपती हे पेशवे नेमायचे. आता पेशवे छत्रपती झाले-' एक ब्राह्मण मुख्यमंत्री झाला हे त्यांना सांगायचं होतं. शरद पवारांनी आपल्या आयुष्यात खूप कमावलं. खूप ढापलं, अनेक माणसं फोडली, अनेक घरं फोडली. सारे कमावले, पण विश्वास कमावला नाही. त्यामुळेच आज 'पेशवा-अनाजीपंत' म्हणत ज्यांना हिणवलं त्या पेशव्याकडे खासदारकीची वस्त्रं मागायची पाळी त्यांच्यावर आली आहे. फडणवीस 'चाणक्य' आहेत. संख्याबळ नसताना गणितं जुळवत त्यांनी २०२० मध्ये भूकंप घडवले होते. तुम्ही लिहून ठेवा. सातव्या जागेचा तीळ आघाडीतल्या तिघांनी वाटून खाल्ला नाही तर फडणवीस यांची जादू चालणार.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

## वाचक पत्रे

### मेडिकल टुरिझम

युरोप-अमेरिकापेक्षा भारतात आरोग्य सेवा त्वरित व स्वस्त आहेत, हे सर्वांना विदित आहेच. बाहेरदेशी नोकरी-व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेले भारतीय नागरिक भारतात येऊन आरोग्य सेवा घेतात. भारताचे शेजारील पाकिस्तानसारख्या देशातील आजारी लोक भारतात उपचारांसाठी येतात. सध्या भारताची प्रतिमा जगात बरीच उजळली आहे. येथे उत्कृष्ट व स्वस्त सेवा देणाऱ्या अनेक नावाजलेल्या आरोग्य संस्था आहेत. शिवाय औषधीसुद्धा परवडणाऱ्या किमतीत मिळतात. कोरोना काळात भारतीय संस्थांनी प्रभावी औषधी निर्यात केल्या व आफ्रिका खंडातील अनेक नागरिकांना त्याचा लाभ मिळाला. ऐतिहासिक स्थळांमुळे भारतात सहलीचे ठिकाण म्हणून सुप्रसिद्ध आहे. आपले शासन, आपल्या आरोग्य संस्था, डॉक्टर मंडळी व विमान कंपन्यांनी भारतात मेडिकल टुरिझम वाढवायला मदत करावी, अशी विनंती आहे. जनतेने सुद्धा सार्वजनिक स्वच्छता पाळावी, यात सर्वांचेच भले आहे.

**गणेश हजारे** /८६९८८१५५५९

### गझल सम्राट पंकज उधास



आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा गुरुवारी दुसरा स्मृतिदिन. पंकज उधास यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या 'नाम' चित्रपटातील त्यांनी गायलेल्या 'चिठ्ठी आई है...' या गाण्याने ते घराघरात पोहोचले. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहानी याद आई, मोहरा यांसारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली. ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. असे असले, तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत. त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी 'कर्मा' या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले; मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही. त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या-मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो करू लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले; मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती. १९७९ साली त्यांना 'जवाब' या चित्रपटातील 'मितवा रे मितवा...' हे गाणे गाण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### योग्य निर्णय...!

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एक अतिशय योग्य आणि महत्त्वाची घोषणा केली आहे. 'मुलींनो, नीट आणि सुसंस्कृत कपडे घाला. अर्धवट किंवा अयोग्य कपडे घालून सोशल मीडियावर व्हिडीओ टाकू नका. अन्यथा तुमची सोशल मीडियावरील सर्व अकाऊंट्स डिलिट होणार आणि आधार कार्डही बंद होणार!' खरोखरच किती महत्त्वाचा निर्णय आहे. आज सोशल मीडियावर चित्रपटातील काही व्यक्ती आणि त्यांचे अनुकरण करणारे सर्वसाधारण लोक यांचा जो काही धुमाकूळ चालला आहे, ते बघून खंत वाटते. आपली संस्कृती शालीन, सुसंस्कृत आहे. पण पाश्चिमात्य देशाचे अंधानुकरण करून देश रसातळाला जात आहे. प्रसिद्धीसाठी कोणताही अयोग्य मार्ग निवडला तर अधोगतीच आहे. राष्ट्रपतींचा हा निर्णय योग्यच आहे. स्त्री ही शक्तीचे रूप आहे. तिचे सौंदर्य अंगभर वस्त्रात शोभून दिसणारे आहे. मात्र बरेचदा रियालिटी शोच्या माध्यमातून अशोभनीय प्रकार बघताना संकोचात्मक परिस्थिती निर्माण होते. हे कुठेतरी थांबायला हवे. यावर आळा घातला गेला पाहिजे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### झाडांवर इलेक्ट्रिक लाईट्‌सची रोषणाई पर्यावरणाला हानीच!

वृक्षवेलींना पण जीव असतो हे आता वेगळे सांगण्याची गरज नाही, पण अजूनही काही लोकांच्या हे ध्यानात नाही असे वाटते. झाडांवर इलेक्ट्रिक लाईट्स लावून रोषणाई करू नये, असं वाचण्यात आलं होतं. वृक्षांना खिळे ठोकून पाट्या लावणे पण ठीक नाही. हे पण सांगून झालं, पण फरक पडलेला दिसत नाही. परवाच यवतमाळ ते नागपूर प्रवासात असं दिसलं की, रस्त्यात संपूर्ण ढाबे अणि हॉटेल्स हे रंगीबेरंगी लाईटच्या रोषणाईने झगमगत होते. अर्थात ही सर्व रोषणाई नयनसुख तर देत होतीच; पण हे सर्व त्यांनी झाडावर रोषणाई करून केलेले होते म्हणून वाईट वाटले. नागपुरात अशी सजावट अनेक हॉटेल्सच्या समोर झाडांवर केलेली दिसते. आपण सर्व स्वतःला पर्यावरणप्रेमी समजतो आहोत ना; मग हे सर्व व्हायला नको. त्यासाठी संबंधितांनी लक्ष द्यायला हवे असे वाटते.

**गौरी पटवर्धन** /९४२२११६३०५

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ई-मेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मराठी राजभाषा दिन विशेष

# भाषा, अस्मिता आणि आधुनिक आव्हानांचे वैचारिक व समीक्षात्मक परिप्रेक्ष्य

**२७ फेब्रुवारी हा दिवस मराठी संस्कृतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या दिवशी थोर साहित्यिक कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांचा जन्मदिन असल्याने महाराष्ट्र शासनाने १९८७ पासून तो ''मराठी राजभाषा दिन'' म्हणून घोषित केला. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाची सांस्कृतिक स्मृती, ऐतिहासिक अनुभव आणि सामूहिक अस्मितेचा पाया असते. त्यामुळे मराठी राजभाषा दिन हा केवळ एका साहित्यिकाच्या स्मरणाचा दिवस नसून मराठी भाषेच्या अस्तित्व, सन्मान आणि भवितव्य यांचा विचार करण्याची सामूहिक संधी आहे.**

--------------------------

### मराठी राजभाषा दिनाची संकल्पना व पार्श्वभूमी

भारतीय संविधानानुसार प्रत्येक राज्याला स्वतःची राज्यभाषा निश्चित करण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी आहे. प्रशासन, न्यायव्यवस्था, शिक्षण आणि सार्वजनिक व्यवहारांत मराठीचा वापर वाढावा, या हेतूने राजभाषा दिनाची संकल्पना उदयास आली. परंतु मराठी राजभाषा दिनाची गरज ही केवळ औपचारिक नसून ऐतिहासिक आहे. स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे मराठीच्या वापरावर मर्यादा येऊ लागल्या. जागतिकीकरणानंतर इंग्रजीचे महत्त्व अधिक वाढले. परिणामी मराठी भाषेच्या वापर, प्रतिष्ठा आणि व्यवहारातील स्थान यांवर दबाव निर्माण झाला. अशा पार्श्वभूमीवर स्मरणदिन, उत्सव आणि जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून भाषेची जाणीव समाजात जिवंत ठेवणे आवश्यक ठरले.

### मराठी भाषेची सांस्कृतिक व सामाजिक ओळख

मराठी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाची वाहक भाषा आहे. संत साहित्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत मराठी वाङ्मयाने समाजजीवनाचे विविध पैलू अभिव्यक्त केले आहेत. संत परंपरेतील अध्यात्म, लोकसाहित्याची जीवनगंधी शैली, आधुनिक साहित्याचा सामाजिक भानया सर्वांचे एकत्रित रूप म्हणजे मराठी भाषिक संस्कृती.

लोकपरंपरा, सण-उत्सव, लोककला, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचारया सर्वांतून मराठी समाजाचे जीवनविश्व प्रतिबिंबित होते. त्यामुळे भाषा ही केवळ अभिव्यक्तीचे साधन नसून सामूहिक स्मृती आणि सांस्कृतिक सातत्याचा आधार असते. मराठीमुळे महाराष्ट्रातील विविध प्रदेश, जाती, पंथ आणि सामाजिक गट यांना एकत्र आणणारी सामूहिक ओळख निर्माण झाली आहे.

### कुसुमाग्रज व मराठी अस्मिता

कुसुमाग्रजांच्या साहित्याचा केंद्रबिंदू मानवी स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा हा आहे. त्यांच्या कवितेत दडलेला स्वातंत्र्याचा आवेग आणि अन्यायाविरुद्धची आक्रमक भूमिका मराठी समाजाच्या स्वाभिमानाशी जोडलेली आहे.

त्यांच्या काव्यातील मानवतावादी दृष्टिकोन मराठी समाजाला व्यापक मानवी मूल्यांशी जोडतो. त्यामुळे ''मराठी अस्मिता'' ही संकल्पना संकुचित प्रादेशिकतेपुरती मर्यादित राहत नाही, तर सार्वत्रिक मानवीतेशी जोडली जाते.

स्वातंत्र्य चळवळीच्या सांस्कृतिक वातावरणात कुसुमाग्रजांचे साहित्य प्रेरणादायी ठरले. त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारी जाज्वल्यता ही भाषिक आणि सांस्कृतिक स्वाभिमानाची अभिव्यक्ती आहे.

### निष्कर्ष

कुसुमाग्रजांचा जन्मदिन हा मराठी भाषेच्या गौरवाचे प्रतीक आहे. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून संस्कृती, इतिहास, विचार आणि सामूहिक स्मृती यांची वाहक आहे.

मराठी राजभाषा दिन हा केवळ स्मरणदिन नाही; तो भाषिक जागृतीचा संकल्पदिन आहे. या दिवशी आपण मराठीच्या वर्तमान स्थितीचे चिंतन, भविष्यासाठी नियोजन आणि व्यवहारातील अंमलबजावणीचा निर्धार केला पाहिजे.

भाषेचा सन्मान केवळ उत्सवांनी होत नाही; तो वापराने, सर्जनशीलतेने आणि ज्ञाननिर्मितीने होतो. म्हणूनच मराठी राजभाषा दिनाचा खरा संदेश असा आहे

''मराठीचा अभिमान बाळगा, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे मराठीचा वापर वाढवा.''

**-डॉ नितीन रंगनाथ आवताडे**
**महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ**
**बाळे, सोलापूर**

## शेतामध्ये काम करत असताना कोल्ह्याचा हल्ला

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-** शेतामध्ये काम करत असताना दोघांना कोल्ह्याने हल्ला करत हाताच्या दंडाला व डोळ्याच्या खाली तसेच पायाच्या मांडीला कोल्ह्याने चावल्याचा प्रकार सोलापूर जिल्ह्यात घडला आहे.या हकीकत अशी की, ब्रह्मदेव गौतम गायकवाड (वय २५ रा. घाटणे, ता. मोहोळ), स्वाती दिनेश गायकवाड (वय २९) हे दोघे घाटणे गाव येथील शेतामध्ये काम करत असताना कोल्ह्याने दोघांनाही चावल्याने त्यात ब्रह्मदेव गायकवाड याला उजव्या हाताच्या दंडाला व उजव्या डोळ्याच्या खाली तसेच स्वाती गायकवाड हिला डाव्या पायाच्या मांडीला चावल्याने मोहोळ सरकारी दवाखाना येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. तद्नंतर पुढील उपचारासाठी रेफरने शासकीय रुग्णालय सोलापूर येथे ते स्वतः दाखल झाले.


## सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर

**द्वारा भावसार नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**

**ताबा नोटीस नमूना झेड नोटीस**

**म.स.सं.नियम १९६० मधील नियम १०७ (११) ड-१**

**स्थावर मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा (प्रतिकात्मक) घेतल्या बाबतची नोटीस**

मी खानी सही करणार विशेष वसूली व विक्री अधिकारी सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोनापूर द्वारा भावसार नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर ज्याअर्थी मला प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था आधीनियम १९६० कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था आधीनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये तसेच मा. उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर शहर, सोलापुर यांच्या कडून प्राप्त झालेला कलम १०१ च्या दाखल्यानुसार खालील नमूद कर्जदार जामीनदारास नियमानुसार मागणी व जप्ती नोटीस पाठवून त्यांच्या राहत्या घरी जाऊन जंगम मालमत्तेचा निरंक पंचनामा केलेला आहे. त्यानंतर त्यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचा १०७ (१०) नुसार जप्ती आदेश दिलेला आहे. संस्थेकडे गहाणखत / जप्त असणारी / जप्त केलेली स्थावर मालमत्ता नियम १०७ चे (नियम १९ ड १) नुसार नमुना झेड नोटीस देऊन सदरील मानमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसिद्वारे सावध करण्यात येते कि, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी, विक्री, गहाण-दान, टाच, बोजा किवा इतर हक्कात व्यवहार करू नये. या उपर कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तौ भावसार नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर यांचे खानी दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज व वसुली खर्चास कायदेशीररीत्या अधीन रहावे मागेल याची नोंद घ्यावी. त्याची खालील नमूद स्थावर मानमत्ता तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ. नं. | थकबाकीदाराचे / जाबदाराचे नाव व गाव | वसुली दाखला क्र. दिनांक | स्थावर मालमत्तेचे वर्णन | भूमापन क्र. व उपविभाग | येणेबाकी रक्कम रु. ३१/०१/२०२६ अखेर |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. रमाकांत माधवराव माळवादकर यांचे हिस्सा पुरते | १०१/४९३/२०२५ | मौजे - दाजी पेठ TP*१ ता. न.भु.का. न.भु.अ.जि. सोलापूर | TP स्कीम ०१ २०/१०७ | १,९१,८०४/- |
| २ | सौ. रूपाली रमाकांत माळवादकर जाबदार नं ३ श्री. रमाकांत माधवराव माळवादकर यांचे हिस्सा पुरते | १०१/४९४/२०२५ | मौजे - दाजी पेठ TP*१ ता. न.भु.का. न.भु.अ.जि. सोलापूर | TP स्कीम ०१ २०/१०७ | २,०९,१०२/- |
| ३ | श्री. श्रीनिवास तुळशीराम क्षीरसागर यांचे हिस्सा पुरते | १०१/३३७/२०२४-२५ | मौजे गुरुवार पेठ ता. न.भु.का. न.भु.अ.जि. सोलापूर | ४८०२ | २,१३,८७१/- |
| ४ | श्री. कल्लप्पा शंकर वाघमोडे यांचे हिस्सा पुरते | १०१/४०४/२०२४-२५ | मौजे कसबे सोलापूर ता. उ. सोलापूर जि. सोलापूर | १७१/१/दक्षिण | ११,९३,५०७/ |
| ५ | श्री. विनायक बाळकृष्ण उर्फ अण्णाराव डोईजोडे यांचे हिस्सा पुरते | १०१/३३४/२०२४-२५ | मौजे कुंभारी ता. द. सोलापूर जि. सोलापूर | १७४/१४५/ प्लॉटअ/११ | ८,३०,५८६/- |
| ६ | श्री. विनायक बाळकृष्ण उर्फ अण्णाराव डोईजोडे यांचे जाबदार नं २ श्री. सुहास सूर्यकांत डोईजोडे हिस्सा पुरते | १०१/३३४/२०२४-२५ | मौजे कुंभारी ता. द. सोलापूर जि. सोलापूर | ५४४/५४५/ प्लॉटअ/११ | ८,३०,५८६/- |

ही उदघोषणाप्बारसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत आपली थकबाकी, त्यावरील पुढील होणारे व्याज व इतर खर्चासह थकबाकी रक्कम संस्थेकडे भरणा करून त्याची रितसर पावती घेऊन तसेच कर्ज खाते बेबाक प्रमाणपत्र घ्यावे अन्यथा कायद्यातील तरतुदी प्रमाणे कार्यवाही केली जाईल, म्हणजेच आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा/कब्जा प्रत्यक्ष घेण्यासाठी मा. जिल्हादंडाधिकारी साहेब तथा मा. जिल्हाधिकारी सोलापुर यांच्याकडे रितसर प्रकरण दाखन करून व पुढील योग्य ती कारादेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

हि नोटीस दिली दिनांकः २५/०२/२०२६

**स्वाक्षरीत**
**एन.ए. एकबोटे**
**वसूली, मालमत्ता जप्त व विक्री अधिकारी**
**सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापूर**
**द्वारा भावसार नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**


## राष्ट्रीय आरोग्य मेळाचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्घाटन

### बैद्यनाथ व सिद्धायु डायमंड पुरस्कृत

**शेगाव, दि. २६ फेब्रुवारी-** सामान्य जनतेस आयुर्वेद पद्धतीद्वारे आरोग्य लाभ प्रदान करण्याच्या उद्देशाने २५ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान विसावा मैदान, विसावा भक्तनिवास संकुल, आनंद सागर रोड, शेगाव, जिल्हा बुलढाणा येथे राष्ट्रीय आरोग्य मेळ्याचे आयोजन करण्यात आले. हा मेळा आयुष मंत्रालय, भारत सरकार तसेच अखिल भारतीय आयुर्वेद महासम्मेलनयांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. या मेळ्याचे डायमंड स्पॉन्सर म्हणून देशातील प्रतिष्ठित आयुर्वेदिक कंपन्या बैद्यनाथ व सिद्धायु सहभागी झाल्या. भारताच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते बुधवारी (दि. २५) या मेळ्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रतापराव जाधव तसेच इतर मान्यवर मंत्री उपस्थित होते. सिद्धायुचे संचालक आणि बैद्यनाथचे अध्यक्ष



सिद्धेश शर्मा तसेच मार्केटिंग विभागाचे जनरल मॅनेजर अर्चित कुमरवार यांची विशेष उपस्थिती होती. या मेळ्याचा मुख्य उद्देश आयुर्वेदाचे महत्त्व, उपयुक्तता आणि वैज्ञानिक आधार जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे हा होता. यानिमित्ताने डायमंड स्पॉन्सर बैद्यनाथ व सिद्धायु यांनी आपल्या आकर्षक स्टॉलद्वारे विविध आयुर्वेदिक औषधांचे प्रदर्शन केले तसेच आयुर्वेदिक साहित्य (पुस्तके) सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिली. देशातील इतर नामांकित आयुर्वेदिक कंपन्यांनीही सक्रिय सहभाग नोंदवून आपले स्टॉल उभारले. त्यामुळे हा मेळा आयुर्वेद प्रचार-प्रसार आणि जनजागृतीच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला.


### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. २५/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. लक्ष्मण अंबादास कापसे** - **अर्जदार**
रा. जवळगांव नं २ (जोतीबाची वाडी) ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकीलएस.एस. कोकाटे)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** - **गैरअर्जदार**
**तथा ग्रामसेवक ग्रा. प. जवळगांव (जोतीबाची वाडी)**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे वडील अंबादास भाऊ कापसे, रा. जवळगांव नं २ (जोतीबाची वाडी) ता. बार्शी यांचा मौजे जवळगांव, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक १९ जुलै २०२० रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये मृत्यू नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे वडील अंबादास भाऊ कापसे यांचा दिनांक १९ जुलै २०२० रोजी मौजे जवळगांव, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही

आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ७७/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. अभिमन्यु गणपत चांदणे** - **अर्जदार**
रा. पिंपळगाव (पा) ता. बार्शी जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील जयश्री शिवाजी घोडके)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** - **गैरअर्जदार**
**तथा ग्रामसेवक ग्रा. प. पिंपळगाव(पा)**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे आजोबा पंढरी नागू चांदणे, रा. पिंपळगाव (पा) ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे पिंपळगाव (पा) ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये मृत्यू नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे आजोबा पंढरी नागू चांदणे यांचा दिनांक रोजी मौजे पिंपळगाव (पा) ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

### जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ७६/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. अभिमन्यु गणपत चांदणे** - **अर्जदार**
रा. पिंपळगाव (पा) ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील जयश्री शिवाजी घोडके)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** - **गैरअर्जदार**
**तथा ग्रामसेवक ग्रा. प. पिंपळगाव (पा)**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे खापर पंजोबा सदू येसू चांदणे, रा. पिंपळगाव (पा) ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे पिंपळगाव (पा) ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक १९ सप्टेंबर १९०७ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये मृत्यू नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे खापर पंजोबा सदू येसू चांदणे यांचा दिनांक १९ सप्टेंबर १९०७ रोजी मौजे पिंपळगाव (पा) ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिंसेबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत, डि सोलापूर सब डि व ता. बार्शी येथील लोकांना या जाहीर नोटोसीने कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि व ता. बार्शी म्यु. पल येथील जमीन गट नं. ३७१ क्षेत्र 0 १९ 00 आर, आकार 00 रु. ६३ पै. यासी चतुःसिमा :- पुर्वेस - सुरवसे, गर्जे, गायकवाड यांची जमीन, दक्षिणेस - बंडेवार यांची जमीन, पश्चिमेस - बगले यांची जमीन, उत्तरेस - देशमुख यांची जमीन, येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची जमीन, अशा वर्णनाची जमीन गंगाधर विश्वनाथ हिरापुरे, रा. घोडेगल्ली गल्ली, बार्शी, जि. सोलापूर यांच्या वडिलोपार्जित मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे. सदरील जमीन गंगाधर विश्वनाथ हिरापुरे यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेवरून सदरील जमीनीचे खरेदीखताचा ठराव आमचे अशिल संतोष शिवाजी जगताप, रा. कासारवाडी रोड, बार्शी यांच्या बरोबर झाला असून त्यांनी आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदरील वर्णनाची मिळकत मंगला प्रविण ढाळे यांनी व्यवहार करतेवेळी त्यांनी सदरचा प्लॉट निर्वेध, निजोखमी असल्याचा विश्वास दिला आहे.

सवव या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरील मिळकतीबाबत इतर कोणाचे गहाण, दान, हस्तांतरण इ. स्वरूपाचा व्यवहार असेल तर सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून १ महिन्याचे आत खालील पत्यावर तक्रार नोंदवावी मुदतीमध्ये कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ता. २६/०२/२०२६

**सही/-**
**ॲड. श्री. एस.एस. ठोंबरे**
**बी.कॉम. (ऑनर्स), एल.एल.बी.**
**फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी,**
**जि. सोलापूर मो.नं. ९३७१९६२४२५**
**संतोष शिवाजी जगताप,**
**रा. कासारवाडी रोड, बार्शी**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि सोलापूर सब डि व ता. बार्शी येथील लोकांना पा जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि व ता. बार्शी म्यु.पल येथील जमीन गट नं. ३९५ क्षेत्र 0.११ १२ आर. आकार 00 रु. २५ पै. तसेच जमीन गट नं २९६ क्षेत्र 0.0९ ४४ आर आकार 00 रु. ३० पैसे, यासी एकत्रात चतुःसिमा :- पुर्वेस - सोनिग्रा यांची जमीन, दक्षिणेस - रस्ता, पश्चिमेस - गट नं. २५७, २५८. उत्तरेस - तुळजापुर रोड, येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक वर्णनाची जमीन, अशा वर्णनाची जमीन मंगला प्रविण ढाळे, रा. लोखंड गल्ली, बार्शी, जि. सोलापूर यांच्या खरेदी मालकीच्या व कब्जेवहिवाटीच्या आहेत. सदरील जमीन मंगला प्रविण ढाळे यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेवरून सदरील जमीनीचे खरेदीखताचा ठराव आमचे अशिल संदीप केराप्पा घुले यांच्या बरोबर झाला असून त्यांनी आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकारलेली आहे. सदरील वर्णनाची मिळकत मंगला प्रविण ढाळे यांनी व्यवहार करतेवेळी त्यांनी सदरचा प्लॉट निर्वेध, निजोखमी असल्याचा विश्वास दिला आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरील मिळकतीबाबत इतर कोणाचे गहाण, दान, हस्तांतरण इ. स्वरूपाचा व्यवहार असेल तर सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसाचे आत खालील पत्यावर तक्रार नोंदवावी मुदतीमध्ये कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ता. २६/०२/२०२६

**सही/-**
**ॲड. श्री. एस.एस. ठोंबरे**
**बी.कॉम. (ऑनर्स), एल.एल.बी.**
**फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी,**
**जि. सोलापूर मो.नं. ९३७११६२४२५**
**संदीप केराप्पा घुले**
**रा. सेक्टर नं. २८, प्लॉट नं. १३२**
**प्राधिकरण निगडी, पुणे-४४**
**ॲड. श्री. एस. एस. ठोंबरे**


## कारची काच फोडत मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-** घरासमोर कार पार्क केली असता, तुम्ही तुमची कार येथे पार्क का केली असे म्हणून कारवर मुद्दाम स्क्रॅचेस पाडून, रॉडने एकाने कारच्या काचा फोडल्या. तर एकाने शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने जेलरोड पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. या हकीकत अशी की, दि. २४ फेब्रुवारी रोजी बेगम पेठ येथे हुसेनबाशा शेख रा. ३१६, बेगम पेठ सोलापूर यांच्या घरासमोर मुस्तफा मेहबूब शेख याने फिर्यादी अफसर ची कार पार्क केली असता, तुम्ही तुमची कार येथे पार्क का केली असे म्हणून त्यांच्या जवळील लोखंडी पलंग ओढून काढताना अफसरच्या कारवर मुद्दाम स्क्रॅचेस पाडून, रॉडने कारच्या पुढील मागील बाजूच्या काचांना मारून फोडून ८० ते ९० हजार रुपयांचे नुकसान केले. तसेच अफसरच्या उजव्या पायाच्या पंजावर लोखंडी रॉडने मारून दुखापत केली. यामध्ये जैद मुस्ताक शेख राहणार सोलापूर याने शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने मुस्ताक महबूब शेख व जैद मुस्ताक शेख यांच्यावर जेलरोड पोलीस ठाण्यात दिनांक २५ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास काळेल करत आहेत.


### PUBLIC NOTICE

**PUBLIC NOTICE FOR CHANGE IN REGISTERED OFFICE ADDRESS OF SUKHANJALI MULTISTATE CO-OP CREDIT SOCIETY LTD., SOLAPUR**
**SOCIETY REGISTRATION NO. MSCS/CR/497/2012 DT. 14/03/2012.**

Notice is hereby given to all of members of SUKHANJALI MULTISTATE CO-OP CREDIT SOCIETY LTD., SOLAPUR That, the Registered Office of the society has been going to shift from B-104, Nath Plaza, Modi, Saat Rasta, Solapur-413001 (Maharashtra) To **Shop No. 1, At Brahma Galaxy, Sumitra Park, Jule Solapur-413004 (Maharashtra).** As per the sanctioned order File No. L-11015/16/2012-L&M Dt.09/02/2026 of the Hon'ble Central Registrar Co-Operative Societies New Delhi with effect from 16th March 2026.

The new address is a follows:-

**SHOP NO-1, AT BRAHMA GALAXY, SUMITRA PARK, JULE SOLAPUR- 413004 (MAHARASHTRA) Contact No. 9405120274**

All correspondence and communications to the society should be addressed to the new address mentioned above.

**By Order of the Board this Public Notice Dt-25/02/2026**

**Managing Director**
SUKHANJALI MULTISTATE CO-OP CREDIT SOCIETY LTD., SOLAPUR

### जाहिर सुचना

**सुखांजली मल्टीस्टेट को–ऑप क्रेडिट सोसायटी लि. सोलापूर** (नों.क्र. MSCS/CR/497/2012 DT. 14/03/2012.) या संस्थेच्या सर्व सभासदांना याद्वारे कळविण्यात येते की,

मा.केंद्रीय निबंधकसो, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांचेकडील L-11015/16/2012-L&M Dt.09/02/2026 चे मंजूर आदेशान्वये आपल्या सुखांजली मल्टीस्टेट को–ऑप क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर या संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय हे बी–१०४, नाथ प्लाझा, सात रस्ता, मोदी, सोलापूर–४१३००१ (महाराष्ट्र) येथून **शॉप क्र. १ ब्रह्मा गॅलेक्सी, सुमित्रा पार्क, जुळे सोलापूर–४१३००१ (महाराष्ट्र)** येथे दि. १६ मार्च २०२६ पासून बदलण्यात येत आहे.

नवीन पत्ता खालीलप्रमाणे :–

**शॉप क्र. १ ब्रह्मा गॅलेक्सी, सुमित्रा पार्क, जुळे सोलापूर–४१३००१ (महाराष्ट्र)**
**संपर्क – ९४०५१२०२७४**

तरी संस्थेशी सर्व पत्रव्यवहार आणि संवाद नवीन पत्यावर करावा.
मा.संचालक मंडळाचे आदेशावरुन ही जाहीर सूचना दिली दि. २५/०२/२०२६

**व्यवस्थापकीय संचालक**
सुखांजली मल्टीस्टेट को–ऑप क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर

### ताबा नोटीस नमुना 'झेड' (Z NOTICE)

**म.स.सं. नियम १९६० मधिल नियम १०७ (११) ड-१**

## यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी, ता. बार्शी

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी मला प्राप्त अधिकारानुसार मी गोपीचंद अरूण तुकशेट्टि विशेष वसुली व विकी अधिकारी **यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी, ता. बार्शी** म.स.सं. नियम १९६१ अन्वये खालील थकबाकीदार यांना मागणी नोटीसद्वारे त्यांच्याकडील येणे रक्कम भरण्यास कळविले होते. मात्र त्यांनी रक्कम भरण्यास कसुर केली आहे. त्यामुळे यांच्या स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. सदरचे जप्ती आदेश संस्थेच्या दप्तरी थकबाकीदार यांना पाहण्यास मिळेल. खालील ऋणकोने रक्कम भरण्यास कसुर केल्याने ऋणकोंना नोटीस देण्यात येते की, खाली निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने म.स.सं. १९६१ मधिल नियम १०७ (११) (ड)(१) नुसार असलेल्या अधिकारान्वये रितसर बोजा नोंद करून प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसद्वारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी-विकी, गहान, दान, टाच, बोजा, किंवा इतर हक्कात व्यवहार करू नयेत. याउपर कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो **यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी, ता. बार्शी** यांच्या खाली दर्शविलेल्या येणे बाकी, बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज, वसुलीखर्च, यांच्या कायदेशिररित्या अधिन राहावे लागेल याची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कर्जदार /जामिनदार | मिळकतदार | दाखला क्र. दिनांक | ३१/०१/२६ अखेर येणे बाकी | मिळकत ठिकाण | मिळकत कमांक | क्षेत्र | मालमत्ता प्रतिकात्मक ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिवलिंग मच्छिंद्र चांदणे चंद्रकांत बलभिम पिंगळे राजेश दत्तात्रय नायकोजी | चंद्रकांत बलभिम पिंगळे | ८२/२०२५ १७/०४/२०२५ | २,८१,६३६/- | बार्शी ता. बार्शी | सि.स.नं ७२५/१/६५ | ४८३.६० चौरस मिटरपैकी | २६/०२/२०२६ |
| २ | अरबाज हुसेन अन्सारी सुर्यकांत अनिल जाधव इब्राहिम महमद शेख | निर्मला अनिल जाधव | १०३६/२०२४ ३०/०१/२०२४ | १,००,१२०/- | बार्शी ता. बार्शी | १८९/१ | ०.०१.०० | २६/०२/२०२६ |
| ३ | अमर बबन क्षिरसागर अनिल लक्ष्मण देवकर बबन ज्ञानदेव क्षिरसागर | अनिल लक्ष्मण देवकर | १०३५/२०२४ ३०/०१/२०२४ | १,१८,०९६/- | ता. बार्शी | सि.स.नं २११६ | ६९.५० चौ.मी.पैकी | २६/०२/२०२६ |
| ४ | धनाजी दास शिंदे प्रविण ज्ञानोबा तुपेरे सुरज ज्ञानोबा तुपेरे | प्रविण ज्ञानोबा तुपेरे सुरज ज्ञानोबा तुपेरे | १०४०/२०२४ ३०/०१/२०२४ | ८५,८६८/- | येळंब ता. बार्शी | २२/४ २२/४ | ०/३४.०० ०/३५.०० | २६/०२/२०२६ |

ही ताबा नोटीस दिली असे.

**दिनांक : २६/०२/२०२६**

**सही/-**
**श्री. गोपीचंद अरूण तुकशेट्टी**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी, ता. बार्शी**





## महत्त्वाचे

### हरमनप्रीत दुसऱ्या वन-डेसाठी तंदुरुस्त



**होबार्ट** : कर्णधार हरमनप्रीत कौर दुखापतीतून सावरत असून ती ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यासाठी उपलब्ध असणार आहे, असे भारताची अष्टपैलू दीप्ती शर्माने सांगितले. मालिकेच्या पहिल्या सामन्यात कर्णधाराच्या गुडघ्याला दुखापत झाल्यानंतर ती आता खेळण्यायोग्य तंदुरुस्त झाली आहे. ब्रिस्बेनमधील पहिल्या एकदिवसीय सामन्यात मेगन शटविरुद्ध फलंदाजी करताना हरमनप्रीतच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली होती, ही सामना भारताने मागील टी-२० मालिका २-१ ने जिंकल्यानंतर अखेर गमावला होता. तीन सामन्यांची एकदिवसीय लढत आता तोंडावर असल्याने, दीप्तीने शुक्रवारच्या सामन्यापूर्वी कर्णधाराच्या प्रकृतीबद्दल उत्साहवर्धक माहिती दिली. मी म्हणू शकते की हरमनप्रीत तंदुरुस्त आणि ठीक आहे, असे दीप्तीने सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत सांगितले. मालिका होबार्टला हलवताना भारताची कर्णधार परतण्यास तयार आहे. संघाचे लक्ष निकालावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी कामगिरीवर आहे, असे ती म्हणाली. एक संघ म्हणून, आम्ही खरोखर चांगले खेळलो. पण, अर्थातच, निकाल आमच्या वाट्याला आला नाही. पण, अर्थातच, आम्ही एक संघ म्हणून उत्सुक आहोत आणि पुढच्या सामन्यात आम्ही अधिक मजबूतीने परत येऊ, असे ती म्हणाली. ■

### भारतीय बॅडमिंटनपटूंचा पहिल्या फेरीत संघर्ष

**जर्मन** : येथे सुरू असलेल्या जर्मन ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पहिलर्या फेरीच्या सामन्यांमध्ये भारतीय बॅडमिंटनपटूंना संघर्ष करावा लागला. पुरुष एकेरीच्या सामन्यात किरण जॉर्जला अव्वल मानांकित फ्रान्सच्या क्रिस्टो पोपोव्हकडून ४७ मिनिटांत १०-२१, २०-२२ असा पराभव पत्करावा लागला. दुसऱ्या पहिल्या फेरीच्या सामन्यात थरुन मन्नेपल्लीलाही चीन तैपेईच्या वांग त्झू वेईकडून ४४ मिनिटांत पराभव पत्करावा लागला. महिला एकेरीत मालविका बनसोडला ३२ सामन्यात अमेरिकेच्या बेवेन झांगकडून ५६ मिनिटांत २१-१९, ९-२१, १९-२१ असा पराभव पत्करावा लागला. महिला एकेरीच्या अन्य सामन्यात तस्निम मीरला अव्वल मानांकित चीनच्या वांग झी यीकडून २८ मिनिटांत ९-२१, १४-२१ असा पराभव पत्करावा लागला. सुपर ३०० स्पर्धेत सहभागी होणाऱ्या अव्वल भारतीयांमध्ये पुरुष एकेरीत अनुभवी बॅडमिंटनपटू किदाम्बी श्रीकांत आणि महिला एकेरीत जागतिक ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धेतील रौप्यपदक विजेती तन्वी शर्मा यांचा समावेश आहे.

### ईस्ट बंगाल, जमशेदपूरची अव्वल स्थानासाठी लढत

**कोलकाता** : इंडियन सुपर लीग फुटबॉल २०२५-२६ हंगामाच्या १६ व्या सामन्यात कोलकाता येथील विवेकानंद युवा भारती क्रिरांगन येथे ईस्ट बंगाल एफसी जमशेदपूर एफसीशी सामना करणार असून हे कारण दोन्ही संघ सलग तिसऱ्या विजयासाठी आणि गटात अव्वल स्थान मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मागील सामन्यात स्पोर्टिंग क्लब दिल्लीविरुद्ध ४-१ असा विजय मिळवल्यानंतर ईस्ट बंगाल एफसी गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. एडमंड लालरिंडिका, मिगुएल फिगुएरा आणि युसेफ एजेजारी यांच्या गोलमुळे ईस्ट बंगालचा सहज विजय झाला. ईस्ट बंगाल आणि जमशेदपूर दोघांचेही सुरुवातीच्या दोन सामन्यांत सहा गुण बरोबरीत असल्याने, या सामन्यातील विजेता तात्पुरत्या स्वरूपात गुणतालिकेत अव्वल स्थानावर जाईल. सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट तीन गुण मिळवणे आहे आमचे लक्ष्य आहे, त्याकरिता आम्ही आमच्या सर्वोच्च पातळीवर कामगिरी करू, असे ईस्ट बंगाल एफसीचे मुख्य प्रशिक्षक ऑस्कर ब्रुझॉन म्हणाले. दरम्यान, जमशेदपूर एफसी सहा गुणांसह यजमानांच्या मागे चौथ्या स्थानावर कोलकाता येथे पोहोचला.

### छत्तीसगडमध्ये आंतरराष्ट्रीय गोल्फ पायाभूत सुविधा उभारणार

**रायपूर** : भारतातील गोल्फ परिसंस्थेचा विस्तार आणि क्रीडा-नेतृत्वाखालील पर्यटन विकासाला बळकटी देण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, व्यावसायिक गोल्फ टूर ऑफ इंडियाचे (पीजीटीआय) अध्यक्ष पद्मभूषण कपिल देव यांनी छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई यांच्याशी राज्यातील गोल्फ पायाभूत सुविधांच्या भविष्यातील वाढीवर चर्चा केली. या बैठकीत छत्तीसगड सरकारचे वरिष्ठ प्रतिनिधी सुबोध कुमार सिंह, आयएएस आणि पीजीटीआयचे सीईओ अमनदीप जोहल देखील उपस्थित होते. जागतिक स्पर्धा आयोजित करण्याच्या दृष्टिकोनासह, नवा रायपूरमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गोल्फ पायाभूत सुविधा करण्यासाठी भागीदारीद्वारे गोल्फ वाढवण्यावर चर्चा झाली. ■

# दक्षिण आफ्रिकेने विंडीजला धूळ चारली

### मार्कराम नाबाद ८२ धावांची विजयी खेळी

### नगिदी, रबाडाचा प्रभावी मारा



एडन मार्कराम

◆ **अहमदाबाद , २६ फेब्रुवारी**

नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुरुवारी लुंगी नगिदी, कॅगिसो रबाडा व कॉर्बिन बॉशची प्रभावी गोलंदाजी आणि कर्णधार एडन मार्करामच्या नाबाद ८२ धावांच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने सुपर एट सामन्यात वेस्ट इंडीजवर २३ चेंडू शिल्लक ठेवित वेस्ट इंडीजला ८ गड्यांनी धूळ चारली. या विजयाबरोबर दक्षिण आफ्रिकेने गट १ च्या गुणतालिकेत वेस्ट इंडीजला (२ गुण) खाली खेचून ४ गुणांसह अव्वल स्थान मिळविले. या दुसऱ्या विजयामुळे दक्षिण आफ्रिकेच्या उपांत्य फेरी गाठण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहे.

दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित गोलंदाजांनी वेस्ट इंडीजला २० षटकांत ८ बाद १७६ धावांवर रोखले. त्यानंतर कर्णधार एडन मार्करामने नाबाद ८२ धावांची खेळी करत दक्षिण आफ्रिकेला सहजपणे विजयाचे लक्ष्य गाठून दिले. दक्षिण आफ्रिकेने १६.१ षटकांत १ बाद १७७ धावा केल्या.

लुंगी नगिदी व कॅगिसो रबाडाने डावाच्या प्रारंभीच चूक मारा करत वेस्ट इंडीजच्या पाच फलंदाजांना बाद केले. ६.३ षटकांत वेस्ट इंडीजने ६० धावांत निम्मा संघ गमावला. अनुभवी जेसन होल्डर व रोमारियो शेफर्डने तेवढी दक्षिण आफ्रिकन गोलंदाजांचा सामना करत संघाच्या धावसंख्येत योगदान दिले. होल्डरने तेवढी ३१ चेंडूंत ४ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने ४९ धावांची खेळी केली, तर शेफर्डने ३७ चेंडूंत ३ चौकार व ४ षट्कारांसह नाबाद ५२ धावांची अर्धशतकी खेळी केली. सलामीवीर ब्रँडन किंग (२१), कर्णधार शाय होप (१८), शेर्फन रदरफोर्ड (१२), मॅथ्यू फोर्डेने ( ११) थोडी फार मदत केली. दक्षिण आफ्रिकेकडून लुंगी नगिदीने ३ बळी, तर कॅगिसो रबाडा व कॉर्बिन बॉशने प्रत्येकी २ बळी टिपले.

कर्णधार एडन मार्करामने क्विंटन डी कॉक व रायन रिक्लेटनच्या मदतीने दमदार फलंदाजी करीत दक्षिण आफ्रिकेला एकहाती सामना जिंकून दिला. मार्करामने डी कॉकसोबत ४८ चेंडूंत ९५ धावांची सलामी भागीदारी करून अर्धी लढाई जिंकून दिली. डी कॉकने २४ चेंडूंत प्रत्येकी ४ चौकार व षट्कारांच्या मदीतने ४७ धावांचे योगदान दिले. पुढे मार्कराम व रिक्लेटनने नाबाद खेळी करत दक्षिण आफ्रिकेच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. सामनावीर ठरलेल्या एडन मार्करामने ४६ चेंडूंत ७ चौकार व ४ षट्कारांसह नाबाद ८२ धावांची, तर रिक्लेटनने २८ चेंडूंत ४ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ४५ धावांची विजयी खेळी केली.

मार्करामचे हे स्पर्धेतील तिसरे अर्धशतक व टी-२० मधील त्याचे २२ वे अर्धशतक ठरले. मार्कराम व डी कॉकने केलेली ९५ धावांची भागीदारी, ही त्यांची स्पर्धेतील सर्वोच्च सलामी भागीदारी होती. त्यामुळे शेवटी वेस्ट इंडीजच्या आशा धुळीस मिळाल्या.

◀(वृत्तसंस्था)

# डबल धमाका

दक्षिण आफ्रिकेचा विजय रथ वाटेवर येणाऱ्या सर्व अडथळ्यांना चिरडत पुढे जात आहे. भारताची अखंडीत विजयी मालिका दक्षिण आफ्रिकेने थांबवली, तेच काम आज करत त्यांनी वेस्ट इंडिजच्या चाकालासुद्धा खीळ घातली. त्यामुळे एक झालं, आपला फायदा असा झाला की नेट रनरेटला आता महत्त्व राहिलं नाही अर्थातच उरलेले दोन्ही सामने जिंकले तर.

दक्षिण आफ्रिकेने वेस्टइंडीजचा नऊ विकेट ने पराभव केला आणि आपली (म्हणजे दक्षिण आफ्रिकेची!) सेमी फायनलची जागा जवळजवळ, जवळजवळ काय १००% पक्की केली असं म्हणायला हरकत नाही.

हा वृत्तांत मी लिहित आहे, तेव्हा भारत झिंबाब्वे नाणेफेकीची वेळ झाली आहे. प्लेइंग इलेवन मध्ये कोणकोण आहे याचा उलगडा होईलच. एक बरं झालं आहे, नेट रन नेटचं दडपण राहिलं नाही, हे सामना सुरू व्हायच्या आधी सम जल्यामुळे भारतीय संघाचा खेळ आणखीन चांगला होईल. हे नक्कीच. नाणेफेक झाली आणि झिंबाब्वेने जिंकली, जिंकून त्यांनी गोलंदाजी स्वीकारली आहे.

मस्ट विन सामना आहे, त्याचं दडपण कितपत आहे या रवी शास्त्रीच्या प्रश्नाला सूर्याने फार छान उत्तर दिलं. नक्कीच, अशा सामन्याचं दडपण तुम्हाला तुमच्यातलं सर्वोत्कृष्ट द्यायला नेहमीच प्रवृत्त करतं.... मी काल म्हटलं होतं तसं अपेक्षेप्रमाणे आघाडीच्या फळीत संजू सॅमसनचा समावेश झालेला आहे, आणि अक्षर पटेलही प्लेईंग इलेव्हनमध्ये आहे. रिंकू आणि वॉशिंग्टन यांच्या जागेवर हे दोघे खेळतील. संजू हा आपला पहिला विकेटकीपर आहे, विकेट कीपिंग तोच करेल.

नाणेफेक जिंकून सिकंदर रजाने क्षेत्ररक्षण स्वीकारलं आहे, दुसऱ्या डाव्यात गोलंदाजी करताना करावा लागणार दंवाचा सामना हे एकच याचं कारण असू शकेल. आपली तथाकथित आक्रमक फलंदाजी झिंबाब्वेच्या तुलनेनं दुबळ्या माऱ्यासमोर चालली, तर हा निर्णय झिंबाब्वेला नक्कीच महागात पडेल.

अभिषेकला आज तरी सूर सापडतो का हा आताच्या घडीचा मिलियन डॉलर क्वेश्चन आहे. त्याला तो सापडेल अशी आशा करुया. कळेल लवकरच. दोन्ही संघांसाठी मस्ट विन आहे, त्यामुळे चुरशीचा सामना बघायला मिळू शकतो.

दुपारी अहमदाबादेत झालेला पहिला सामना एकतर्फी म्हणावा लागेल. पहिली फलंदाजी करताना एक वेळ वेस्ट इंडिज ७ बाद ८३ असा धावफलक होता. तेव्हा हा संघ सव्वाशे पर्यंत तरी मजल मारतो की नाही असं वाटत होतं. पण होल्डर आणि रुमारिओ शेफर्ड यांनी जबरदस्त प्रत्युत्तर दिलं. त्या दोघांमध्ये विक्रमी भागीदारी झाली. पण ही विक्रमी भागीदारी संघाला विजय मिळवून देण्यात कमी पडली. सातवी विकेट अकराव्या षटकात पडली होती.

दक्षिण आफ्रिकाला आठव्या विकेटसाठी शेवटच्या चेंडूपर्यंत वाट पहावी लागली. या दोघांनी धावफलक १७६ पर्यंत नेऊन ठेवला. तेव्हा सामना थोडा चुरशीचा होईल असं नक्कीच वाटलं होतं, पण तसं काही झालं नाही दक्षिण आफ्रिकेने आणखी एक क्लिनिकल परफॉर्मन्स सादर केला आणि सतराव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर हा सामना आरामात जिंकला, ते सुद्धा नऊ विकेट राहून. ही स्पर्धा कप्तानांची आहे या सामन्यातही मार्करम कॅप्टन्स नॉक खेळून गेला. बघू आपला कप्तान काय करतो?

अपेक्षेप्रमाणे अभिषेक आणि संजू ही डाव्या उजव्या फलंदाजांची जोडी मैदानात आलेली आहे बघूया कसा होतो सामना.. बेस्ट ऑफ लक टीम इंडिया...

आपल्या सामन्याचा वृत्तांत उद्या....

**- मुकुंद कुलकर्णी**

**मो. ९४२१४५४८८८**



# पुण्याचा स्वप्नील काशिद परमेश्वर केसरीचा मानकरी

### भिमाशंकर केसरीचा मानकरी पुण्याचाच रामा शेळके

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

मोहोळ तालुक्यातील परमेश्वर पिंपरी येथील परमेश्वर यात्रेनिमित्त थोबडे (अळ्ळे) परिवारातर्फे आयोजित कुस्ती स्पर्धेत परमेश्वर केसरी किताब पुण्याचा स्वप्निल काशिद याने अकलुजच्या गौतम शिंदे याचा पराभव करत ५१ हजार व चांदीचा गदा पटकावला.

तसेच भिमाशंकर केसरीचा किताब पुण्याच्या रामा शेळके याने आटपाडीच्या रणजीत आगलावे याचा पराभव करत ५१ हजार व चषक मिळवला. ३१ हजाराच्या कुस्ती स्पर्धेत नागेश कलागतेने शिवराज शेंडगेचा पराभव केला

सुधीर थोबडे यांच्या परिवाराच्यावतीने या कुस्त्यांचं आयोजन केले होते. आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते लावण्यात आली यावेळी भाजपचे शहर अध्यक्ष रोहिणीताई तडवळकर, संयोजक सुधीर थोबडे, जकराया साखर कारखान्याचे चेअरमन सचिन जाधव, जिल्हा परिषद सदस्य पृथ्वीराज माने, प्रतिक थोबडे, प्रथमेश थोबडे उपस्थित होते.

# सोलापूरच्या ओक व पुलगम यांचा अंतिम फेरीत प्रवेश

### राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धा



अंतिम फेरीत पोहोचलेले डावीकडून पुलगम, चोटमल व ओक.

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेच्या अधिपत्याखाली राष्ट्रीय मानांकन लॉन स्पर्धेत १२ वर्षाखालील गटात सोलापूरच्या ओक व पुलगम यांचा अंतिम फेरीत प्रवेश केला.

मुलींच्या एकेरी गटात सोलापूरच्या द्वितीय मानांकित गार्गी ओकने पुण्याच्या तिसऱ्या मानांकित इशिता पाटीलचा अत्यंत अटीतटीच्या सामन्यात ४-६ , ६-४ , ६-३ असा पराभव केला. दुहेरीत पुण्याच्या समारिया ठाकूरच्या साथीने पुण्याच्या काव्या हलदुले व रुढवी लिमकर या जोडीचा ६-१ , ६-२ असतात पराभव करून एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात अंतिम फेरी गाठली. मुलांच्या दुहेरी गटात आव्यान पुलगम (सोलापूर) व श्रेयस चोटमल (पुणे) या बिगर मानांकित जोडीने प्रथम मानांकित ध्रुव पंजाला (बेंगलोर) व आयांष गदराजू या जोडीचा अत्यंत अटीतटीच्या सामन्यात टायब्रेकर मधे ६-१ , ७-६ (५) असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ सिनेअभिनेत्री काश्मीरा सुमित रंजन यांच्या हस्ते संपन्न होणार आहे .

# समर्थ क्रीडाभारतीला २ गटात विजेतेपद, एका गटात उपविजेता

### अखिल भारतीय फुटबॉल फेडरेशनची ब्ल्यू क्यूब्स लीग स्पर्धा

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी -**

अखिल भारतीय फुटबॉल फेडरेशनच्या वतीने पाचगणी येथे झालेल्या ''संजीवन एआयएफएफ ब्ल्यू क्यूब्स फुटबॉल लीग-२०२६'' मध्ये येथील समर्थ क्रीडाभारती फुटबॉल अकॅडमीने ८ व १२ वर्षाखालील गटात विजेतेपद व १० वर्षाखालील गटात उपविजेते पटकाविले. मुंबई, पुणे, दौंड आणि पाचगणी यांसारख्या शहरांतील दिग्गज संघांचा पराभव करत अकॅडमीच्या ही कामगिरी केली. ८ वर्षांखालील गटात उपांत्य फेरीत संजीवन प्रायमरी स्कूल (पाचगणी) विरुद्धचा सामना २-० ने जिंकला. श्रेयस देवकर व पीयूष कीर्तीवार यांनी प्रत्येकी १ गोल केला.





अंतिम फेरीत यशोदा पब्लिक स्कूलविरुद्ध ३-० ने विजय मिळवत विजेतेपद पटकावले. श्रेयस देवकर याने अप्रतिम कामगिरी करत हॅट्रिक साधली.

१२ वर्षांखालील गटातील उपांत्य सामन्यात दौंड फुटबॉल अकॅडमीचा ३-० ने पराभव केला. यात ओमकार बाके (२ गोल) व निखिल वाघमारे (१ गोल) यांनी विजय सुकर केला. इंडिया रश सॉकर क्लब (मुंबई) सारख्या तगड्या संघाविरुद्धचा अंतिम सामना १-१ ने बरोबरीत सुटला. पेनाल्टी स्ट्रोकमध्ये बाजी मारली. यात युवराज उमदी व विघ्नेश पवार यांचा खेळ उत्कृष्ट झाला.

१० वर्षांखालील गटातील उपांत्य सामन्यात पंचानन फुटबॉल क्लब साताराविरुद्ध २-० ने विजय मिळविला. श्लोक लोंढे व हानगल यांनी प्रत्येकी १ गोल नोंदवला. न्यू एरा स्कूलविरुद्धचा अंतिम सामना अटीतटीचा झाला आणि पेनाल्टी स्ट्रोकमध्ये उपविजेतेपद मिळाले.

या यशात प्रशिक्षक अजय, सुमित, अमित, बंडगर आणि क्रीडा भारती अकॅडमीचे प्रमुख राजेश करमरकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उज्ज्वल मलजी, विवेक मिस्किन आदी उपस्थित होते.

विजेत्या खेळाडूंचा सोलापूर महानगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक ज्ञानेश्वर मॅकल यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी क्रीडा भारती सोलापूरच्या वतीने डॉ. विलास हरपाळे व प्रतीक तडवळकर यांनी ज्ञानेश्वर मॅकल यांचा विशेष सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण उपाध्ये यांनी केले.

**वैयक्तिक गौरव**

श्रेयस देवकर: सर्वोत्कृष्ट खेळाडू (८ वर्षांखालील गट), श्रेयस पाटील: सर्वोत्कृष्ट खेळाडू (१० वर्षांखालील गट). विशेष सत्कार: अमित ऐदाळे व नीरज गौडा.

**सहभागी यशस्वी खेळाडू**

**८ वर्षांखालील गट:** आरुष पाटील, आरुष गुंडे, एजाज शेख, राजवीर भिसे, शिवांश मंठ, सुरभी जाधव, विराज अपसिंगकर, पीयूष कीर्तीवार, श्रेयस देवकर.

**१० वर्षांखालील गट:** श्लोक लोंढे, अली शेरखान पठाण, श्रेयस पाटील, श्रेयस देवकर, शौर्य कोळी, आरोह गुंडे, हिंगोलील, कार्तिक परीट.

**१२ वर्षांखालील गट:** संकेत काशीद, युवराज उमदी, विघ्नेश पवार, विश्वराज पुजारी, वेदांत गायकवाड, ओंकार बाके, निखिल वाघमारे,वीर घोडके, युर्णगांशन झिमिक, आहतेशाम पटेल.

# 'शिवछत्रपती चषक' बुद्धिबळ स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शंभूराजे बहुउद्देशीय संस्था, श्री. रामराव शिंदे मित्र परिवार, सोलापुर चेस अकॅडमी व चॅम्प चेस स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने रविवार १ मार्च रोजी सकाळी १० वाजता टाकळीकर मंगल कार्यालय, जुळे सोलापुर येथे खुल्या व ११ वर्षाखालील निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर स्पर्धा फिडेच्या स्विस लीग नियमानुसार खेळाडूंच्या संख्येनुसार ५ ते ८ फेऱ्यात संपन्न होणार असुन खेळाडूंना प्रत्येकी १० मिनिटे व प्रत्येक चालीला ५ सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. खुल्या गटातील प्रथम क्रमांकासाठी रु. २५००, रु. १५००, रु. १०००, रु. ८००, रु. ६००, रु. ५००, रु. ४००, रु. ३००, रु. २५०, रु. २५० तसेच महिला, १५, ९ व ७ वर्षाखालील प्रत्येक गटात देखील आकर्षक पारितोषिकांसह एकूण ७५ बक्षिसे ठेवण्यात आलेली आहेत. विजेत्या खेळाडूंना एकूण रु. ३०००० पर्यंतची रोख बक्षिसे, 'शिवछत्रपती चषक' व मेडल्स देऊन गौरविण्यात येणार आहे.

इच्छुकांनी नोंदणीसाठी उदय वगरे मो.क्र. ८८८८०४५३४४ अथवा प्रशांत पिसे मो.क्र. ९१५६८१५९६३ यांच्याकडे संपर्क साधावा, असे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनाचे जिल्हाध्यक्ष रामराव शिंदे, संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी कळविले आहे.

या स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते पाटील व सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी केले आहे.

# स्थायी समितीच्या सभापतीपदाची निवड होणार बिनविरोध?

## चाकोते, पाटील, वानकर, माने यांची नावे चर्चेत

## काठवर बहुमत असल्याने वेळेवर मांडता आले नव्हते बजेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेचे महापौर, उपमहापौर व सभागृह नेता यांसह त्या पक्षाचे गटनेत्यांची निवड बिनविरोध झाली. त्यानुसार स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडही बिनविरोध होणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. या पदासाठी रंजीता चाकोते, राजकुमार पाटील, गणेश वानकर, जयकुमार माने यांची नावे चर्चेत आहेत. शुक्रवार, दि.६ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या सभेत यापैकी एका नावावर शिक्कामोर्तब होणार की ऐनवेळी नवीन नाव पुढे येणार? याविषयी राजकीय वर्तुळातून तर्कवितर्क लढविले जात आहेत.

शुक्रवार, दि.२० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या



महापालिकेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत स्थायी समितीवर भारतीय जनता पार्टीचे १४, शिवसेना व एमआयएमचे प्रत्येकी १ असे एकूण १६ सदस्यांची निवड करण्यात आली. यात 'भाजपा'चे अविनाश पाटील, सतीश सिरसिल्ला, रंजीता चाकोते, गणेश वानकर, भारतसिंग बडूरवाले, सत्यनारायण गुर्रम, अश्विनी चव्हाण, संगीता जाधव, जयकुमार माने, शिवाजी वाघमोडे, कल्पना कदम, राजकुमार पाटील, अमर पुदाले, शिवसेनेचे अमोल शिंदे, एमआयएमचे अझहर हुंडेकरी यांचा समावेश आहे.

स्थायी समितीच्या एकूण १६ पैकी तब्बल १४ सदस्य हे भारतीय जनता पार्टीचेच असल्याने सभापती पदाच्या निवडीची तारीख जाहीर होताच सत्ताधारी 'भाजपा'च्या गोटातून बिनविरोध निवडीचे प्रयत्न सुरु झाले आहेत. प्रशासकीय कारकीर्दीपुर्वी महापालिकेवर भाजपाचीच सत्ता होती. परंतु काठावर बहुमत असल्याने त्यावेळी वेळेवर बजेट मांडता आले नव्हते. यावेळी मजबूत बहुमत असल्याने चांगले बजेट तयार करण्याचे आव्हान समितीपुढे आहे. तब्बल आठ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर महापालिकेला आता स्थायी समिती सभापती मिळणार आहे.

### प्रशासनाने सादर केले होते बजेट

मागची चार वर्षे महापालिकेत प्रशासकाची राजवट होती. त्यामुळे प्रशासनाने बजेट केले होते. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी महापालिकेचे बजेट तयार करण्याचे काम स्थायी समितीला करावे लागणार आहे. स्थायी समितीच्या सभापती पदासाठी बुधवार, ४ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते १.३० यावेळेत नामनिर्देशन पत्र सादर केले जातील. शुक्रवार, ६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अतिरिक्त जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सभेत स्थायी समितीच्या सभापती पदाची निवड केली जाईल.

### असा मांडला जातोय राजकीय गणित

'भाजपा'ने महापौर, सभागृह नेता निवडताना ओबीसी समाजाचा विचार केला होता. उपमहापौरपद मराठा समाजाला दिले होते. आता स्थायी समितीच्या चेअरमन पदासाठी लिंगायत समाजाचा विचार करण्याची दाट शक्यता आहे. तसे झाले तर रंजीता चाकोते किंवा अविनाश पाटील यांची वर्णी लागु शकते. शहर उत्तरमधील नगरसेवकाला संधी देण्याचा विचार झाला तर राजकुमार पाटील, अमर पुदाले, बिजू प्रधाने, गणेश वानकर यांची नावे पुढे येऊ शकतात. माजी आमदार दिलीप माने यांच्या गटाला हे पद देण्याचा विचार झाला तर जयकुमार माने यांचाही विचार होऊ शकतो.



## शिक्षण मंडळात स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त सोलापूर महापालिकेच्या नवी पेठ येथील प्राथमिक शिक्षण मंडळाच्या कार्यालयात प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक रजनी राऊळ, निलोफर सय्यद, संतोष बुलबुले, सुरेश कासार, तरंगिणी कोंडा, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, तुकाराम भोसले, अविनाश शिंदे, भगवान गायकवाड, गुरुप्रसाद तलवार, भालचंद्र साखरे, सायली ढोले, नासिर खान आदी उपस्थित होते.



## करमाळा तालुक्यात काँग्रेसची पुनर्बांधणीला सुरुवात

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

करमाळा तालुका काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या अध्यक्षतेखाली करमाळा तालुकाध्यक्ष प्रतापराव जगताप यांच्या उपस्थितीत करमाळा येथे पार पडली. पक्ष संघटना बांधण्यासाठी व काँग्रेस पक्षाच्या वाढीसाठी, मजबूतीसाठी जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी बैठकीत सूचना दिल्या. करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न अतिवृष्टी, पिक विमा, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी सरकार विरुद्ध लढा देण्याचे ठरले. गण-गटामध्ये अध्यक्षांच्या नेमणुका करणे,पक्ष संघटना बांधणे, गाव तेथे शाखा काढणे, मोर्चा, आंदोलन करणे पक्षाने दिलेले कार्यक्रम राबविण्याचे यावेळी ठरले. यावेळी सुजय जगताप, प्रतीक जगताप, उत्तरेश्वर सावंत, गफूर शेख, चंद्रकांत साळवे, प्रमोद कुंभार, शिवाजी आवटे, महेश दिवाण, निखिल कदम, मुनीर शेख, सुदाम यादव, अजित शेख, भावना गांधी, ॲड.भद्रेश गांधी, डॉ.अमोल दुरंगे, रावसाहेब शिंदे, विष्णू इरकर, प्रवीण शिंदे, राजेश शिंदे, दादासाहेब भांडवलकर, मारुती रणशिंग, लक्ष्मीबाई रणशिंग, अश्विनी शिंदे, भाऊसाहेब शिंदे, संगीता क्षीरसागर आदी उपस्थित होते.

## वृद्ध महिलेस वाहनाने दिली धडक

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

राहत्या घराबाहेर पायी चालत असताना अज्ञात वाहनाने एका वृद्ध महिलेस धडक देऊन गेल्याने त्यांना जखमी व बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल करण्यात आले. यात हकीकत अशी की, मुक्ताबाई प्रल्हाद होनकळस वय ७७ राहणार मसले चौधरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर ह्या राहत्या घराबाहेर पायी चालत असताना अज्ञात वाहनाने धडक देऊन गेल्याने त्यांना जखमी व बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी सरकारी दवाखाना वडाळा येथे दाखल करण्यात आले होते तेथून पुढील उपचारासाठी खाजगी दवाखाना अपेक्स येथे दाखल केले असता पेशंटच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे नातू दत्तात्रय गाडे यांनी दाखल केले.

## महिलेसह तिच्या पतीला मारहाण; चौघा जणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

मुलीला शिवीगाळ का केली? असे विचारणा केली असता शिवीगाळ करत एका महिलेसह तिच्या पतीला मारहाण करण्यात आल्याची घटना दि.२५ फेब्रुवारी रोजी मड्डी वस्ती येथे घडली. याप्रकरणी चौघा जणांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



यात हकीकत अशी की, मुलीला शिवीगाळ केल्याच्या कारणावरुन रेश्मा पाटणकर व संतोष पाटणकर हे पती-पत्नी जाब विचारण्यासाठी गेले असता पृथ्वीराज जेटीथोर, अर्चना जेटीथोर, चंद्री, रोहित या चौघांनी पाटणकर पती-पत्नीला शिवीगाळ व मारहाण केली.

# सोनी नगर येथे नूतन 'आरोग्यवर्धिनी केंद्र' उभारले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ मधील नागरिकांसाठी आरोग्याच्या दृष्टीने मोठी आणि दिलासादायक ठरला आहे. सोनी नगर येथे नूतन 'आरोग्यवर्धिनी केंद्र' उभारण्यात आले असून परिसरातील हजारो नागरिकांना याचा थेट लाभ होणार आहे.

या केंद्रासाठी प्रभागातील भाजपा नगरसेवक किसन जाधव, दत्तात्रय नडगिरी, अंबिका नागेश गायकवाड व चैत्राली शिवराज गायकवाड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे आणि प्रशासनाच्या सहकार्याने हे केंद्र साकार झाले.



महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उपायुक्त लोकरे, आरोग्याधिकारी राखी माने यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राची उभारणी पूर्ण झाली. या केंद्रामुळे सोनी नगर हडको, लहान इरण्णा वस्ती, मोठी इरण्णा वस्ती, रेवणसिद्धेश्वर नगर झोपडपट्टी, आम्रपाली चौक परिसरातील नागरिकांना आर्थिक आणि आरोग्यदृष्ट्या मोठा फायदा होणार आहे. उद्घाटनानिमित्त आयोजित आरोग्य शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची तपासणी करून मोफत औषधोपचार देण्यात आले.

अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज असलेले हे केंद्र कष्टकरी कामगारांसाठी वरदान ठरणार असल्याचे नगरसेवक किसन जाधव यांनी सांगितले. याप्रसंगी डॉ.म्हेत्रे, प्राजक्ता काकडे, रुपेश गायकवाड, संतोष माने, इस्माईल मनुरे, मल्लिकार्जुन बेनावत, अविनाश गवळी, उमेश चलवादी, प्रीती गायकवाड, नागेश ढेंगळे, संतोष गायकवाड, हरीश तेलगू, विकी सगटे, सिद्राम माडेकर, येलगुंडे मावशी, वसंत पवार उपस्थित होते.

## तांत्रिक, डिजिटल गुन्ह्यांबाबत नवी दृष्टी याविषयी व्याख्यान

**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

सोलापूर बार असोसिएशनतर्फे आयोजित व्याख्यानमालेत ॲड. अरविंद देडे यांनी भारतीय दंड संहितेतील विविध तरतुदींमध्ये झालेले मूलभूत बदल, नव्याने समाविष्ट केलेल्या संकल्पना, शिक्षेतील तरतुदींची पुनर्रचना, गुन्ह्यांचे वर्गीकरण, तांत्रिक आणि डिजिटल गुन्ह्यांबाबत नवी दृष्टी याबाबत विवेचन केले. ॲड.बाबासाहेब जाधव यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. ॲड.रियाज शेख यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. ॲड.बसवराज हिंगमिरे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी ॲड. सत्यनारायण माने, ॲड.नागनाथ बिराजदार, ॲड.विकास कुलकर्णी, ॲड.आशुतोष होरगिनमठ, ॲड. गणेश माशाळे, ॲड.अनिरुद्ध सोनावणे, ॲड. प्रजोत मुटकुळे आदी उपस्थित होते.

# शेळ्या चोरीचे १८ गुन्हे करणारी टोळी जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

स्थानिक गुन्हे शाखा सोलापूर ग्रामीणच्यावतीने १ चारचाकी वाहन, २ मोटारसायकलींसह शेळ्या चोरीचे १८ गुन्हे करणारी टोळी जेरबंद करण्यात आली आहे. तीन इसम १ चारचाकी गाडी व २ मोटारसायकल घेऊन मोहोळ-पोखरापुर रोडवर थांबली असल्याचे गोपनीय बातमीदार यांनी माहिती दिली त्यावरून सहा पोलीस निरीक्षक भिमगोंडा पाटील यांच्या टीमने तीन इसमांना वाहनांसह ताब्यात घेतले. मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, सोलापूर तालुका या भागांत शेळ्या व मोटारसायकल चोरीचे १८ गुन्हे केल्याची कबुली दिली.

सदरची कामगिरी पोलीस निरीक्षक संजय जगताप यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक भिमगोंडा पाटील, पोलीस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के, सपोफो. प्रकाश कारटकर, पो हवा सलीम बागवान, विजय भरले, शशी कोळेकर, विरेश कलशेट्टी, धनराज गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल सागर ढोरे पाटील, प्रमोद शिंपाळे, समर्थ गाजरे, यश देवकते, योगेश जाधव, राहुल दोरकर, हरीष थोरात व चालक दिलीप थोरात यांनी केली आहे

# इंद्रभुवन इमारतीच्या पायरीवर टाकले मृत मासे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

श्री सिद्धेश्वर तलावातील माशांच्या मृत्यू प्रकरणी महापालिका प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवत इंद्रभुवन इमारतीच्या पायरीवर मृत मासे टाकून प्रहार संघटनेच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले.

श्री सिद्धेश्वर तलाव येथील शेकडो मासे ऑक्सिजनच्या अभावामुळे मृत झाल्याची घटना समोर आली आहे. माशांचा मोठ्या प्रमाणावर मृत्यू झाला तसेच कासवांचा मृत्यूही झाला आहे. प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष अजित कुलकर्णी म्हणाले की, श्री सिद्धेश्वर तलावातील पाणी प्रदूषित होते तर इतके दिवस प्रशासन काय करत होते? दूषित पाण्यामुळे मासे आणि कासव यांचा मृत्यू झाला. या तलावाचे पावित्र्य धोक्यात आले आहे. सोलापूर स्मार्ट सिटी योजनेतील कामांचे काय झाले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

# विभागीय कार्यालयांच्या कामकाजाचा महापौर कोंड्याल यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांनी विभागीय कार्यालयांच्या विविध कामकाजांचा आढावा घेतला. शहरातील अनेक भागांत खड्ड्यांची समस्या आहे ते दुरुस्ती करावी. मूलभूत सुविधांबाबत तातडीच्या उपाययोजना करा. नागरिकांना दिलासा द्यावा, असे निर्देश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.

काही भागांत घंटागाडी नियमित जात नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत असून कचरा संकलन व्यवस्था सुरळीत व वेळेवर ठेवण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. काही भागांत वेळेवर पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारींचीही दखल घेण्यात आली.

पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून निश्चित वेळापत्रकानुसार पाणी देण्यात यावे, गळती दुरुस्तीची कामे तात्काळ पूर्ण करावीत, ड्रेनेज लाईन तुंबणे, स्ट्रीट लाईट बंद असणे, मोकाट जनावरांचा त्रास, पथदिव्यांची देखभाल,



उद्यानांची स्वच्छता, नालेसफाई, सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता आदी मुद्द्यांवरही चर्चा झाली.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, नगर अभियंता सारिका आकुलवार, नगरसेवकद्वय सिध्देश्वर कमटम, भारतसिंग बडुरवाले यांच्यासह वेंकटेश चौबे, राजेश परदेशी आदी उपस्थित होते.

# मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांना ऊत

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ३६ गावांमध्ये अवैद्य दारू, मटका व जुगार यांना उत आले असून तरुण पिढी व्यसनाधीन बनत चालली आहे. मंद्रूप पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक पटवारी यांनी पदभार स्वीकारला असून अवैध धंद्यांवर कारवाई करणार असल्याचे सांगितले आहे. मात्र अद्याप कोणत्याही अवैद्य धंद्यावर कारवाई झाली नाही. त्यामुळे नूतन पोलीस अधिकाऱ्यांनी व्यसनाधीन तरूणांचे प्रमाण कमी करण्यासाठी कारवाई करण्याची मागणी होत आहे .




मंद्रूप पोलिस ठाण्याच्या हद्दीतील टाकळी येथे मटका घेणाऱ्यांच्या तरुणांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे . पोलिसांच्या सहकार्याने अवैध धंदे वाढत असल्यामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. टाकळी गावांमध्ये लहान मुलांपासून ते अनेक वृद्ध मटका घेताना दिसून येतात. शिवाजी चौक व बसस्थानकावर अनेक तरूण खोक्यांमधून दिवसा उघडपणे मटका घेत आहेत. याबाबत अनेक वेळा पोलीसांकडे तक्रार करण्यात आल्यानंतरही कारवाई होताना दिसून येत नाही.

टाकळी कर्नाटक सीमेवरील गाव असल्यामुळे कर्नाटकातून मटका खेळणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शिवाजी चौकातून कुडल येथे जाताना संगमेश्वरच्या बुकीचे दर्शन होते. याशिवाय मटका घेणाऱ्या बुकी व चालकांना मंद्रूप पोलिसांकडून संतोषने लाड केले जात असल्यामुळे तरुणांना पोलिसांच्या कारवाईची भीती राहीली नाही. शिवाय टाकळी परिसरातच अनेक जुगार अड्डेही सुरू आहेत. दीड महिन्यापूर्वी टाकळी येथील जुगार अड्यावर सोलापूरच्या पोलिसांकडून कारवाई करण्यात आली होती.

आमदार सुभाष देशमुख यांनी मंद्रूप पोलीस ठाणेच्या हद्दीतील अवैद्य डान्सबार संदर्भात अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला आहे. त्याप्रमाणे तरूणांना व्यसनाधीनतेपासून वाचविण्यासाठी पोलीस अधीक्षकांकडे अवैद्य दारू, मटका व जुगार अड्यांवर कारवाई करण्यासाठी पाठपुरावा करण्याची मागणी होत आहे.

तरीही या परिसरात शेतामध्ये व महामार्गालगत काटेरी झुडुपांमध्ये अनेक ठिकाणी जुगार अड्डे सुरू असल्याचे नागरिकांमधून सांगण्यात येत आहे. पोलिसांकडून जुगार अड्यांवरील कारवाईआधी माहिती देण्यात येत असल्यामुळे तरुणांनाही पोलिसांच्या कारवाईची भीती राहीली नसल्याचे चर्चा सुरू आहे . त्यामुळे दिवसेंदिवस व्यसनाधीन तरुणांची संख्या वाढत चालली आहे. म्हणून वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी टाकळी येथील मटका व अवैद्य जुगार अड्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# 'कर्तव्य पथ'वरील चित्ररथात सिद्धेश्वर महाराजांच्या परंपरेचा समावेश करावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

२६ जानेवारी २०२७ रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिन संचलनातील 'कर्तव्य पथ'वरील चित्ररथामध्ये सोलापूरच्या ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराजांच्या परंपरेचा समावेश करावा, अशी मागणी आमदार सुभाष देशमुख यांनी राज्य सरकारकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांना निवेदन दिले आहे.

सोलापूर हे श्री सिद्धेश्वर महाराजांची पावनभूमी असून त्यांची परंपरा सुमारे ८०० वर्षांपासून अखंड सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. श्री सिद्धेश्वर महाराज हे १२व्या शतकातील संत असून त्यांनी सोलापूरात ६८ शिवलिंगांची स्थापना केली. त्यांच्या कार्यामुळे उभारलेले सिद्धेश्वर मंदिर हे सोलापूरचे प्रमुख श्रद्धास्थान मानले जाते.



दरवर्षी जानेवारी महिन्यात येथे सिद्धेश्वर महाराजांचा विवाह सोहळा 'गड्डा यात्रा' या नावाने मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या यात्रेत मानकरी नंदीध्वजांची मिरवणूक काढली जाते तसेच होम विधी आणि अक्षता सोहळा पार पडतो. सोलापूरच्या ग्रामीण संस्कृतीचे आणि धार्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या या सोहळ्याचा समावेश 'कर्तव्य पथ'वरील चित्ररथात करण्यात यावा, अशी विनंती आमदार देशमुख यांनी केली आहे. विविध राज्यांच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविणाऱ्या या चित्ररथात सोलापूरच्या या वैशिष्ट्यपूर्ण परंपरेला स्थान मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यांना ‘अवकाळी’ची भीती

### हवामान विभागाचा इशारा नसल्याने दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

गेल्या आठवड्यापासून सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्याच्या वातावरणात बदल झाल्याने अवकाळी पावसाचे भय शेतकरी बांधवांना लागून राहिले आहे. यामुळे रब्बी हंगामातील हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. ज्या भागात अवकाळीच्या सरी कोसळल्या त्या ठिकाणच्या पिकांना मोठा फटका बसला आहे. जिल्ह्यातील काही भागात असे नुकसान झाल्याची माहिती कृषी विभागाकडून मिळाली. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यासाठीही २४ आणि २५ फेब्रुवारीस यलो अलर्ट होता. मात्र सध्या वातावरणात बदल नसल्याची माहिती सोलापूर जिल्हा आपत्ती विभागाकडून मिळाली.

राज्यातील अवकाळी पाऊस अन् गारपिटीने मराठवाडा आणि विदर्भात तब्बल ३७ हजार हेक्टरवरील पिकांचे अतोनात नुकसान केलंय. याचे पडसाद विधिमंडळात उमटले असून, सरकारने तातडीने



पंचनाम्यांचे आदेश दिलेत. पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातही आता वातावरणात बदल झाला असल्याने शेतकरी बांधवांत धास्तीचे वातावरण आहे. या पावसामुळे द्राक्ष आणि आंबा बागायतदारांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. दरम्यान, ऊस गाळप हंगामाची सांगता झाल्याने शेतकऱ्यांचे उसाचे काही नुकसान झाले नाही.

महाराष्ट्रात मागील चार दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली असून, विदर्भ आणि मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पावसाच्या सरी कोसळल्या. या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली आहे. अशातच आता पुन्हा हवामान खात्याने काही जिल्ह्यांना रेड, यलो अलर्ट जारी केला आहे. सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये विजांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. राज्याच्या इतर भागांमध्ये ढगाळ वातावरण कायम राहणार असून उन्हाळ्याच्या दिवसांतील तापमान वाढ सुरूच राहील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

सोलापूर शहरासह, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, वैराग, उत्तर सोलापूर तालुक्यांत सोमवारी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. मैंदर्गी येथे त्याच दिवशी सायंकाळी गारांचा पाऊस झाला. विजांच्या कडकडाट अवकाळी पाऊस पडल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. सोमवारी पहाटेपासून ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत कमी-अधिक प्रमाणात शहरासह जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. काही भागात काढणीस आलेली ज्वारी जमीनदोस्त झाल्याने ज्वारीच्या कणसांचे मोठे नुकसान झाले आहे. हरभरा पिकाचेही नुकसान झाले आहे.

## ‘उजनी’तील दुषित पाण्यामुळे सोलापूरकरांना ‘कॅन्सर’ची बाधा

### दीर्घकालीन उपाययोजना करा; आ.देवेंद्र कोठेंची मागणी


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

जिल्ह्याची जीवनदायिनी म्हणून गणल्या जाणाऱ्या उजनी धरणातील पाण्यात कुरकुंभसह विविध एमआयडीसी आणि पुणे, पिंपरी



चिंचवड शहरातील दुषित पाणी मिसळले जात आहे. त्यामुळे सोलापूरकरांना ‘कॅन्सर’ची बाधा होत आहे, याकडे आमदार देवेंद्र कोठे यांनी लक्ष वेधले. महाराष्ट्र शासनाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार देवेंद्र कोठे यांनी हा गंभीर प्रश्न उपस्थित केला.

गेल्या ३० ते ४० वर्षांपासून पुण्यातील कुरकुंभ एमआयडीसी,



पिंपरी चिंचवड तसेच पुणे शहरातून दूषित पाणी उजनी धरणात मिसळले जात आहे. यावर वेळीच उपाययोजना न केल्याने या पाण्यामुळे सोलापूर शहर, जिल्ह्यात कॅन्सरग्रस्तांचे प्रमाण वाढत आहे. या गंभीर विषयाबाबत दीर्घकालीन उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

विकसित सोलापूरचे ध्येय गाठण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी करण्यात येणार आहे, असेही आ.देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

## सनातन धर्मदर्शन पुस्तकाचे आज प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

कर्नाटकचे डॉ.आंबेडकर या नावाने गौरविले जाणारे ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत, साहित्यिक आणि वचनकार कुमार कक्कय्या पोळ यांच्या बहुचर्चित सनातन धर्मदर्शन या पुस्तकाचे प्रकाशन शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता डॉ.निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे करण्यात येणार आहे, अशी माहिती सच्चिदानंद व्हटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोनकवडे गुरुजी प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या कार्यक्रमात माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ समीक्षक डॉ.प्रा.श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

यावेळी आमदार विठ्ठल कटकधोंड, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष दत्ता सुरवसे , पुस्तकाचे अनुवादक चन्नवीर भद्रेश्वरमठ, प्रगती प्रकाशनचे संचालक दत्ता थोरे, सोनकवडे गुरुजी प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा गीता शिंदे, सचिव राजश्री सोनकवडे, कुमार कक्कया पोळ प्रतिष्ठानचे अध्यक्ष चिदानंद पोळ आदी उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेला अशोक आगावणे, फारुक शेख, बापू मस्के आदी उपस्थित होते.



**सोलापूर : विजापूर रोडवरील अतिक्रमणचा अडथळा दूर करण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाईची मोहिम हाती घेतली आहे.**

## एकही दाखला न देणारी ३९ ‘आपले सरकार’ सेवा केंद्र रद्द

### आठवडाभरात नव्याने निविदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

गेल्या तीन महिन्यांत एकही दाखला न देणाऱ्या जिल्ह्यातील तब्बल ३९ आपले सरकार सेवा केंद्रांचे परवाने जिल्हा सेतू समितीने रद्द केले आहे. सेवा केंद्र रद्द केलेल्या ठिकाणांसाठी येत्या आठवडाभरात नव्याने निविदा काढण्यात येणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यात ३ वर्षापूर्वी विविध ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्राचे वाटप करण्यात आले होते. मात्र, सेतू समितीने केलेल्या पडताळणीत जिल्ह्यातील ३९ केंद्रांचे कामकाज पूर्णपणे ठप्प असल्याचे आढळले. यात बार्शी, मंगळवेढा आणि उत्तर सोलापूर




या तालुक्यातील प्रत्येकी ५, मोहोळ व अक्कलकोट प्रत्येकी ४, माढा, करमाळा व पंढरपूर प्रत्येकी ३ केंद्रांचा समावेश आहे. दरम्यान, या कारवाईमुळे कर्तव्यात कसूर करणाऱ्या केंद्र चालकांमध्ये खळबळ उडाली आहे.

## भारतीय जनता पार्टीकडून ८ पंचायत समिती सदस्यांची गटनोंदणी : चव्हाण

### जिल्हा परिषदेचा गटनेता आज ठरणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

भारतीय जनता पार्टीकडून जिल्ह्यातील ८ पंचायत समिती सदस्यांची जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे गटनोंदणी करण्यात आली आहे. यामध्ये अक्कलकोट, बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, माढा, मोहोळ, करमाळा व मंगळवेढा या पंचायत समित्यांचा समावेश आहे, अशी माहिती ‘भाजपा’चे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी दिली.

अक्कलकोट पंचायत समितीत सागर कल्याणशेट्टी, दक्षिण सोलापूरमध्ये बलवान गोतसुर्वे, बार्शीमध्ये भीमा गव्हाणे यांची निवड करण्यात आली आहे. माळशिरस, सांगोला आणि पंढरपूर या पंचायत समित्यांमध्ये महाविकास आघाडी, शिवसेना (शिंदेगट) यांची सत्ता असल्याने त्यांनीही गटनेता निवडून गटनोंदणी केले आहे.

जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष ठरविण्यासाठी शासन स्तरावरून पत्र प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड बैठकीसाठीची तारीख अजून जिल्हा प्रशासनाकडून मिळाली नाही. मात्र २० मार्चपूर्वी जिल्हाधिकारी बैठक घेणार असल्याने शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी भारतीय जनता पक्षाचा गटनेता जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे ठरविणार आहेत.

गटनेता होण्यासाठी आणि अध्यक्षपदासाठी अनेकजण इच्छुक असले तरी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि प्रदेश पदाधिकाऱ्यांकडूनच इच्छुकांतील एका नावाची अध्यक्षपदासाठी घोषणा होणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.



**सोलापूर शहरात रॅगिंग, छेडछाडीच्या घटना वाढल्या आहेत. यासंदर्भात पोलिस आयुक्तालयतर्फे जनजागृतीपर उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.**

## उपमहापौर देवकर यांच्या तत्परतेमुळे भुईकोट किल्ल्यातील आग आटोक्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

ऐतिहासिक भुईकोट किल्ला परिसरातील खंदक बागेत बुधवारी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या तत्परतेमुळे ही आग आटोक्यात आली.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी अग्निशामक अधिकारी राकेश साळुंके यांच्याशी संपर्क साधत अग्निशामक दलाची गाडी त्वरित घटनास्थळी रवाना केली. उपमहापौर देवकर यांनी घटनास्थळाला भेट दिली.



पुरातत्व विभाग, महापालिका, पोलीस प्रशासन व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करुन भुईकोट किल्ला व बागेच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र बैठक घेऊन ठोस उपाययोजना करण्यात येणार असल्याचे उपमहापौर देवकर यांनी सांगितले.

दरम्यान, या आगीत काही प्रमाणात वृक्षांना फटका बसला असला तरी मोठी हानी टळली आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याबाबत चौकशी सुरु असल्याचे सांगण्यात आले.

## सोलापूर जिल्ह्यात शिक्षणाच्या नव्या पर्वाला सुरुवात : महापालिका आयुक्त ओम्बासे

### सोलापूर विद्यापीठात भाषा व वाङ्मय संकुलाच्या इमारतीचे भूमिपूजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी -**

केवळ एका जिल्ह्यासाठी सन २००४ मध्ये सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाली आणि जिल्ह्यात उच्च शिक्षणाच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली. यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दर्जेदार सोय उपलब्ध झाली, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले.

केंद्र शासनाच्या पीएम उषा योजने अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात उभारण्यात येत असलेल्या भाषा व वाङ्मय संकुल इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी बोलताना ते पुढे म्हणाले, यामुळे मुला-मुलींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी मिळाली

भाषा व वाङ्मय संकुलामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध होणार असून अभ्यास, संशोधन आणि साहित्यिक उपक्रमांना चालना मिळेल. सोलापूरच्या सर्वांगीण प्रगतीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा वाटा निश्चितच महत्त्वपूर्ण आहे, असेही ते म्हणाले.

पोलीस आयुक्त एम.राजकुमार याप्रसंगी बोलताना म्हणाले, भाषा व वाङ्मय संकुलाच्या माध्यमातून भाषा विषयाच्या विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळतील. विद्यार्थ्यांनी वैयक्तिक प्रगती साधत असताना सोलापूरच्या विकासातही आपला सक्रिय वाटा उचलावा.

कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर अध्यक्षस्थानावरुन बोलताना म्हणाले, सोलापूर विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी सोलापूर महानगरपालिका, जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासन आदी यंत्रणांचे पाठबळ मिळत आहे. विद्यापीठाच्या पायाभूत सुविधांमध्ये भाषा व वाङ्मय संकुल महत्वाचे ठरणार आहे

याप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, ‘साबांवि’चे कार्यकारी अभियंता अजयकुमार भोसले यांच्यासह प्रा.देवानंद चिलवंत, डॉ.महादेव खराडे, डॉ.श्रीकांत अंधारे, गिरीश कुलकर्णी, प्रल्हाद कांबळे, ॲड.मल्लिनाथ शहाबादे, डॉ.वीरभद्र दंडे, डॉ.जैनुद्दीन मुल्ला, डॉ.नेताजी कोकाटे, डॉ.प्रभाकर कोळेकर आदी उपस्थित होते.

## ▶▶ महत्वाचे...



### स्मिता देशपांडे यांचे वास्तु विशारद परीक्षेत यश

**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्र-पुणे यांच्याद्वारा घेण्यात आलेल्या वास्तू विशारद पदवी परीक्षेत स्मिता देशपांडे यांनी यश संपादन केले. वेदमूर्ती डॉ.उमेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विशेष योग्यता मिळविली. वास्तुगुरु डॉ.दिलीप नहार यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी वास्तुगुरु डॉ. नरेंद्र सहस्त्रबुध्दे, ज्योतिर्विद अष्टेकर, वेदमूर्तीद्वय गोपाळ जोशी, वैभव कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

### काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या जिल्हाध्यक्षपदी महेश रायखेलकर

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी महेश रायखेलकर, शहराध्यक्षपदी श्रीमंत कोळी तर उपाध्यक्षपदी प्रा.नरेंद्र गुंडेली यांची निवड करण्यात आली. राज्याध्यक्ष आनंद घोडके, राज्य सचिव कालिदास चवडेकर, राज्य कोषाध्यक्ष कृष्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडण्यात आलेले अन्य पदाधिकारी याप्रमाणे; उपाध्यक्ष-मारुती साखरे व शंकर कांबळे, कोषाध्यक्ष-सुभाष सुरवसे, सचिव-हेमंत रत्नपारखी, सहसचिव-नितीन डोंगरे व रजिया जमादार. सोलापूर शहर कोषाध्यक्ष-शैलेश उकरंडे, सचिव-मयुरेश कुलकर्णी, सहसचिव-ज्योती वाघमारे व जमालोद्दीन शेख.





### वीरशैव लिंगायत समाजातर्फे १५ मार्च रोजी सामुदायिक विवाह

**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने रविवार, १५ मार्च २०२६ रोजी अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जून नगर येथील मल्लिकार्जून लॉन येथे सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्रीशैल होळ्ळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. समाजहिताच्या दृष्टिकोनातून हा उपक्रम हाती घेण्यात आला. या सोहळ्यातंर्गत धार्मिक विधी, सुशोभित मंडप, वधू-वरांसाठी आवश्यक व्यवस्था, अल्पोपहार, मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. इच्छुकांनी ५ मार्च २०२६ पर्यंत विकास हिरेमठ ९१४६१६६६३६ किंवा बसवराज अहिरवाडी ९८४१३१०११६ यांच्याकडे नावे नोंदवावीत, असे आवाहनही त्यांनी केले. या पत्रकार परिषदेस गणेश माळी, बसवण्णा कटारे, विकास हिरेमठ, प्रकाश केसरे, राहुल जत्ती आदी उपस्थित होते.



### रमजान महिन्यात व्यवसायाला रात्री १ वाजेपर्यंत परवानगी द्यावी

**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी-**

पवित्र रमजान महिना सुरु असून याकाळात मुस्लिम बांधव दिवसभर रोजे पाळतात. रात्री उशिरापर्यंत बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे सर्व दुकाने, स्टॉल्स, हॉटेल्स व इतर आस्थापनांना रात्री १ वाजेपर्यंत व्यवसाय सुरु ठेवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी एमआयएमच्या नगरसेवकांनी पोलिस आयुक्त यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. इफ्तारच्या वेळी नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येत असल्यामुळे त्यावेळेत वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी इफ्तार आणि सायंकाळच्या नमाजवेळी नागरिकांना सूचना देण्यासाठी मशिदींमधून किंवा निश्चित ठिकाणी केवळ दहा मिनिटांसाठी लाऊडस्पीकर वापरण्याची परवानगी देण्यात यावी, असेही या निवेदनात म्हटले आहे. यावेळी नगरसेवक तौफिक हत्तुरे, वाहेदा शेख, अनिसा मोगल, अखिला भागनगरी, आसिफ शेख, नय्युम सालार, बाबा सालार, शोएब चौधरी आदी उपस्थित होते.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३६८

**नाहीं वैराग्याचा लेश। अर्थचाड जीवें आस।।**
**हें ना तैसें झालें। तुका म्हणे वायां गेले।।**

वैराग्य हा साधुसंतांचा खरा अलंकार असतो. हा अलंकार ज्याच्याकडे नाही, तो साधु किंवा संत असेलच असे नाही. हे सत्य असले तरी समाजात असे अनेक लोक आहेत की ज्यांच्याकडे हा अलंकार नाही, ते स्वत:ला साधु, संत, संन्याशी म्हणून घेतात. विशेष म्हणजे अशा लोकांची महती गाणारेही कांही कमी नसतात. आपल्या संसारासाठी, स्वार्थापोटी उदरनिर्वाहासाठी अनेकांनी अध्यात्म हा व्यवसाय केल्याचे आपण पहातो. नाटकामध्ये कलाकार तरी इमानदारीने त्याचे पात्र भूषवितो. त्याला जाणीव असते की मूळ आपण आणि पात्रातील आपण यात फरक आहे. पण या ढोंगी लोकांना आपण या स्वार्थी नाटकात जे पात्र भूषवित आहोत, तेच आपले खरे रुप आहे असे वाटते. त्यामुळे असे ढोंगी स्वत:ही फसत आहेत आणि जनसामान्यांनाही फसवित आहेत. आपल्या ढोंगी वर्तनाच्या आधारे भोळ्या भाबड्या लोकांना फसवून पैसा कसा जमा करता येईल, याचा विचार करणाऱ्या या लोकांबद्दल बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, नाहीं वैराग्याचा लेश। अर्थचाड जीवें आस ।। हें ना तैसें झालें। तुका म्हणे वायां गेले।।



नि:स्वार्थपणे भगवंताची, जनसामान्यांची सेवा करणारे अनेक संत, महात्मे समाजात आहेत. पण अशा संत महात्म्यांचा गाजावाजा किंवा उदो-उदो होत नाही. कारण खरे संत सज्जन सर्व दिखाऊ बाबीपासून दूर असतात. त्यांना स्वत:चा उदो उदो करून घेणे आवडत नाही. व्यवहार नांवाचा प्रकार त्यांच्या तना-मनात नसल्याने त्यांना मोठेपणची गरज नसते. पण केवळ व्यवहारासाठीच या क्षेत्रात जाणून-बुजून उतरले आहेत, त्यांना दिखाऊपणा केल्याशिवाय मोठेपण मिळतच नसते. म्हणूनच हे लोक स्वार्थ साधण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचा साधुपणाचा आव आणतात. आपल्या राहणीमानातून, वर्तनातून, हावभावातून संत असल्याचे दाखवतात. मूळात संतपणा हा दाखवून मिळवता येणारा विषय नाही. पण साधु-संतांची खरी व्याख्याच यांना माहिती नसल्याने अज्ञानातच आनंद मानने त्यांना बरे वाटते. वैराग्याचा लवलेशही त्यांच्याकडे नसल्याने व निरंतर आपणास द्रव्य मिळावे हीच अपेक्षा ठेवणारे हे लोक परमार्थ, आत्मज्ञान तर जाणतच नाहीत. पण खऱ्या अर्थाने आपण कोण आहोत, हे ही जाणत नाहीत. ज्याला आपण कोण आहोत हेच कळत नाही, त्याला ईश्वर, आत्मज्ञान कळण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ढोंगीपणाचा अंगिकार करून साधु संतांचे नाटक करणारे हे लोक लोकांकडून विविध प्रकारची सेवा करून घेतात. स्वत:च्या नावाचा उदो-उदो करून घेणे, अर्थहीन मंत्र देणे, आशीर्वाद देणे, न कळत भिती घालणे, लोकांच्या भावनेशी खेळणे, मोठेपणा मिळविणे हे सर्व प्रकार सर्रास करतात. या लोकांना जगाशी सोडाच; पण स्वत:च्या घरातील सदस्यांशीही नीट वागता येत नाही. कारण फसवणूकीच्या विचाराशिवाय यांच्या मनात दुसरे कांही चालतच नसते. अशा ढोंगी लोकांना आपण ओळखायला शिकलो पाहीजे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. २७ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - फाल्गुन शु. दशमी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- मार्गशीर्ष (१२.११)**
**योग -प्रिती (२३.३३)**
**करण - तैतिल (१३.३६)**
**राहू काल : शुक्रवार**
**शुक्रवार : दु. १०.३० ते १२.००**
**दिनविशेष : आमलकी एकादशी, मराठी भाषा गौरव दिन**
**१९९९: पंधरा वर्षे सुरू असलेली लष्करी राजवट संपुष्टात येऊन नायजेरियात अध्यक्षीय निवडणूक.**
**१९००: ब्रिटन मधे मजूर पक्षाची स्थापना.**
**१८४४: डॉमिनिकन रिपब्लिकला हैतीपासुन स्वातंत्र्य मिळाले.**

## ज्येष्ठ नागरिक संघातर्फे उद्या व्याख्यान

**सोलापूर, दि.२५ फेब्रुवारी-**

ज्येष्ठ नागरिक संघ बंथनाळ मठ जुळे सोलापूरतर्फे शनिवारी २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता इंडियन मॉडेल स्कूल जुळे सोलापूरच्या मेस हॉलमध्ये वालचंद कॉलेजचे प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांचे शिवरायांचे जीवनचरित्र या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य ए. डी. जोशी आहेत. गुरुलिंग कन्नुरकर यांची ज्येष्ठ नागरिक संघाच्या पुणे विभागीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तरी सर्व ज्येष्ठ नागरिक सदस्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष सिद्राम सनके यांनी केले आहे.

# मावा-गुटखा विक्री, मटका व जुगार व्यवसायावर कारवाई करा

### शिवसेनेची पोलिस आयुक्तांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

शहरातील पानटपऱ्यांमध्ये सुरू असलेली मावा - गुटखा विक्री, मटका व जुगार व्यवसाय यावर तात्काळ बंदीची प्रभावी अंमलबजावणी व कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवसेना बांधकाम कामगार संघटना जिल्हाध्यक्ष सायबन्ना तीग्गेळी यांनी पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी सलाउद्दीन शेख, नागेश पासकंटी, नागेश माने, गुरुनाथ पाताने आदी उपस्थित होते.

सोलापूर हे कामगार व कष्टकरी वर्गाचे शहर असून, येथे हजारो कुटुंबे रोजंदारीवर उदरनिर्वाह करतात. गेल्या काही वर्षांपासून शहरातील विविध भागांमध्ये पानटपऱ्यांवर तंबाखू मिक्स मावा, गुटखा, सुगंधित तंबाखू, तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीसह मटका व जुगाराचा अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर फोफावला असून, त्याचे अत्यंत गंभीर दुष्परिणाम नागरिकांवर होत आहेत.

शासनाने गुटखा व तंबाखूयुक्त पदार्थांच्या विक्रीस बंदी घातलेली असतानाही, शहरातील दोन ते तीन हजारांहून अधिक पानटपऱ्यांमध्ये हे प्रतिबंधित पदार्थ कोणत्याही भीतीशिवाय खुलेआम विकले जात आहेत. विशेषतः कामगार वर्ग कमावलेले पैसे मटका-जुगारामध्ये हरवून आर्थिक व कौटुंबिक समस्यांना सामोरे जात आहे, ज्यामुळे घरगुती कलह, सामाजिक असुरक्षितता, गुन्हेगारी प्रवृत्ती वाढताना दिसत आहे.



याशिवाय, युवक आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये मावा - गुटख्याचे व्यसन झपाट्याने वाढत असून, त्यातून कॅन्सर, तोंडाचे रोग, मानसिक अस्थिरता व व्यसनाधीनता यांसारख्या गंभीर आरोग्य समस्या उद्भवत आहेत. अनेक ठिकाणी अल्पवयीन मुलेही सहजपणे हे पदार्थ खरेदी करताना दिसत असून, परिस्थिती अत्यंत चिंताजनक झाली आहे. तसेच, परवाना नसलेल्या पानटपऱ्या, तसेच परवाना असूनही नियमांचे उघड उल्लंघन करणाऱ्या दुकानांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. औषध प्रशासन विभाग व पोलिस यंत्रणेच्या संयुक्त देखरेखीअभावी हा अवैध व्यवसाय अधिकच बळावला आहे.

### या आहेत प्रमुख मागण्या

- मावा, गुटखा आणि इतर प्रतिबंधित तंबाखू पदार्थांच्या विक्रीवर असलेली बंदी काटेकोरपणे अंमलात आणून नियमित तपासणी मोहिमा राबवा.
- शहरातील सर्व पानटपऱ्यांची तपासणी करून बेकायदेशीर व परवाना नसलेल्या दुकानांवर तात्काळ कारवाई करा.
- प्रतिबंधित पदार्थांचा होलसेल पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर गुन्हे दाखल करून सखोल तपास करावा.
- पोलिस आणि औषध प्रशासन यांनी संयुक्त प्रतिबंधित विक्री, मटका-जुगार केंद्रांवर नियमित धाडी टाकाव्या.
- अल्पवयीन मुलांना तंबाखू पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करून परवाने रद्द करावे.
- ''मावागुटखा मुक्त सोलापूर'' व ''जुगारमुक्त सोलापूर'' अशी व्यापक जनजागृती मोहीम राबवावी.

# दौंड-कलबुर्गी-दौंड विशेष शटल रेल्वे गाडी कायमस्वरूपी सुरू ठेवावी

### प्रवासी सेवा संघाची पत्रकार परिषदेत मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

दौंड-कलबुर्गी -दौंड विशेष शटल रेल्वे गाडी २८ फेब्रुवारी २०२६ नंतर बंद करण्याचे नियोजन आहे. ही महत्त्वाची रेल्वेगाडी बंद न करता मुदत वाढीसह कायमस्वरूपी सुरू ठेवण्यात यावी. ही गाडी बंद केल्यास सुमारे ३० किलोमीटर भागातील प्रवाशांना याचा फटका बसणार आहे. त्याचबरोबर अर्थव्यवस्थेवरही याचा परिणाम होणार आहे. त्यामुळे ही गाडी पूर्ववत सुरू ठेवावी, अशी मागणी प्रवासी सेवा संघाचे अध्यक्ष संजय पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

मध्य रेल्वेच्या मुंबई-चेन्नई मेल एक्सप्रेस च्या वेळेत बदल व अनेक रेल्वे स्टेशनचे प्रवासी थांबे रद्द केल्यामुळे ग्रामीण विभागातील प्रवाशांना जिल्हा मुख्यालय असलेले सोलापूर येथे जाण्यासाठी व संध्याकाळी परतीच्या प्रवासासाठी एक ही सोयीची रेल्वे गाडी नसल्याने दौंड - कलबुर्गी - दौंड विशेष शटल रेल्वे गाडी सुरू करण्यात आली. या विशेष रेल्वे गाडीला फेब्रुवारी २०२६ अखेरपर्यंत मंजुरी आहे. यामुळे रेल्वे विभागाकडून मार्च २०२६ पासून पुढील कालावधीसाठी मुदत वाढीसह कायमस्वरूपी मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मध्य रेल्वेच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे पाठविण्यात यावा अशी मागणी यापूर्वीच निवेदनाद्वारे प्रवासी सेवा संघाने रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

या शटल रेल्वे गाडीला मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रतिसाद मिळत आहे. ही रेल्वे सेवा कायमस्वरूपी सुरू ठेवल्यास विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, नोकरदार, अक्कलकोट व गंगापूर येथे जाणाऱ्या भाविकांची गैरसोय दूर होणार आहे. त्याचबरोबर पास धारकांच्या संख्येत मोठी वाढ होऊन रेल्वेच्या महसुलात वाढ होणार आहे, असेही यावेळी संजय पाटील यांनी सांगितले.

या परिसरातील ३० किलोमीटर भागातील लोकांवर ही रेल्वे गाडी बंद केल्यास मोठा परिणाम होणार आहे. रस्ते मार्गावरून जाणे परवडणार नाही तसेच वेळेचा अपव्य होणार आहे. ग्रामीण भागाशी ग्रामीण भागाचा सोलापूरचे संपर्क कमी होण्याची चिंता आहे. यामुळे सर्वांच्या सोयीसाठी ही रेल्वे गाडी कायमस्वरूपी सुरू ठेवावी, असे स्पष्ट केले आहे. या पत्रकार परिषदेस सचिव संजय चौगुले, खजिनदार नंदू दळवी आदी उपस्थित होते.

# रमाईची लेक पुरस्कारांचे रविवारी वितरण

### विविध क्षेत्रातील १४ मान्यवरांचा होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

रमाई सेवाभावी शिक्षण प्रसारक मंडळातर्फे रविवार १ मार्च रोजी सकाळी १० वाजता हॉटेल सुर्या इंटरनॅशनल मुरारजी पेठ येथे रमाईची लेक पुरस्कारांचे वितरण होईल, अशी माहिती संस्थेचे संस्थापक राजाभाऊ माने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मातोश्री रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त या पुरस्कारांचे वितरण होईल. मातोश्री रमाई यांच्या त्याग, संघर्ष आणि समर्पणाच्या प्रेरणेने समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा या पुरस्काराद्वारे मान्यवरांच्या हस्ते सन्मान होईल. या वर्षीच्या पुरस्कारासाठी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांची निवड समितीने केली आहे.

### या मान्यवरांचा सन्मान

महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, पोलीस उपायुक्त विजयालक्ष्मी कुर्री, आरटीओ निरीक्षक प्रतीक्षा नारायणकर, महावितरण कनिष्ठ अभियंता मेधा शिवगुंडे, प्रा.डॉ. तेजस्विनी कांबळे (शिक्षण), अंजली वाघमारे (उद्योग), सुनंदा साळुंखे (सामाजिक), चित्रकार सुजाता शिंदे (कला) , नगरसेविका अश्विनी चव्हाण, डॉ. स्त्री रोग तज्ञ योगिनी साबळे (आरोग्य), ज्योती व्यंकट शिंदे (नर्सिंग), सरस्वती कोकणे (पत्रकारिता) , नंदाबाई वाघमारे, सुभद्रा गायकवाड (आदर्श माता).

या पत्रकार परिषदेला संस्थेचे सचिव विनोद माने, सल्लागार संतोष कदम आदी उपस्थित होते.

# पद्मशाली समाजाच्या महापौर व नगरसेवकांचा उद्या सत्कार

### पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष डॉ.सूर्यप्रकाश कोठे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

अखिल भारतीय पद्मशाली संघ संचलित पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघातर्फे पद्मशाली समाजातील सोलापूर महापालिकेचे नूतन महापौर विनायक कोंड्याल तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पद्मशाली समाजाच्या २० नूतन नगरसेवकांचा सत्कार शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित केला आहे, अशी माहिती पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा कार्यक्रम महालक्ष्मी बॅन्क्वेट हॉल, अक्कलकोट रोड, एमआयडीसी येथे होणार आहे. कार्यक्रमास अखिल भारतीय पद्मशाली संघाचे गौरव अध्यक्ष श्रीधर सुंकुरवार, अध्यक्ष स्वामी कंदगटला, मध्य प्रदेश सरकारच्या सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाचे प्रधान सचिव नरहरी परिकीपंडला, सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, तिरुमला तिरुपती देवस्थानच्या बोर्ड सदस्य जानकीदेवी तम्मीशेट्टी, माजी आ. कैलास गोरंट्याल (जालना), प्रसिद्ध तेलुगू अभिनेता सागर मोगिली, सोलापूर पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

समाजाच्या प्रगतीसाठी, जनसेवेसाठी आणि लोकप्रतिनिधी म्हणून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. समाजातील नेतृत्वाचा गौरव करणे, नव्या लोकप्रतिनिधींना प्रोत्साहन देणे आणि समाजाची एकजूट अधिक दृढ करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे, असे डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी सांगितले. या कार्यक्रमास पद्मशाली समाजबांधव तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संघाने केले आहे.

पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय यांच्या नावे वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटल सुरू करण्याबाबत पद्मशाली ज्ञाती संस्था, मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय तसेच पद्मशाली शिक्षण संस्थासमवेत चर्चा सुरू आहे, लवकरच यासंदर्भात व्यापक बैठक घेण्यात येईल, असेही ते म्हणाले. या पत्रकार परिषदेला पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे कार्याध्यक्ष व्यंकटेश चाटला, प्रधान सचिव वासुदेव इप्पलपल्ली, उपाध्यक्ष अंबादास बिंगी, यल्लप्पा गड्डम, सरचिटणीस दयानंद मामड्याल, माजी नगरसेवक शशिकांत केंची उपस्थित होते.

### वस्त्रोद्योग, युवक व महिलांचे प्रश्न सोडविणार

पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाच्या माध्यमातून समाजाचा प्रमुख व्यवसाय असलेल्या वस्त्रोद्योगासह या समाजातील युवक व महिलांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यात देणार आहे. रोजगार निर्मितीसंदर्भातदेखील प्रयत्न करण्यात येणार आहे. पद्मशाली समाजाच्या नगरसेवकांनी नागरिकांचे प्रश्न जाणून घेऊन ते सोडवण्याचा प्रयत्न करावा, विशेष करून पाणी, स्वच्छता, आरोग्य, वैद्यकीय सुविधांवर भर द्यावा, अशी अपेक्षा असल्याचे डॉ. कोठे यांनी सांगितले.

# अंदाजपत्रकात नागरिकांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब उमटावे!




सोलापूर महानगरपालिकेसमोर यंदाचे अंदाजपत्रक ही केवळ आर्थिक तरतुदींची औपचारिकता नसून शहराच्या भवितव्याला दिशा देण्याची मोठी संधी आहे. आकड्यांच्या पलीकडे जाऊन विश्वासाचे बजेट घडविण्याची गरज आहे. नागरिकांचा सहभाग, पारदर्शक अंमलबजावणी आणि प्राधान्यक्रमांवर ठाम भूमिका घेतली तरच विकासाला खरी दिशा मिळेल. अन्यथा कोटींची वाढ कागदावरच राहील आणि प्रश्न रस्त्यावरच राहतील म्हणूनच हे अंदाजपत्रक ''त्यांचे'' नव्हे तर ''आपले'' व्हावे. नागरिकांच्या आवाजातून, अपेक्षांतून आणि जबाबदारीतून उभे राहिलेले. कारण लोकसहभागातूनच लोकशाही बळकट होते आणि तेव्हाच नगरसेवा खऱ्या अर्थाने ईश सेवा ठरते. ''नगरसेवा हीच ईश सेवा'' म्हणत असाल, तर नागरिकांच्या सूचनांना दार उघडे ठेवावे लागणार आहे. अंदाजपत्रकात नागरिकांच्या सूचनांचं स्वागत झाले पाहिजे. त्यासाठी सूचना मागविण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक प्रभागाची गरज वेगळी, मग विकासाचा मापदंडही वेगळा हवा. एकाच साच्यातील योजना नव्हे, तर प्रभागनिहाय आराखडा आवश्यक आहे. स्थानिक प्रश्न, स्थानिक प्राधान्य आणि स्थानिक उपाय यांवर भर द्यावा. तेव्हाच शहराचा विकास सर्वसमावेशक आणि संतुलित ठरणार आहे.

सन २०२२-२३ मध्ये सोलापूर महापालिकेचे अंदाजपत्रक १०५५ कोटी, २०२३-२४ मध्ये १०७५ कोटी १९ लाख, २०२४-२५ मध्ये ११५७ कोटी २३ लाख १६ हजार ४०१ आणि २०२५-२६ मध्ये १२९३ कोटी ३० लाख १३ हजार ४०१ रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर झाले. गतवर्षीच्या तुलनेत तब्बल १३६ कोटींची वाढ झाली मात्र प्रश्न इतकाच आहे की या वाढीचा थेट लाभ नागरिकांच्या दैनंदिन जीवनात कितपत दिसतो? सोलापूर शहराचे १७८ चौरस किलोमीटर क्षेत्रफळ आहे. सुमारे १३ लाख लोकसंख्या असलेल्या शहरासाठी हे अंदाजपत्रक तयार होत आहे. महापालिकेत सुमारे ३४०० कर्मचारी कार्यरत असताना जवळपास १००० पदे रिक्त आहेत. एकूण उत्पन्नातील सुमारे ४३ टक्के रक्कम वेतनावर खर्च होते. वेतन व भत्त्यांवर २२१ कोटी ८ लाख, तर निवृत्तीवेतन व कुटुंबवेतनावर ११७ कोटी ९३ लाख रुपये खर्च होतात. यामुळे विकासकामांसाठी उपलब्ध निधीचा वापर अधिक नियोजनबद्ध आणि प्राधान्याने करणे आवश्यक ठरते.

चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत. ही लोकशाहीची पुनर्स्थापना आहे. सत्ताधारी भाजपला प्रथमच ८७ जागी विजय हे ऐतिहासिक यश मिळाले. यामुळे लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्यामुळे अंदाजपत्रक प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग अपरिहार्य ठरतो. प्रभागनिहाय बैठकांचे आयोजन, ऑनलाइन सूचना मागविणे, व्यापारी संघटना, चेंबर ऑफ कॉमर्स, तज्ञ व अभ्यासकांकडून लेखी अभिप्राय घेणे अशी लोकसहभागाची ठोस पावले उचलली तरच अंदाजपत्रक ''आपले'' वाटेल. कर भरणाऱ्या नागरिकांना त्यांच्या परिसरात नेमके काय हवे आहे, कोणती कामे तातडीची आहेत, कोणत्या सुविधांची उणीव भासत आहे याची माहिती महापालिकेने थेट नागरिकांकडूनच घ्यायला हवी.

रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठ्याची अनियमितता, कचरा व्यवस्थापनातील त्रुटी, वाहतूक कोंडी, सार्वजनिक आरोग्य सुविधा, उद्याने व सार्वजनिक जागांची देखभाल या प्रश्नांची उत्तरे कागदावरील आकड्यांत नसून नागरिकांच्या अनुभवांत आहेत. त्यांच्या सूचनांवर आधारित तरतूद झाली, तर अंदाजपत्रक वास्तववादी आणि लोककेंद्रीत ठरेल. अन्यथा ते केवळ वाढत्या आकड्यांचा दस्तऐवज राहील. याहूनही महत्त्वाचे म्हणजे अंदाजपत्रकात ज्या कामांसाठी तरतूद केली जाते, त्या कामांवर प्रत्यक्षात खर्च होतो का, याची पारदर्शक देखरेख आवश्यक आहे. केवळ तरतूद करून कामे रखडणे किंवा निधी वळवला जाणे ही प्रवृत्ती थांबली पाहिजे. प्रत्येक विकासकामाचा सार्वजनिक आढावा, प्रगती अहवाल आणि गुणवत्ता तपासणी याची सवय प्रशासनाने लावली पाहिजे.

**सोलापूर महानगरपालिकाचा अर्थसंकल्प :** आकड्यांचा खेळ की नागरिकांच्या स्वप्नांचा आराखडा? लोकसहभागाशिवाय अंदाजपत्रक अपूर्ण आहे 'आपले बजेट' करण्याची हीच योग्य वेळ आहे. अंदाजपत्रक म्हणजे केवळ कोटींची बेरीज-वजाबाकी नव्हे, तर प्रत्येक नागरिकाच्या अपेक्षांचा आरसा असतो. रस्त्यावरचा खड्डा, नळातील पाणी, मुतारी आणि कचऱ्याची दुर्गंधी यांची उत्तरे जर नसतील, तर वाढलेले कोटीही व्यर्थ ठरतात. सोलापूरला स्वातंत्र्यलढ्याची ऐतिहासिक परंपरा आहे. सुमारे १६०० कर्मचारी असलेल्या महत्त्वाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी विशेष निधीची आवश्यकता आहे

लोकसहभाग आणि जनजागृती ही या शहराची ताकद राहिली आहे. त्यामुळे अंदाजपत्रक तयार करताना नागरिकांना केवळ करदाते नव्हे तर विकासाचे भागीदार म्हणून मान्यता देणे हीच खरी लोकाभिमुख भूमिका ठरेल. ''नगरसेवा हीच ईश सेवा'' हे ब्रीद केवळ फलकावर न राहता कृतीत उतरवायचे असेल, तर अंदाजपत्रक प्रक्रियेत नागरिकांचा आवाज स्पष्टपणे उमटला पाहिजे. अखेरीस अंदाजपत्रक हे आकड्यांचे नसून नागरिकांच्या अपेक्षा आणि आकांक्षांचे प्रतिबिंब असावे. हीच माफक अपेक्षा आहे.


# जिल्ह्यात १५ लाखांच्यावर आयुष्मान 'वय वंदना' कार्ड वाटप

### ७० वर्षांपुढील व्यक्तींच्या समावेश, १३ मार्चपर्यंत ई-केवायसी पूर्ण करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी-**

एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत ७० वर्षे व त्यावरील नागरिकांचे आयुष्मान वय वंदना कार्ड तयार करण्यासाठी ग्रामीण भागात गावनिहाय आणि शहरी भागात वॉर्डनिहाय विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समितीच्या सदस्य सचिव डॉ. वर्षा डोईफोडे यांनी दिली. दरम्यान, आजतागायत जिल्ह्यात १५ लाख ६ हजार ४८२ आयुष्मान कार्ड वाटप करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात सध्या ७० वर्षे व त्यावरील लाभार्थ्यांची ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या प्रक्रियेसाठी आशा स्वयंसेविका, स्वस्त धान्य दुकानदार, आपले सरकार सेवा केंद्र कर्मचारी यांना प्रतियशस्वी ई-केवायसीसाठी २० रुपये आणि आयुष्मान कार्ड वितरणासाठी १० रुपये, असे एकूण ३० रुपये मानधन देण्याचा शासन निर्णयही घेण्यात आला आहे.




आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत प्रतिकुटुंब प्रतिवर्ष पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. तसेच ७० वर्षे व त्यावरील नागरिकांना आयुष्मान वय वंदना कार्डद्वारे प्रतिलाभार्थी प्रतिवर्ष पाच लाख रुपयांपर्यंत २ हजार ३९९ आजारांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करता येणार आहेत. यासाठी जिल्ह्यातील ९१ खासगी आणि २२ शासकीय अशा ११३ रुग्णालयांमध्ये तसेच सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपचार करण्यात येणार असल्याचीही माहिती डॉ. डोईफोडे यांनी दिली.

जिल्ह्यातील लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड ग्रामपंचायत स्तरावर आपले सरकार सेवा केंद्र, सीएससी केंद्र, रेशन दुकानदार, आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी यांच्या माध्यमातून मोफत काढून देण्यात येणार आहे. ७० वर्षे व त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा आणि आयुष्मान वय वंदना कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे, ही विशेष मोहीम १३ मार्चपर्यंत राबविण्यात येणार आहे. संबंधित कर्मचारी गाव, वॉर्ड, वाडी, वस्ती, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन लाभार्थ्यांचे ई-केवायसी पूर्ण करणार आहेत. तसेच लाभार्थ्यांना स्वत:चे ई-केवायसी स्वत: करता यावे यासाठी अँड्रॉईड मोबाइलवर आयुष्मान ॲप डाउनलोड करून Beneficiary Login द्वारे किंवा Operator Login _Yrb For Senior Citizens of the age of Seventy years bove Click Here to Enroll या पर्यायाद्वारे आयुष्मान वय वंदना कार्ड तयार करता येणार आहे. सर्व विभागांच्या समन्वयातून मार्चअखेरपर्यंत जिल्ह्यातील ७० वर्षे व त्यावरील सर्व पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान वय वंदना कार्ड ई-केवायसी १०० टक्के पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### सैफ काझी याचा पहिला रोजा

**टेंभुर्णी, दि. २६ फेब्रुवारी-**



रमजानच्या पवित्र महिन्यात मोठ्या श्रद्धेने मुस्लिम बांधव रोजा (उपवास) करतात अशातच सैफ काझी याने छोट्याशा वयात स्वइच्छेने रोजा धरुन पुर्ण केला. पहाटे ५:३४ वाजता सहेरी पुर्ण करुन पुर्ण दिवस अन्नपाणी त्याग करुन संध्याकाळी ६:३७ वाजता रोजा सोडला तब्बल १३ तास उपवासाचे पालन केले व रोजा सोडताना सैफ ने अल्लाह कडे दुआ (प्रार्थना) केली आपल्या देशात कायम शांती नांदत रहो यामुळे सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

### देवगांव येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**बार्शी, दि. २६ फेब्रुवारी -**

दि. २५ फेब्रुवारी रोजी बार्शी तालुक्यातील देवगांव येथे एका २९ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नवनाथ गौतम जगताप (वय २९, रा. देवगाव, ता. बार्शी) यांनी मौजे देवगाव येथील गट क्रमांक २८५ मधील शेतीजमिनीत बाभळीच्या झाडाला सुती दोरीने गळफास घेतल्याची माहिती बुधवारी सकाळी सुमारे ८.४५ वाजता त्यांच्या नातेवाईकांना मिळाली. संबंधित ठिकाणी जाऊन पाहणी केली असता ते झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आले.घटनेची माहिती तत्काळ बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे देवगाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस अधिक तपास करीत आहेत.



### सांगोला विद्यामंदिर प्रशालेला आदर्श शाळा पुरस्कार जाहीर

**सांगोला, दि.२६ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य विज्ञान अध्यापक महामंडळ संलग्न असणाऱ्या सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी दिला जाणारा आदर्श शाळा पुरस्कार सांगोला विद्यामंदिर प्रशालेला जाहीर करण्यात आला असून याचे वितरण दि.१ मार्च रोजी स.१० वा. राजयोग हॉल, करमाळा येथे होणाऱ्या १३ व्या राज्यस्तरीय विज्ञान अधिवेशनामध्ये करण्यात येणार आहे. सांगोला विद्यामंदिर प्रशालेची विज्ञान विषयातील प्रगती, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी केलेले प्रयत्न आणि शिक्षकांचे मार्गदर्शन या सर्व बाबींचा विचार करून आदर्श शाळा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ड.विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, उपमुख्याध्याक चिंतामणी देशपांडे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरुटे यांनी प्रशालेतील सर्व विज्ञान विषय शिक्षक व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

### विद्याविकासच्या ओम दराडेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**बार्शी दि.२६ फेब्रुवारी-**



डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एनएमएमएस परीक्षेत भालगावच्या विद्या विकास विद्यालयाच्या ओम दराडे याने यश संपादन केले आहे. अध्यक्ष अनिल घुगे, सचिव लता सानप यांनी ओमच्या यशाबद्दल अभिनंदन केले आहे. प्रशालेचे मुख्याध्यापक मधुकर कराड तसेच क्षत्रिय सर, केसरे सर, फुलचंद घुगे, पुष्पांजली सानप, लिपिक संतराम ढवळे, शिपाई महंमद शेख यांनी ओमचे अभिनंदन केले. तसेच सर्वांनी पुढील शिक्षणासाठी, यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# विधवेची फसवणूक; आरोपीस ३ दिवसांची कोठडी

## मंगळवेढा न्यायालयाचे आदेश; दहा तासात पोलिसांनी केली अटक

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २६ फेबुवारी -**

एका ३० वर्षीय विधवा महिलेस लग्नाचे अमिष दाखवून जबरदस्तीने तिच्याशी शारिरीक संबंध ठेवून तिचे सोन्याचे दागिने विकून आलेले पैसे खर्च केल्याप्रकरणी राहुल हणमंत विटेकर (रा.मंगळवेढा) याला पोलीसांनी अटक करुन मंगळवेढा न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या घडनेची हकीकत अशी,यातील फिर्यादी तथा पिडीता हिचा पती दहा वर्षापुर्वी मयत झाला आहे. फिर्यादीचा भाऊ व आरोपी हे दोघे खास मित्र असल्याने पिडीतेच्या घरी तो नेहमी ये जा करीत असे. त्यामुळे पिडीतीचे व




आरोपीची ओळख झाली होती. एके दिवशी आरोपीने घरी जावून तू मला खूप आवडतेस मी तुझ्यासोबत लग्न करतो असे म्हणाल्यावर पिडीतेने आरोपीस तू मागे लागू नको तुला बायका मुले आहेत, मी तुझ्यासोबत लग्न करणार नाही असे सांगीतल्यावरही आरोपीने जानेवारी व ७ फेब्रुवारी रोजी पिडीता घरी एकटी असताना घरी येवून पिडीतेच्या इच्छेविरुध्द शारिरीक संबंध ठेवले. त्यावेळी पिडीतेने आरोपीस लग्न कधी करणार आहे? असे विचारल्यावर करु या की असे म्हणून पिडीतेकडून सोन्याचे गंठण विक्रीसाठी घेवून गेला व त्याचे पैसे खर्चुन टाकले. पिडीतेने वारंवार माझ्याशी लग्न कधी करणार आहे? असे विचारणा केल्यावर तुझ्यासोबत लग्न करणार नाही, तुला काय करायचे ते कर असे धमकावले होते. दरम्यान तपासिक अंमलदार तथा पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवून मंगळवेढा हद्दीत केवळ दहा तासाच्या आत त्याला अटक करुन बुधवार दि.२५ रोजी मंगळवेढा न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी दि.२७ फेब्रुवारी पर्यंत दिली असून याचा अधिक तपास तपासिक अंमलदार हे करीत आहेत.



## प्रा. डॉ. भगवंत कुलकर्णी यांना अर्थशास्त्र जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**सांगोला,दि.२६ फेब्रुवारी -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र परिषदेच्यावतीने दिला जाणारा अर्थशास्त्र जीवनगौरव पुरस्कार सांगोला महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा.डॉ.भगवंत हनुमंत कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. डॉ.कुलकर्णी यांनी सांगोला महाविद्यालयात अनेक वर्षे अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन केले असून अर्थशास्त्र क्षेत्रातील त्यांचे प्रदीर्घ योगदान, संशोधन आणि शैक्षणिक कार्याची दखल घेऊन विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेने त्यांना या पुरस्काराने गौरविले आहे. याबद्दल डॉ.कुलकर्णी यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## दहा तोतया विद्यार्थ्यांच्या पोलिस कोठडीत तीन दिवसांची वाढ

### नंदेश्वर परीक्षा केंद्रावरील गैरप्रकार

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा, दि. २६ फेबुवारी -**

नंदेश्वर येथील बाळकृष्ण विद्यालयात दहावीच्या परीक्षेत तोतया विद्यार्थी परीक्षेस बसविल्याप्रकरणी न्यायालयाने पुन्हा त्या आरोपीच्या पोलिस कोठडीत तीन दिवसांची वाढ केली आहे.

या घटनेची हकिकत अशी,बाळकृष्ण विद्यालयात दि.२० फेब्रुवारी रोजी सकाळी ११.०० वा. पेपर सुरु असताना पडताळणीत विद्यार्थ्यांचे हॉल तिकीटचे झेरॉक्स सापडले होते. यावरून केंद्र संचालकांना संशय आल्याने त्यांनी प्रत्येक खोलीत मुलांचे हॉल तिकिट तपासणी केल्यावर दहा विदयार्थ्यांच्या जागी तोतया विदयार्थी बसल्याचे उघड झाले होते. नऊ मुले व एक मुलगी यांना पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेवून अटक करून न्यायालयात उभे केले असता प्रथमतः चार दिवसांची पोलिस कोठडी दि.२४ फेब्रुवारीपर्यंत सुनावली होती.या पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर आरोपींना पुन्हा न्यायालयात उभे केल्यावर तपासिक अंमलदार तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक विनोद लातूरकर यांनी न्यायालयाकडे वाढीव पोलिस कोठडीची मागणी केली होती.

## पंचायत समिती सांगोला येथे भूजल विषयक जनजागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२६ फेब्रुवारी -**

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या अधिनस्थ कार्यालय केंद्रीय भूजल मंडळ, नागपूर यांच्यावतीने बचत भवन, पंचायत समिती, सांगोला येथे भूजल विषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते व केंद्रीय भूजल विभागाचे वरिष्ठ अधिकारी एस.एस.पूर्ती, उपेंद्र धोंडे तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सोलापूर जिल्हा प्रमुख डॉ.मुश्ताक शेख यांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी उमेशचंद्र कुलकर्णी एस.एसपूर्ती, अमरनाथ, उपेंद्र धोंडे, डॉ.मुश्ताक शेख यांनी मार्गदर्शन आणि ग्रा.पं.अधिकारी



> केंद्रीय भूजल विभागाच्या माध्यमातून भूजलवैज्ञानिकांनी केलेल्या सविस्तर अभ्यास अहवालातील माहितीचा वापर करून स्थानिक पातळीवर भूजल व्यवस्थापन अद्ययावत करणे शक्य आहे.
> **- उपेंद्र धोंडे, वरिष्ठ भूजलवैज्ञानिक, केंद्रीय भूजल मंडळ**

जयवंत लवटे, खानसाहेब मुलाणी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी स्थानिकांनी भूजलाची घसरती पातळी व शेततळी तसेच भूजल पुनर्भरण संरचना अंम लबजावणीतील तांत्रिक अडचणी याबद्दल उत्स्फूर्तपणे प्रश्नं विचारले तसेच आपापल्या गावातील अनुभव कथनही केले. यावेळी स्थानिक पातळीवर उत्कृष्ट काम गिरी करणाऱ्या वैजिनाथ घोंगडे यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी ग्रामसेवक, सरपंच, जलसुरक्षक, जलदूत तसेच स्थानिक सामाजिक संस्था प्रतिनिधी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी सहा.गटविकास अधिकारी वसंत फुले, पाणीपुरवठा उप.अभियंता एस.आर.पुजारी, आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत, उज्ज्वल कुमार उपस्थित होते.

## काँग्रेस प्रवक्ता मारहाण प्रकरणी माढा तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २६ फेब्रुवारी-**

काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते हणुमंत पवार यांना दोन दिवसापूर्वी पुण्यात मारहाण झाली. त्या घटनेचा निषेध व्यक्त करून सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचिव जहीर मणेर यांच्या नेतृत्वाखाली माढा तहसीलदार संजय भोसले यांना निवेदनाद्वारे संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

या निवेदनात असे म्हटले आहे की,राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते हनुमंतराव पवार यांच्यावर तुषार दामगुडे व इतर काही लोकांनी एकत्रितपणे, कथितरीत्या बंदुकीचा धाक दाखवून शारीरिक मारहाण केल्याची अत्यंत गंभीर, धक्कादायक व निंदनीय घटना समोर आली आहे. सार्वजनिक जीवनात कार्यरत असलेल्या व्यक्तीवर प्राणघातक शस्त्राचा धाक दाखवून हल्ला करणे ही बाब केवळ गुन्हेगारी स्वरूपाची नसून, ती भारतीय संविधानाने हमी दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य यांवर थेट आघात करणारी आहे.

सदर घटनेत सहभागी व्यक्ती उजव्या विचारसरणीशी संबंधित



असताना कोणत्याही विचारसरणीच्या नावाखाली हिंसाचाराचा अवलंब करणे हे लोकशाहीविरोधी व संविधानविरोधी आहे. सदर प्रकरणाची तात्काळ, निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यात यावी तुषार दामगुडे व इतर सहभागी व्यक्तींची ओळख पटवून त्यांच्याविरोधात संघटित गुन्ह्याच्या अनुषंगाने कठोर फौजदारी कारवाई करावी. बंदुकीचा धाक दाखविण्यात आलेल्या शस्त्राची तात्काळ जप्ती करून, शस्त्र परवाना आहे किंवा नाही याची सखोल तपासणी करण्यात यावी. चौकशी व खटला प्रलंबित असताना, हिंसाचाराला वैचारिक व्यासपीठ मिळू नये व सार्वजनिक शांतता भंग होऊ नये या उद्देशाने, तुषार दामगुडे व संबंधित व्यक्तींना टीव्ही डिबेट्स व सार्वजनिक राजकीय चर्चामध्ये सहभागी होण्यावर प्रतिबंध घालण्यावावत सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्यात यावी हनुमंतराव पवार तसेच इतर राजकीय कार्यकर्त्यांना आवश्यक ती पोलीस संरक्षण व्यवस्था उपलब्ध करून द्यावी भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक व प्रतिबंधक उपाययोजना तात्काळ राबवाव्यात.या लोकशाही विरोधी घटनेचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध नोंदवित असून, दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी असे म्हटले आहे. यावेळी काँग्रेसचे सचिव जहीर मणेर, सचिन खैरे-पाटील, शहराध्यक्ष पृथ्वीराज साठे, अल्पसंख्यांकचे तालुका उपाध्यक्ष जमीर सय्यद, युवक काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष अमर राकुंडे, वाकावचे ग्रा.पं.सदस्य भारत खंडागळे, दत्तात्रय सावंत, बाबासाहेब ओहोळ, सलीम पिंजारी, जहांगीर काझी, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## साने गुरुजी कथामालेचा गुणवंत शिक्षक सन्मान सोहळा संपन्न

**सांगोला, दि.२६ फेब्रुवारी -**

सांगोल्यातील साने गुरुजी कथामालेच्या वतीने सांगोला विद्यामंदिर येथे आयोजित गुणवंत शिक्षक सन्मान सोहळा मंगळवेढा येथील कवी इंद्रजीत घुले यांच्या हस्ते संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.प्रबुद्धचंद्र झपके तसेच प्रा.नानासाहेब लिगाडे, डॉ.शिवराज भोसले उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात साने गुरुजींच्या प्रतिमेला अभिवादन करून शिवाजी बंडगर यांनी साने गुरूजी यांची खरा तो एकची धर्म या सामुदायिक प्रार्थनेने करण्यात आली. यावेळी इंद्रजीत घुले, प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, प्रा.नानासाहेब लिगाडे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी दलितमित्र साबळे गुरुजी यांना स्व.रामदास भोसले जीवन गौरव पुरस्कार, विजयकुमार इंगवले (जि.प.प्रा. केंद्रशाळा, सोनंद), वैशाली गुजरे (जि.प. प्रा.केंद्रशाळा, शिरभावी), धनंजय डोंगरे (मुख्याध्यापक, जवाहर विद्यालय, घेरडी) आणि शुभांगी कवठेकर (उत्कर्ष प्राथमिक विद्यालय, सांगोला) यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच कथामालेचे सदस्य अरविंद डोंबे यांनी अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त काळा मळा (राजेवाडी) जि.प शाळेला ७५ हजार रुपये देणगी दिल्याबद्दल व सावित्रा कस्तुरे यांची प्राथमिक शिक्षक पतसंस्था चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल तसेच प्रा. राजेंद्र ठोंबरे यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक कथामालेचे अध्यक्ष भीमाशंकर पैलवान यांनी केले. आभार बापू भंडगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कथामालेचे सचिव सुनिल लिगाडे, सदस्य नारायण विसापुरे, बाळासाहेब वाघमारे, सोमनाथ सपाटे, नीलकंठ लिंगे यांनी सहकार्य केले.



## एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत रामभाऊ जोशी हायस्कूलचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २६ फेब्रुवारी-**

केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाकडून महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेमार्फत इ.८ वी तील विद्यार्थासाठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये (एनएमएमएस) रामभाऊ जोशी हायस्कूल करकंब ता.पंढरपूर येथील ३८ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.या यशस्वी विद्यार्थ्यांना एनएमएमएस परीक्षा प्रमुख संजय पाटील, विज्ञान शिक्षिका मनीषा ढोबळे,शिक्षक गणेश गायकवाड, समाजशास्त्र शिक्षक नामदेव सलगर, गेस्ट लेक्चरर महादेव व्यवहारे बुद्धिमत्ता यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी विद्यार्थांचे दयानंद शिक्षण संस्था सोलापूरचे स्थानिय सचिव महेश चौप्रा,प्रशासकीय अधिकारी डॉ.विजयकुमार उबाळे, प्राचार्य हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे यांनी अभिनंदन केले.

> **एनएमएमएस परीक्षेत सुयश प्राप्त करणारे विद्यार्थी.**
> पूर्वा देशमुख १३४ गुण,प्राप्ती परदेशी १३१,मोनाली माने १२८,पूजा पिसे ११६,ओंकार धायगुडे ११५,अनुष्का भाळवणकर ११२,अथर्व ढोबळे ११२,सानिका शेटे १०५,दिव्या भोंग १०४,हर्षद नरसाळे १०३,योगेश शेटे ९९,प्रिया शिंदे ९९,भाग्यश्री टेके ९६,रोशनी साळवे ९५, सोहम रणदिवे ९३,वैभव वसेकर ९२,तन्मय वसेकर ९०,शुभम सनगर ८९,श्रुती भोरे ८८,ज्ञानेश्वरी धोत्रे ८७, अनुजा काळे ८८,संजीवनी मदने ८५,साईराम कचरे ८२,राधिका गारुडे,८१,अरहम भाळवणकर ८१,श्रावणी देशमुख ८१,पवन गायकवाड ८१,समर्थ शिंदे ७९,सोहम घाडगे ७७,समीक्षा धोत्रे ७५,समर्थ गुंड ७४,राधिका व्यवहारे ७३,अविनाश शिंदे ६७,समृद्धी गायकवाड ६६,आदित्य गायकवाड ६६,सार्थक खंडाळे ६४,सुजित क्षीरसागर ६३,अभिषेक खंदारे ६६

## विज्ञान अध्यापक मंडळाचे रविवारी वार्षिक अधिवेशन

### शिवाजी चापले यांचा जीवनगौरव पुरस्काराने होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ फेब्रुवारी -**

करमाळा विज्ञान अध्यापक मंडळ व सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने १३ वे वार्षिक अधिवेशन करमाळा येथे रविवार दि.१ मार्च रोजी होणार आहे.

या अधिवेशनात सोलापूर जिल्ह्यातील विज्ञान शिक्षकांसाठी तसेच विज्ञान प्रेमी साठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर करमाळा येथील प्राचार्य डॉ. प्रवीण देशमुख तसेच प्रा. रामदास झोळ यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. त्याचबरोबर अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर येथील डॉ. विकास पाटील इनोव्हेशन संशोधन व विकास या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. विज्ञान विषयांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील विज्ञान शिक्षकांचा तसेच विद्यार्थ्यांचा गुणगौरव या अधिवेशनामध्ये होणार आहे. आमदार नारायण (आबा) पाटील तसेच माजी आमदार जयवंतराव जगताप , दत्तात्रय सावंत, नगराध्यक्षा मोहिनीताई सावंत, भाजपाच्या प्रदेश महिलाध्यक्षा रश्मी बागल, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, शंभूराजे जगताप (विश्वस्त करमाळा तालुका एज्युकेशन सोसायटी) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच यावर्षीचा विज्ञान विषयातील जीवनगौरव पुरस्कार शिवाजी चापले यांना त्यांनी केलेल्या विज्ञान विषयातील उत्कृष्ट कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील विज्ञान विषयासंदर्भात उत्कृष्टपणे कार्य करणाऱ्या एका शाळेस आदर्श पुरस्कार देण्यात येणार आहे. या अधिवेशनास जिल्हा प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. इब्राहिम नदाफ, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप तसेच करमाळ्याचे गटशिक्षणाधिकारी नितीन कदम अधिव्याख्याता डॉ. प्रभाकर बुधाराम सोलापूर जिल्हा परिषदेचे विज्ञान पर्यवेक्षक अनिल बनसोडे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. त्याचप्रमाणे राज्य विज्ञान मंडळाचे संचालक लक्ष्मीप्रसाद मोहिते, विज्ञान मंडळाचे अध्यक्ष संजय जवंजाळ, सचिव नुरअहमद कारंजे, परीक्षा प्रमुख संतोष दोडयाळ उपस्थित राहणार आहेत. तरी या अधिवेशनास जिल्ह्यातील सर्व विज्ञान शिक्षकांनी उपस्थित राहावे. असे अहवान करमाळा तालुक्याचे विज्ञान मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय भस्मे व सचिव संदीप पुजारी तसेच करमाळा विज्ञान अध्यापक मंडळातील सर्व सदस्यांनी केलेले आहे .

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कर्जमाफीच्या घोषणेकडे शेतकऱ्यांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२६ फेब्रुवारी-**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत सध्याच्या सत्तेत असणाऱ्या महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार अशी घोषणा केली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी खरेतर महायुती सरकारला मतदानरुपी आशीर्वाद देत बहुमताने सत्तेत आणले. सध्या या घोषणेच्या अंमलबजावणीसाठी वेगवान हालचाली सुरु आहेत.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कर्ज माफीची घोषणा करतील अशी अपेक्षा महाराष्ट्रातील तमाम अडचणीत असणाऱ्या शेतकऱ्यांना आहे. राष्ट्रीयकृत बँका, सोसायट्या यांच्याकडून थकीत तसेच नियमीत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची शासनाने माहीती घेतली असल्याचे वृत्त आहे. पण या कर्जमाफीचे निकष काय आहेत याबाबत मात्र अद्यापही शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आहे. थकीत शेतकऱ्यांची कोणत्या वर्षांपासून पासुन कोणत्या वर्षांपर्यंत कर्जमाफी होणार, किती लाखापर्यंत कर्ज माफी होणार की संपूर्ण सातबारा उताराच कोरा होणार याबाबत साशंकता आहे. यामध्ये फक्त पिककर्जच माफ होणार की शेतीविषयक कर्ज सुद्धा माफ होणार तसेच नियमीत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शासन काय मदत करणार याबाबत शेतकऱ्यांमधुन उलटसुलट चर्चा सुरू आहे. नियमीत कर्ज फेड करणाऱ्या शेतकरी वर्गाला किती प्रोत्साहनपर अनुदान शासन देणार याबाबत शेतकऱ्यांमधुन चर्चा, शासन शेतकऱ्यांना फक्त राष्ट्रीयकृत बँकेचे व सोसायटीचे सोडून इतर सहकारी संस्थांच्या कर्जाबाबत शासन काय निर्णय घेणार याबाबत संभ्रम आहे. शेतकरी कर्जमाफीबाबत मुख्यमंत्री फडणवीस काय घोषणा करणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### महत्त्वाचे

## बार्शी तालुक्यातील अवकाळीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

### खा. निंबाळकर व आ. सोपल यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**बार्शी, दि. २६ फेब्रुवारी-**

बार्शी तालुक्यात दि. २३ व २४ फेब्रुवारी रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे शेती व फळ पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार ओमराजे निंबाळकर व आमदार दिलीप सोपल यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे तातडीने पंचनामे करण्याची मागणी केली आहे. तालुक्यातील विविध गावांमधील शेतकऱ्यांच्या गहू, ज्वारी, हरभरा, करडई, कांदा इत्यादी पिकांसह द्राक्षे, आंबा, चिंच व इतर फळ पिकांचे गंभीर स्वरुपाचे नुकसान झाले असल्याच्या लेखी व तोंडी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून त्यांच्या उपजीविकेवर परिणाम झाला आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन व महसूल नियमावलीनुसार नुकसानग्रस्त शेती पीक व फळ पिकांचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना संयुक्त पंचनामे करण्याचे तात्काळ आदेश देण्यात यावेत, अशी विनंती करण्यात आली आहे. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या नियमानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत व भरपाई देण्यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात यावी, अशी अपेक्षा आमदार दिलीप सोपल यांनी व्यक्त केली आहे.



## वळसंगमध्ये रस्त्यावरील सांडपाण्यामुळे नागरिक, विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात

**वळसंग, दि. २६ फेब्रुवारी -**

वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) ग्रामपंचायत अधिकारी तसेच सरपंच, उपसरपंच व सदस्य वळसंग गावातील सांडपाणी, गटर पाणी व्यवस्थापन करण्यामध्ये दुर्लक्ष करून जनतेच्या आरोग्यासोबत खेळी खेळत आहेत. वार्ड क्रमांक तीन मध्ये अधिक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. आचेगाव रोड शेखलाल घरापासून येत असलेले सांडपाणी रस्त्याच्या कडेला असणाऱ्या एका बाजूला श्री शंकरलिंग हायस्कूल, दुसऱ्या बाजूला श्री चन्नय्या स्वामी मठ तसेच पाणी वाहत श्री बसवेश्वर मंदिर समोरून वाहते. श्री बसवेश्वर गल्लीतील राहणाऱ्या लोकांची पिण्याची पाणी व्यवस्था त्या सांडपाणी मध्ये असणाऱ्या हातपंपा पासून होते. ग्रामपंचायतकडे अनेक वेळा तक्रारी केल्यानंतर त्यावर मुरूम टाकून तात्पुरते काम केले जाते. विद्यार्थी नागरिकांच्या आरोग्याशी खेळ, धार्मिक स्थळांचा अनादर, हातपंप वापरून पाणी पिणाऱ्या लोकांची बेदखल हे ग्रामपंचायत करत असलेले दुर्लक्ष आहे. प्रधानमंत्री सडक योजनेतून रस्ते मंजूर असले तरी आराखडा तयार करून ठेकेदार पळून गेल्याची चर्चा आहे. ग्रामपंचायत सरपंच जगदीश अंटद व वार्ड क्र.३ चे सदस्य यांनी याकडे जातीने लक्ष घालून विद्यार्थ्यांची तसेच नागरिकांची व मंदिरांची काळजी घ्यावी अशी परिसरातील लोकांची मागणी आहे. शेखलाल घरापासून बंद गटारीची नियोजन करून रस्त्याचा निर्माण करावी. तसेच हातपंप जागी स्वच्छता राखून जनतेचे आरोग्य संभाळावे. येत्या मे मध्ये ग्रामदैवत श्री चौडेश्वरी यात्रेचा केंद्रबिंदू बाळबट्टल येणाऱ्या मार्ग सुद्धा तोच आहे त्यासाठी लवकरात लवकर यावर तोडगा काढावा अशी मागणी बसवेश्वर गल्लीतील नागरिकांची आहे.

## संभाव्य कॉरिडॉर प्रकल्प रखडल्यास बाधितांचे भवितव्य काय?

### मंदिर परिसरातील स्थानिक लोकांमध्ये चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ फेब्रुवारी -**

गेल्या तीन, साडेतीन वर्षांपासून चर्चेत असलेला आणि मंदिर परिसरातील स्थानिक लोकांसाठी वेदनादायक असा कॉरिडॉर प्रकल्प आता लवकरच सुरू होणार आहे, हे आता जवळपास निश्चित झाले असले तरीही ईतर सरकारी योजनेप्रमाणे हा कॉरिडॉर प्रकल्प निधी अभावी अथवा अन्य कारणाने रखडल्यास बाधितांचे भवितव्य काय असणार ? असा प्रश्न मंदिर परिसरातील स्थानिक लोकांमध्ये निर्माण झाला आहे. याबाबत अनेक संभाव्य कॉरिडॉर बाधितांनी सोशल मीडियावर चिंता व्यक्त केली आहे.

कॉरिडॉर प्रकल्पासाठी १ हजार ८०० कोटी रुपये मोबदला दिला जाणार आहे, जागेसाठी दिली जाणारी रक्कम देखील मोठी आहे, याबाबत बाधित लोक समाधानी आहेत, मात्र नमामी चंद्रभागा, नामसंकीर्तन सभागृह, प्रधानमंत्री आवास योजना या सारख्या केंद्र सरकारच्या योजना, ज्या की निधी अभावी अनेक वर्षांपासून रखडल्या आहेत तसेच कॉरिडॉर बाबत झाले तर संभाव्य बाधितांची अवस्था ही, धोबी का कुत्ता, ना घर का, ना घाट का, अशी होणार आहे. त्यामुळे शासनाने पुर्णपणे निधीची तरतूद करुनच या प्रकल्पाला हिरवा कंदील द्यावा अशी देखील मागणी संभाव्य बाधित नागरिकांकडून केली जात आहे.

**काळ्या दगडावरील पांढरी रेष**

कॉरिडॉर होणारच ही आता काळ्या दगडावरील पांढरी रेष आहे, मात्र तरीही कृती विरोधी समिती सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार आहे, कीतीही पैसे दिले तरीही आपली मंदिर परिसरातील स्थानिक लोकांना त्यांच्या घरजागा, मोक्याच्या ठिकाणी असलेली दुकाने जाऊ द्यायची नाहीत, मात्र दुसरीकडे शासन कॉरिडॉरवर ठाम असल्याचे दिसत आहे.

**जीवितहानी होऊ शकते**

कॉरिडॉर मध्ये ज्या जागा, जुने वाडे, घर वाचणार आहेत, असे अनेक वास्तू या शंभर ते दीडशे वर्षे जुन्या आहेत. पाडापाडी करताना या धोकादायक व मोडकळीस आलेल्या घरांना पडण्याचा धोका असून जीवितहानी होऊ शकते.

### मुंबईतील बैठकीनंतर हालचालींना वेग

मुंबई येथे नुकत्याच झालेल्या पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत पंढरपूर येथील संभाव्य कॉरिडॉर होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच भूसंपादन करण्यासाठी हालचाली सुरू होणार असून अठराशे कोटी रुपये देण्यात येणार आहेत. मात्र हे होत असताना मंदिर परिसरातील शेकडो जीर्ण, मोडकळीस आलेल्या धोकादायक ईमारती, वाडे यांच्या मालकांना सूचना देण्यात याव्यात अशी मागणी केली जात आहे.

### मोठ्या प्रमाणावर उपाययोजना करणे गरजेचे

कॉरिडॉर प्रकल्पाचे काम सुरु झाल्या नंतर विठ्ठलरुक्मिणी मंदिर परिसरात पाडकाम करताना उडणारी प्रचंड धूळ, राडारोडा, मंदिर परिसरातील ईतर धोकादायक ईमारती, पाडकाम करताना त्यांना होणारा धोका, यासाठी देखील मोठ्या प्रमाणावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

### कॉरिडॉरऐवजी दुसरे गोंडस नाव

कॉरिडॉर ही काळाची गरज आहे मात्र यात जुने मठ,मंदिरे, देऊळ, संताच्या समाधी नष्ट होऊन अध्यात्मिक वारसा कायमचा पुसला जाणार आहे, केंद्र सरकारला देखील याची कल्पना असल्याने आता पंढरपूर कॉरिडॉर ऐवजी श्री विठ्ठल रुक्मिणी वाणिज्य संकुल, असे नाव देण्यात आले आहे.

## ड्रीलिंगच्या धुळीने पिके करपली

### हत्तीकणबस येथील शेतकऱ्यांचा सोलर कंपनीविरोधात संताप

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २६ फेब्रुवारी -**

तालुक्यातील हत्तीकणबस येथे सुरू असलेल्या सोलर प्रकल्पाच्या कामामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची तक्रार समोर आली आहे. सध्या युद्धपातळीवर सुरू असलेल्या ड्रीलिंग कामामुळे उडणारी धूळ शेजारील पिकावर साचत असून ऊस, गहू, हरभरा तसेच आंबा पिकांवर त्याचा गंभीर परिणाम झाला असल्याने पिके वाळून लाखो रुपयांचे नुकसान झाल्या आहे.प्रशासनाने या बाबत तातडीने पंचनामा करून शेतकऱ्यांना कंपनी कडून नुकसान भरपाई मिळवून द्यावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

याबाबत संबंधित कंपनीचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना वारंवार विनंती करूनही योग्य ती उपाययोजना करण्यात आलेली नाही. उलट अरेरावी व उद्धटपणे उत्तर देत दमदाटी केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

परिस्थिती गंभीर होत चालल्याने संबंधित शेतकऱ्यांनी तालुका तहसीलदारांकडे लेखी तक्रार अर्ज दाखल केला आहे. नुकसानग्रस्त पिकांची पाहणी करून पंचनामा करुन कंपनी कडून तात्काळ नुकसान भरपाई मिळवून द्यावी व योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

ड्रीलिंगदरम्यान धूळ नियंत्रणासाठी पाण्याची फवारणी, संरक्षक जाळ्या उभारणे आदी उपाय तत्काळ राबवावेत, अशीही मागणी होत आहे. दरम्यान, सोलर प्रकल्प विकासासाठी असला तरी तो शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा आणणारा ठरू नये, अशी भावना परिसरातून व्यक्त होत आहे.ड्रीलिंग मशीनच्या सततच्या आवाजासह उडणाऱ्या प्रचंड धुळीमुळे पिकांवर थर साचत आहे. त्यामुळे प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेवर परिणाम होऊन पिकांची वाढ खुंटत आहे. विशेषतः ऊस आणि गहू पिकांवर याचा अधिक फटका बसत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.



### लाखो रुपयांचे नुकसान

''आमच्या गावाजवळ एक सोलर कंपनीचे काम सुरू आहे. सोलर प्रकल्पास आमचा कोणताही विरोध नाही; मात्र काम करताना शेजारील शेती पिकांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. रोज होत असलेल्या ड्रीलिंगमुळे माझ्या शेतातील ऊस, गहू, हरभरा पिकांवर मोठ्या प्रमाणात धूळ बसत आहे. परिणामी पिके वाळत आहेत. लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. सांगूनही ऐकण्याची मनस्थिती दिसत नाही,''

**- सिद्धाराम मोघे, शेतकरी, हत्तीकणबस.**

## संत गाडगेबाबांच्या कार्याचा वसा समाजाने घ्यावा : सोमशेखर स्वामी

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ फेब्रुवारी -**

संत गाडगे महाराज यांनी रस्ते, मंदिरे आणि विहिरी स्वच्छ करून स्वच्छतेचा आदर्श घालून दिला, त्यामुळे समाजाने त्यांच्या सर्वंकष कार्यापासून आदर्श घेऊन शहर स्वच्छता व विकासामध्ये योगदान द्यावे असे प्रतिपादन अक्कलकोट नगरपालिका शिक्षण मंडळ, प्रशासनाधिकारी सोमशंकर स्वामी यांनी केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, समुपदेशक सिद्धू विटकर उपस्थित होते. स्वच्छ भारत संकल्पना गाडगेबाबांच्या विचारातूनच आल्याचे श्री. स्वामी यांनी सांगितले. प्राचार्य डॉ.लोखंडे यांनी केले. प्रा.डॉ शितल झिंगाडे-भस्मे यांनी आभार मानले. कार्यक्रमास शितल फुटाणे, हर्षदा गायकवाड, सौरभ भस्मे, ऐश्वर्या तारापुरे, भीम सोनकांबळे उपस्थित होते.



### गाडगे महाराज विज्ञानवादी संत

समाजातील रूढी परंपरा अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी संत गाडगे महाराजांनी आयुष्यभर प्रयत्न केले त्यामुळे ते खऱ्या अर्थाने विज्ञानवादी संत होते असे प्रतिपादन अभिवादन कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

## आमदारांनी शेतकऱ्यांच्या पाणीटंचाईकडे लक्ष देण्याची गरज

### 'दक्षिण'मधील शेतकऱ्यांची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २६ फेब्रुवारी -**

दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिणसह सोलापूरमधील अवैध डान्सबार संदर्भात अधिवेशनात प्रश्न विचारला. त्यामुळे निश्चितच डान्सबार बंद करण्याची कारवाई होईल. आमदार देशमुख यांचा पाठपुरावा कौतुकास्पद आहे. याबरोबरच कर्नाटक सरकारच्या आडमुठे धोरणामुळे हक्काच्या पाण्यापासून वंचित दक्षिणमधील दहा ते पंधरा गावातील शेतकऱ्यांसाठी उमराणी बंदरातून पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा करण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

सोलापूर शहराचा पाणीपुरवठा जलवाहिनीद्वारे सुरू करण्यात आल्यामुळे उजनीतील पाणी भीमा नदीत सोडण्याचे बंद करण्यात आल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे भीमा नदीत असलेल्या विविध गावांच्या पाणीपुरवठ्यासह शेतीच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. एक महिन्यापासून भीमा नदीत पाणी नसल्यामुळे दक्षिणमधील सादेपूर, लवंगी, कारकल, औज, टाकळी, कुरघोट व बरूर यासह अनेक गावात पाणीटंचाई आहे. मंद्रूपसह अनेक गावातील पाणीपुरवठा बंद आहे. फळबागांना पाणी नसल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळे आमदार देशमुख यांनी दक्षिण मधील शेतकऱ्यांच्या पाणी प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज असल्याची अपेक्षा दक्षिण मधील शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### दहा गावांतील शेतकऱ्यांपुढे संकट

दक्षिणमधील दहा गावामधील शेतकर्यांना भीमा नदीत पाणी नसल्यामुळे विविध संकटांना सामोरे जावे लागत आहे. सर्वपक्षीय लोकप्रतिनीधीमुळे उजनी धरणातील पाणी सोडण्यात आले. मात्र अद्याप पाणी न मिळाल्याने शेतकरी पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. उमराणी बंधार्यात पाणी अडविल्यामुळे पाणी मिळत नाही. याबाबत आमदार सुभाष देशमुख यांनी दक्षिणच्या शेतकर्यांना पाणी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**- संगमेश बगले, सरपंच, लवंगी, तालुका दक्षिण सोलापूर**

## पीएम किसान व नमो शेतकरी योजनेसाठी आमदार आवताडे आग्रही

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ फेब्रुवारी -**

देशातील करोडो शेतकऱ्यांना दिलासा देणारी 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी'आणि राज्यातील 'नमो शेतकरी महासन्मान निधी' या योजनांपासून वंचित राहिलेल्या राज्यातील तसेच पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील पात्र शेतकऱ्यांचा प्रश्न आमदार समाधानदादा आवताडे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केला.



पी.एम. किसान सन्मान निधी योजनेची यादी राज्य शासनाच्या 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेसाठीही वापरली जाते. त्यामुळे केंद्राच्या यादीतील त्रुटींमुळे अनेक पात्र शेतकरी राज्य शासनाच्या योजनेपासूनही वंचित राहत आहेत. एकाच वेळी दोन्ही योजनांचा लाभ न मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा निधी मिळावा, ही भूमिका सभागृहात मांडली.

खरंतर केंद्र सरकारकडून १ फेब्रुवारी २०१९ ही नोंदणीची अंतिम तारीख निश्चित करण्यात आली होती. सात वर्ष उलटूनही या निकषात बदल न झाल्याने २०१९ नंतर सातबारावर नाव नोंद झालेल्या नव्या पात्र शेतकऱ्यांना योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. अनेक कुटुंबांमध्ये वडिलांच्या हयातीतच कायदेशीर वाटणीद्वारे जमीन मुलांच्या नावावर होते; मात्र या तारखेच्या अटीमुळे असे नवे शेतकरी अपात्र ठरतात. तसेच वारसहक्काने जमीन मिळालेल्या लाभार्थ्यांनाही अर्ज प्रक्रियेत अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

एकट्या मंगळवेढा तालुक्यातून डिसेंबर २०२४ मध्ये १९८९ प्रस्ताव पाठविण्यात आले, त्यापैकी ४०२ प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत. डिसेंबर २०२५ पासून संबंधित पोर्टल बंद असल्याचे स्थानिक ई-सेवा केंद्रांकडून सांगितले जात आहे. सध्या नोंदणी केलेल्या अर्जांच्या छाननी व मंजुरीचे अधिकार राज्यस्तरावर केंद्रीत असल्याने स्थानिक पातळीवर प्रकरणांचा निपटारा होत नाही. तसेच निधी वाटपाची यादी तालुकास्तरावर उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना 'निधी जमा झाला की नाही' याची माहिती मिळविण्यासाठी वारंवार सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

या सर्व मुद्द्यांवर कृषिमंत्री मा.श्री. दत्तात्रय भरणे यांनी सकारात्मक भूमिका घेत सोलापूर जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या दोन्ही योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. १ फेब्रुवारी २०१९ नंतर शेती नोंद झालेल्या नव्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून संबंधित निकषांमध्ये बदल करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

यासोबतच शेतकरीहिताला प्राधान्य देणारे हे सरकार आपल्या भावना आणि प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन लवकरच संयुक्त बैठक आयोजित करून योग्य तो निर्णय घेईल, अशी ठोस ग्वाहीही यावेळी दिली.

## बार्शी पंचायत समिती सभापतीपदावर कोणाची वर्णी?; तालुक्यात उत्सुकता शिगेला

### मीनाक्षी रोंगे, विमल काटे, जयमाला जाधव यांची नावे चर्चेत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ फेब्रुवारी -**

बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखाली घवघवीत यश मिळाले. जिल्हा परिषदेच्या सहापैकी सहा आणि पंचायत समितीच्या बारापैकी बारा जागांवर विजय मिळवत राऊत गटाने राजकीय इतिहास रचला आहे.

गेल्या २० वर्षांपासून पंचायत समितीवरील सत्ता अबाधित राखत माजी आमदार राऊत यांनी सलग पाचव्यांदा सत्ता स्थापन करण्याचा विक्रम केला आहे. दरम्यान, सभापतीपदाच्या आरक्षण सोडतीनंतर हे पद सर्वसाधारण महिलांसाठी राखीव झाल्याने राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे. सभापतीपदाच्या शर्यतीत उपळाई-ठोंगे गणातील मीनाक्षी रोंगे, मालवंडी गणातील विमल काटे आणि मानेगाव गणातील जयमाला जाधव यांची नावे आघाडीवर आहेत. पहिल्या अडीच वर्षांसाठी सभापतीपद महिला सदस्यांकडे जाणार असल्याने या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. माजी आमदार राऊत यांनी राजकीय समतोल साधत विविध नेत्यांच्या घरातील महिलांना उमेदवारी देऊन त्यांना सक्रीय राजकारणात स्थान दिले. त्यामुळे पक्षांतर्गत समन्वय अधिक मजबूत झाल्याचे चित्र आहे.



मीनाक्षी रोंगे | विमल काटे | जयमाला जाधव

यापूर्वी बाजार समितीत एकहाती सत्ता मिळवल्यानंतर सभापतीपद उत्तर बार्शी भागाला तर उपसभापतीपद वैराग भागाला देण्यात आले. आता सभापतीपदाच्या माध्यमातून उत्तर बार्शी व वैराग या दोन्ही भागांमध्ये सत्तेचा समतोल कसा साधला जातो, याबाबत उत्सुकता वाढली आहे. सभापती निवडीचा अधिकृत कार्यक्रम अद्याप जाहीर झालेला नसला तरी, पक्षातील ज्येष्ठ नेते व पदाधिकाऱ्यांनी सभापती निवडीचे सर्वाधिकार माजी आमदार राऊत यांच्याकडे सोपविल्याचे समजते. त्यांनी घेतलेल्या दूरदृष्टीच्या निर्णयांमुळे कृषी उत्पन्न बाजार समिती, नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत सलग विजय मिळवण्यात यश आल्याची चर्चा आहे. एकंदरीत, बार्शी पंचायत समितीच्या सभापतीपदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून येत्या काही दिवसांत या उत्सुकतेला पूर्णविराम मिळणार आहे.